# मिरा भाईंदर महानगरपालिका

## स्थायी समिती सभा दि. २९/०७/२००४

मिरा भाईंदर महानगरपालिकेची स्थायी समिती सभा गुरुवार दिनांक २९/०७/२००४ रोजी सभा सुचना क्र. ११ दि. २३/०७/२००४ रोजीच्या विषयपत्रिकेवरील विषयांवर विचार विनिमय करण्यासाठी मा. स्थायी समितीच्या सभागृहात सकाळी ११.०० वा. आयोजित करण्यांत आली होती.

सदर सभेच्या अध्यक्षस्थानी मा. सभापती श्री. मॉरस रॉड्रीक्स हे उपस्थित होते. सदर सभेस खालील सदस्य उपस्थित होते.

### उपस्थित सदस्य

| | | |
|---|---|---|
| १) | श्री. मॉरस जोसेफ रॉड्रीक्स | सभापती |
| २) | श्री. मोहन मधुकर पाटील | सदस्य |
| ३) | श्री. अग्रवाल धनराज नंदलाल | सदस्य |
| ४) | श्री. याकुब ईस्माईल कुरेशी | सदस्य |
| ५) | श्री. आसिफ गुलाब शेख | सदस्य |
| ६) | श्री. गावंड हरेश लक्ष्मण | सदस्य |
| ७) | श्री. चंद्रकांत सिताराम वैती | सदस्य |
| ८) | श्री. नितीन गोपीनाथ ठाकूर | सदस्य |
| ९) | श्री. दिनेश द. नलावडे | सदस्य |
| १०) | श्री. अशोक बळवंत पाटील | सदस्य |
| ११) | श्री. पाटील शरद केशव | सदस्य |
| १२) | श्री. हॅरल जॉर्ज बोर्जीस | सदस्य |
| १३) | श्री. मिलन वसंत म्हात्रे | सदस्य |
| १४) | श्री. पाटील अनंत रामचंद्र | सदस्य |
| १५) | श्री. जोजफ जॉन घोन्सालविस | सदस्य |

### गैरहजर सदस्य

| | | |
|---|---|---|
| १) | श्रीम. रिटा सुभाष शहा | सदस्या |

**मा. सभापती :-**

सर्व उपस्थित सन्मा. सदस्य, अधिकारी वर्ग, कर्मचारी वर्ग आपणा सर्वांचे स्वागत करून आजच्या सभेच्या कामकाजाला प्र. सचिवांनी सुरूवात करावी.

**प्र. सचिव :-**

प्रथम निवृत्त होणाऱ्या स्थायी सदस्यांचे सभापती आणि प्रशासनाच्या वतीने निरोप समारंभ करण्यात येत आहे.

(प्र. सचिवांनी विषयपत्रिकेचे वाचन केले.)

(प्र. सचिवांनी प्रकरण क्र. ६१ चे वाचन केले.)

(मा. सभापती साो. व मा. उपायुक्त साो. यांनी पुष्पगुच्छ देउन निवृत्त होणाऱ्या सदस्यांचे आभार व्यक्त करण्यात आले.)

**मिलन म्हात्रे :-**

सभापती साहेब, पान क्र. १० मध्ये ह्याच्यात संपूर्ण आम्ही अभ्यास करुन पुढच्या सभेला सादर करु असे ठरले होते. त्यामध्ये भाड्याच्या अमाउंटमध्ये काय झाले? सर्व्हे कधी होणार आहे, निर्णय काय झाला ते काहीच कळत नाही.

**प्र. सचिव :-**

गाडीच्या भाड्याबाबत काय?

**मिलन म्हात्रे :-**

हे जे आपण भाडे लावले होते व आपल्याला अगोदर लिस्ट दिली होती, बाजार निरिक्षक त्यांच्याकडून म्हणजे आपण जे आता रेन्ट लावणार आहोत, फी देणार आहेत. १० नंबरच्या पानामध्ये प्रशासनाने जे आकडे दिलेले आहेत ते सगळे स्टेरियोफोनिक आकडे आहेत. रु. ६,६५०/-.

**शरद पाटील :-**

हे १/७/०४ रोजीचे प्रोसिडिंग चालू आहे आणि आपण ८/७/०४ रोजीच्या इतिवृत्तांताबददल बोलत आहात.

**प्र. सचिव :-**

दि. ०१/०७/२००४ रोजीचे इतिवृत्तांत आहे.

**मिलन म्हात्रे :-**

मला तुम्ही सेट देताना नोटीस विषयपत्रिका व त्यानंतर दि. ०८/०७/२००४ रोजीचे दिले आहे.

**प्र. सचिव :-**

दि. ०१/०७/२००४ रोजीचे इतिवृत्तांताचे वाचन करतो.

**मिलन म्हात्रे :-**

पान क्र. १० मध्ये केळकर साहेबांचे जे स्टेटमेंट आहे ते पंधरा दिवसामध्ये दिरंगाई झाल्याबद्दल खुलासा मागवला होता. त्याचे काय झाले? आरोग्य विभागाचे आज येथे कोण आहे?

**धनराज अग्रवाल :-**

सदरचा विषय मा. स्थायी समितीने मंजुरी न देता आयुक्तांकडे पाठविण्यात आला. त्याचे काय झाले?

**मिलन म्हात्रे :-**

आता ह्याच्यापुढे काय झाले? दि. ०१/०७/२००४ रोजीचे इतिवृत्तांत चालू आहे. आता एक महिना होत आला आहे. कारण दोन वर्षाचा कम्पमाईन्स रिपोर्ट वगैरे आम्हाला काहीही दिलेले नाही आहे आणि आपण जे सुधारित ठराव करतो, संपूर्ण सुचनासह, सुधारणासह जो ठराव मंजूर केलेला आहे, त्याचे काय फायनल आम्हाला काय दाखवले नाही. काय सुचना केल्या काय नाही केल्या.

**प्र. सचिव :-**

मागच्या वेळेला सांगितले होते. पुढच्या सभेत देणार.

**मिलन म्हात्रे :-**

गेल्या वेळेला आपले ठरले की, पुढच्या सभेत ठेवले जाईल. बी.एम.सी., टी.एम.सी. चे आम्ही प्रोसिडींग बघतो. हयाच्यात आपण जी सुधारणा केली, ते सभापतींनी सांगितले की, पुढच्या सभेला तुम्ही आपला अहवाल सादर करा. हया प्रोसिडिंग बरोबर तो अहवाल आला पाहिजे.

**प्र. सचिव :-**

पुढच्या इतिवृत्तांता सोबत देण्यात येईल.

**मिलन म्हात्रे :-**

गेल्या सात तारखेला जे १/७/०४ सभापती साहेबांनी जो आदेश दिला, एक आठवडा तर कम से कम ते प्रोसिडिंग बरोबर आले पाहिजे. हो किंवा नाही जे काय आहे ते एक पान आपण घ्या. पण ते काहीच येत नाही.

**रमेश मनाळे (मा. प्र. उपायुक्त (मुख्यालय) सो.) :-**

मा. सभापतींच्या परवानगीने बोलतोय, केळकरसाहेबांनी आश्वासन दिल्या संदर्भात मी बोलतो की, ७३(ड) नुसार कोणतीही संविधा मान्य झाल्यानंतर पंधरा दिवसाच्या आत स्थायी समितीसमोर अवलोकनार्थ सादर करणे ही विभागाची जबाबदारी आहे. त्या संदर्भात सभा झाल्यानंतर संबंधितांना तात्काळ तोंडी सुचना देण्यात आलेल्या होत्या व तेथून पुढच्या सभेपासुन ते घेण्यात येत आहे आणि येथून पुढे असे होउ नये म्हणून संबंधितांना तोंडी सुचना देण्यात आलेल्या आहेत.

**मिलन म्हात्रे :-**

आपण लेखी सुचना का दिल्या नाहीत. त्यात काय प्रॉब्लेम आला का?

**रमेश मनाळे (मा. प्र. उपायुक्त (मुख्यालय) सो.) :-**

जर यापुढे नाहीच आले तर त्यांना ताकीद देउ.

**मिलन म्हात्रे :-**

हा खुलासा आम्ही मान्य करणार नाही. ही लेखी चुक आहे व हयाला अनावधानाने हयाला मंजुरी मिळाली असती. उदया ऑडीटला आम्ही येतो. तुमचे त्याच्यात काही जात नाही. साहेब,

आज तुम्ही येथे आहात पण उदया नसाल, परवा दुसऱ्या कुठेतरी महानगरपालिकेला असाल. तुम्ही जी त्यांना तोंडी सुचना दिली आहे तर लेखी दयायला तुम्हाला काय अडचण होती का? कोणी दबाव टाकला होता का?

**रमेश मनाळे (मा. प्र. उपायुक्त (मुख्यालय) सोा.) :-**

अडचण वगैरे काहीच नाही. नंतरच्या सभेला सगळे ठराव वेळेवर घेण्यात आलेले आहेत.

**मिलन म्हात्रे :-**

येथे केळकर साहेबांनी स्पष्टपणे आमची चुक झाली हे कबुल केले. आता हे रेकॉर्डला आलेले आहे. हयाच्यामध्ये आपण असे बोलून चालेल का की, आम्ही तोंडी सुचना केल्या आणि आम्ही तोंडी शिक्षा केली आणि पगार सुध्दा तोंडी केला तर चालेल का? किंवा त्यांचे डिमोशन, प्रमोशन दंड जे काय असेल ते आम्ही तोंडी करुन टाकले. उदया आपल्याला सुदधा आम्ही तोंडी पगार दयायला लावू. तुमचा पगार १० तारखेला तोंडी झाला तर साहेब हे चालत नाही. काहीतरी लेखी त्यांना ओळीचे दया.

**रमेश मनाळे (मा. प्र. उपायुक्त (मुख्यालय) सोा.) :-**

बी.एम.सी. ॲक्ट ४९ मध्ये ते अभिप्रेतच आहे की, ते पंधरा दिवसाच्या आत दयायलाच पाहिजे.

**मिलन म्हात्रे :-**

तुम्ही एक शॉट नोटीस त्यांना दयायला पाहिजे. माझ्या कुणावरही व्यक्तिगत आकस नाही. ते अशाकरिता करायचे की, एक रेकॉर्ड राहतो. गेल्या वेळेला तुम्हाला अशाप्रकारची नोटीस आम्ही दिली होती, तर तुमची ही दुसऱ्यांदा चुक झाली आहे. मग काय असते, कोण त्याला ग्रॅमेटिकल चुक म्हणतात किंवा कोण असे म्हणतात की, काय झाले ते ठिक आहे. त्यांना क्षमापन करा असे नाही आहे. आम्हाला कोण क्षमापन करेल का? नाही करणार. आमच्याकडून एखादी चुक झाली की, प्रशासन लगेच नोटीस काढते. उदया माझा जर हाउस टॅक्स बाकी राहिला. मी थकबाकीदार राहिलो, तर मला तुम्ही क्षमापण कराल. नाही. लगेच तुमची प्रोसिजर तुम्ही चालू कराल. पहिली नोटीस, दुसरी नोटीस. जे काय खानापुर्ती करायचे आहे ते आपण सगळे कराल. एवढेच मला सांगायचे आहे की, सभापती साहेबांनी आदेश दिला. उपायुक्तांनी सगळे झालेले आहे. त्याच्यानंतर आपण तोंडी बोलतोय हयाचा काय अर्थच राहत नाही आणि किती महिने, सहा महिन्याचा डिले आहे. सहा दिवसाचा असता तर आपण समजू शकलो असतो. सहा महिने आपण झोपा काढत होता का? बाजूच्या पालघर नगरपालिकेमध्ये मुख्याधिकारी जेलमध्ये आहे. ऑडीटर जेलमध्ये आहे. गोडाउन किपर जेलमध्ये आहे आणि आता काही नगरसेवक जेलमध्ये जायच्या तयारीत आहेत. जवळ जवळ आठ ते नउ नगरसेवक, त्यावेळेचे पदाधिकारी, सभापती, स्थायी समितीचे सदस्य हे पुढच्या एक आठवडयामध्ये आतमध्ये जातील. म्हणजे कसे असते, आमचा हयाच्यात काही रोल नाही. पण शेवटी तुम्ही काय बोलाल आमच्या चुका ज्या सगळया झाल्या पण स्थायी समितीने मंजुरी दिली.

**रमेश मनाळे (मा. प्र. उपायुक्त (मुख्यालय) सोा.) :-**

सदर दिलेल्या सुचनानंतर कुठलाही डिले झालेला प्रस्ताव आलेला नव्हता.

**मिलन म्हात्रे :-**

ते तर तुमचे काम आहे आणि परत तसे झाले तर तुमच्यावर ५६ चा ठराव आहे.

**रमेश मनाळे (मा. प्र. उपायुक्त (मुख्यालय) सोा.) :-**

ठिक आहे. आपली सुचना मान्य करतो.

**मिलन म्हात्रे :-**

हयाच्या पुढच्या स्थायी समितीत आम्ही नसू. पण मा. महासभेमध्ये तुमच्यावर ५६ चा ठराव आणू. जर चुका झाल्या तर, सोडणार नाही तसे. एक लक्षात घ्या त्यावेळेला त्यांनी जी चुक केली ती सुधारण्याकरिता तुम्ही स्ट्राँग ॲक्शन काय घेतली? तर काहीच नाही. फक्त तोंडी नोटीस दिली. तोंडी नोटीस दिली हयाचे काय प्रुफ आहे की, तुम्ही तोंडी नोटीस दिली. तुमची सभा झाल्याचे तुम्ही मिनिटस बनवले का?

**रमेश मनाळे (मा. प्र. उपायुक्त (मुख्यालय) सोा.) :-**

आपण दिलेली सुचना मान्य आहे. मी लगेच लेखी सुचना सर्वांना देतो.

**मिलन म्हात्रे :-**

सुचना नाही. त्यांना तुम्ही हयाच्यावर एक व्यवस्थित नोटीस काढा की, ही चुक झाली आहे व हयाच्यामुळे अमुक अमुक गोत्यात आले असते. हे तुम्ही करा ना. सभापतींचे जे आदेश ते देखील तुम्ही पाळलेले नाही हे त्याच्यात क्लिअरकट होते आणि आता तुम्ही इतिवृत्तांताला मंजुरी आणली आहे.

त्याच्यात कुठे क्लेरिफिकेशन काहीच नाही म्हणजे आहे त्याच्यामध्ये आम्ही मंजुरी देउन मोकळे व्हायये असे मला वाटते. तुम्हाला योग्य वाटत असेल तर तसे तुम्ही बोला की, तुम्ही जे केले ते योग्य केले.

**रमेश मनाळे (मा. प्र. उपायुक्त (मुख्यालय) सो.) :-**

या सुचनेचे नक्कीच पालन होईल.

**मिलन म्हात्रे :-**

किती लाखाचे औषध होती. त्याच्यामध्ये कुठेही उल्लेख केला नव्हता.

**हॅरल बोर्जीस :-**

४ लाख ९९ हजाराचे औषधाचे आहे.

**मिलन म्हात्रे :-**

एवढी मोठी रक्कम असून एक पाच-दहा हजाराची असती तर आपण समजू शकलो असतो. साहेब, तुम्ही आता आलेला आहात. आम्ही येथे दोन वर्षापासून बसलोय. हयाच्यामध्ये काही ग्रॅमॅटिकल चुका आहेत. आता तुम्हाला एक चुक दाखवली. आता त्यांनी वाचन केले आणि तो टॅग भलताच लागला आहे. म्हणजे सेट लावताना त्याच्यावर लक्ष दिले पाहिजे की, हा सेट बरोबर लागला आहे का विषयपत्रिकेनुसार कागदपत्र लागले आहेत की, नाही. हे काम कुणाचे आहे? मी जे बोलतोय ते बरोबर आहे ना.

**रमेश मनाळे (मा. प्र. उपायुक्त (मुख्यालय) सो.) :-**

होय बरोबर आहे.

**मिलन म्हात्रे :-**

जर मी चुकत असेल तर सांगा की, मी चुकतोय. सभापती साहेब, आपण हे प्रकरण बघा. आपण हे प्रकरण परत आयुक्तांकडे रेफर केले आहे. त्याबद्दल काय झाले आहे ते बघा आणि मग हयाला मंजूरी दया. हयाच्यावर आयुक्तांचे अभिप्राय काय आले, आम्ही त्यांच्याकडे रेफर केले होते. ते वाचून दाखवा.

**मा. सभापती :-**

आयुक्त याबाबत आज लेखी सुचना देतील.

**धनराज अग्रवाल :-**

पान क्र. १५ वर आलेले आहे. ठराव क्र. ५३ सदरचे विषय मा. स्थायी समितीने मंजूर न करता पुन्हा मा. आयुक्तांकडे पाठविण्यात आला. त्याचे काय झाले.

**मिलन म्हात्रे :-**

हयाचे काय झाले. साहेब, पान क्र. १२ वर ग्रॅमॅटिकल चूक आहे. १७, १८ शाळेमध्ये पाहिजे. याच विषयामध्ये सभापतींचे स्टेटमेन्ट आहे या संबंधात चौकशी करुन विलंबाबाबत कार्यवाही केली जाईल. याबाबत सुध्दा सभापतींनी हयाच्यावर आदेश दिले आहे. हयाच्यावर रुलिंग दिली आहे.
पान क्र. १३ मध्ये केळकर साहेबांचे स्टेटमेन्ट आहे. इंडियन एअर ऑईल आले आहे. तर इंडियन ऑईल पाहिजे.

**धनराज अग्रवाल :-**

सभापती महोदय, या विषयाकरिता नालेसफाई खर्चाची माहिती मिळणेबाबत मी दि. १६/४/०३ ला पत्र दिलेले आहे. त्याचे आजपर्यंत मला उत्तर मिळालेले नाही आहे. त्याला आज किती महिने झाले? औषधामध्ये काहीतरी घोटाळा असेल ना. प्रस्ताव सहा महिन्यानंतर आला, तीन महिन्याचे औषधाचे मला उत्तर देत नाही. मग त्याचे कारण काय?

**राजकुमार कांबळे :-**

डॉक्टर साहेब आल्यावर ते माहिती देतील.

**धनराज अग्रवाल :-**

डॉक्टर साहेब, पुढच्या सभेत येणार, नाही येणार. त्यांनी तुम्हाला चार्ज देउन गेले की नाही, जर तुम्हाला चार्ज दिला नाही तर तुम्ही सभागृहामध्ये कशाला बसला? उपायुक्त साहेब आपण आहात ना, तर आपण मला सांगा की हयांना चार्ज नाही मग ते सभागृहात कसे बसतात.

**रमेश मनाळे (मा. प्र. उपायुक्त (मुख्यालय) सो.) :-**

ते आरोग्य विभागाचे प्रतिनिधी म्हणून सभागृहात बसले आहेत.

**धनराज अग्रवाल :-**

प्रतिनिधी आहेत तर त्यांनी उत्तर दिले पाहिजे असा कसा प्रतिनिधी? आता तीन तारखेला डॉक्टर साहेबांच्या मुदतीचा विषय आलेला आहे. तर ती मुदत वाढ मिळणार हे तुम्हाला माहिती आहे

का? तुम्ही धरुन ठेवले आहे का मुदत वाढ मिळणार असे. मग आपण असे कसे सांगता की, डॉक्टर साहेब नाही म्हणून आम्ही उत्तर देउ शकत नाही. असेच जर चालत असेल तर आम्ही आज अशी सभा चालू देणार नाही. मला हयाचे उत्तर पाहिजे.

**शरद पाटील :-**

सभापती महोदय, गेल्या वेळेला असाच विषय झाला. केळकरसाहेब नाही आहे म्हणून तो विषय येथे चालवायचा नाही. डॉक्टर साहेब नाही म्हणून तो विषय चालवायचा नाही असे कसे.

**रमेश मनाळे (मा. प्र. उपायुक्त (मुख्यालय) सो.) :-**

विषय चालवायचा असे नाही आहे. त्या पत्रा संदर्भात ज्या काही तांत्रिक बाबी असतील तर त्या बाबतची माहिती डॉक्टर साहेब देउ शकतात.

**शरद पाटील :-**

ती माहिती तुम्ही करुन घ्यायला पाहिजे होती. आज हे १/७/०४ रोजीचे इतिवृत्तांत आहे.

**धनराज अग्रवाल :-**

माझे पत्र कधीचे आहे तर १६/४ चे पत्र आहे.

**रमेश मनाळे (मा. प्र. उपायुक्त (मुख्यालय) सो.) :-**

सदर पत्राचे उत्तर सात दिवसात देण्यात येईल याची खबरदारी घेण्यात येईल. उदया लेखी देण्यात येईल.

**धनराज अग्रवाल :-**

इतिवृत्तांत तुम्ही त्याची नोंद घ्या व सदरचा विषय आयुक्तांकडे परत पाठवला त्याचे काय झाले?

**आसिफ शेख :-**

सन्मा. सभापती साहेब, मागच्यावेळी आपण रुलिंग दिले होते की, जे जे नगरसेवक पत्रव्यवहार करतात. त्यांना तातडीने उत्तर दयायला पाहिजे. उत्तर का देत नाही. त्यांना उत्तर देउन टाका. म्हणजे येथे स्थायीचा वेळ वाया जातो की नाही. उत्तर मिळाले असते तर ते बोलले नसते. ॲज इट इज, व्हेअर इट इज जे असेल ते देउन टाकायचे. त्यांचे समाधान झाले पाहिजे.

**धनराज अग्रवाल :-**

समाधानकारक उत्तर नसेल तर ते कसे देणार?

**रमेश मनाळे (मा. प्र. उपायुक्त (मुख्यालय) सो.) :-**

ठराव क्र. ५३ बाबत मी प्रत्यक्ष मा. आयुक्त साहेबांकडे जाउन चर्चा करतो.

**जोजफ घोन्सालवीस :-**

साहेब, ही सभा केव्हा झाली?

**धनराज अग्रवाल :-**

ही सभा किती तारखेची तर १/७/०४ ची आहे. आज एक महिना झाला. एका आठवडयात इतिवृत्तांत यायला पाहिजे ते. तर आपली चुकी चालूच आहे सुरुवातीपासून. एक महिन्यानंतर इतिवृत्तांत आले तरी त्यांचे वस्तू बाकी आहे, पेन्डीग ठेवलेले आहे. मग हया स्थायी समितीचा अर्थ काय? ते आपण मला सांगा. आपण कशाला आम्हाला येथे बसवता. जर तुम्ही काय सांगणार नसाल, काही उत्तर देणार नसाल, तर येथे बसून काय फायदा आहे?

**रमेश मनाळे (मा. प्र. उपायुक्त (मुख्यालय) सो.) :-**

याबाबत लवकरात लवकर कार्यवाही केली जाईल.

**धनराज अग्रवाल :-**

आपण याबाबत आयुक्त साहेबांना विचारा. लवकरच पण आपण पुढच्या सभेला नसणार, कोण विचारणार तुम्हाला?

**जोजफ घोन्सालवीस :-**

जा आता विचारुन या. आम्ही आहोत.

**रमेश मनाळे (मा. प्र. उपायुक्त (मुख्यालय) सो.) :-**

बैठक झाल्यानंतर याबाबत स्वतः आयुक्त साहेबांशी चर्चा करतो.

**शरद पाटील :-**

हयाचे उत्तर आम्हाला आता दया. पुढच्या सभेला आम्ही नाही आहोत.

**धनराज अग्रवाल :-**

सभापती साहेब, तुम्हीचे ते आयुक्त साहेबांकडे पाठवले आहे तर आपण प्रश्न का विचारत नाही, काय झाले?

**मिलन म्हात्रे :-**

सभापती साहेबांनी सांगितले आहे, हयाच्यावर कार्यवाही करा पण हयाच्यावर कार्यवाही काय झाली आहे, हयाच्यावर तुमचे रुलिंग झाले आहे.

**धनराज अग्रवाल :-**

उपायुक्त साहेब जर सभापती साहेबांच्या पत्राचे व्हॅल्यु नसेल व स्थायी समितीच्या सदस्यांची व्हॅल्यु नाही आहे हे तर आम्हाला माहिती आहे. आम्ही कितीही पत्र दिले तरी आम्हाला त्याचे उत्तर मिळत नाही. जर सभापती साहेबांची व्हॅल्यु नसेल मग हया सभागृहात बसायचे कशाला? मला लाज वाटते, येथे आमच्या सभागृहाने सभापतींची व्हॅल्यु बिलकुल ठेवत नाही. प्रशासन काय एवढे माजलेले आहे की, कुणाचे काही ऐकणार नाही.

**रमेश मनाळे (मा. प्र. उपायुक्त (मुख्यालय) सो.) :-**

त्यांना पत्र प्राप्त व्हायला वेळ झाला असेल किंवा संबंधितांच्या निदर्शनास आले नसेल.

**धनराज अग्रवाल :-**

आपण उलटे सुलटे कशाला बोलता? दुस-या दिवशी त्यांना पत्र मिळाले होते. आता सभापतींनी काय सांगितले, दुस-या दिवशी पत्र मिळाले आणि तुम्ही वेळ झाला असे सांगता ते कसे काय?

**रमेश मनाळे (मा. प्र. उपायुक्त (मुख्यालय) सो.) :-**

आरोग्य अधिकारी रजेवर असल्यामुळे हा प्रॅाब्लेम निर्माण झालेला आहे.

**मिलन म्हात्रे :-**

आरोग्य अधिकारी हयाच्यावर सही करतात ते आपण आम्हाला सांगा.

**रमेश मनाळे (मा. प्र. उपायुक्त (मुख्यालय) सो.) :-**

कशावर?

**मिलन म्हात्रे :-**

हया कुठल्याही पेपरावर त्यांना सहीचा अधिकार आहे का?

**रमेश मनाळे (मा. प्र. उपायुक्त (मुख्यालय) सो.) :-**

नाही.

**मिलन म्हात्रे :-**

मग त्यांचा प्रश्नच येत नाही.

**रमेश मनाळे (मा. प्र. उपायुक्त (मुख्यालय) सो.) :-**

पण काही तांत्रिक बाबीत ते स्वतः सल्ला देउ शकतात.

**मिलन म्हात्रे :-**

मनाळे साहेब, आपण नवीन आहात, आपण कोणालाही वाचवू नका. आरोग्याचे संपूर्ण डिपार्टमेन्ट ते आता तीन चार महिन्यांपासून बेवारशी झाले आहे. कोणावर कोणाचा कंट्रोल राहिलेला नाही. आपण माझ्याबरोबर पायी फिरता, मी तुम्हाला दाखवतो येथे प्रशासनाचे काम कसे चालले आहे. कोणालाही येथे काहीच पडलेले नाही. आता ही तुमची सफाईची टेंडर सगळे दयायचे आहेत. ३१ जुलैला त्याची शेवटची तारीख आहे. तुमची काय प्रोसिजर झाली ते आपण मला सांगा. आज तारीख काय आहे? आणि तीन दिवसात तुम्ही काय करणार आहात? डॉक्टर साहेब नाही आहेत आणि समजा उदया त्यांनी रिजाईन केले. आता ते एक महिना नाही आहे म्हणजे तुमचा एक महिना फुकट गेला. त्यांना सिगनेचरी ॲथोरिटी नाही आहे मग जे अधिकारी जबाबदार आहेत त्यांनी त्यांची डयुटी केली पाहिजे की, नाही. का तो अधिकारी नाही म्हणून हे पण थंड पडले. एक जण मोबाईलवर अव्हेलेबल नाही, तुम्ही दक्षता विभाग काढला त्याच्यामध्ये कोणाची हजेरी नसते आता काल संपूर्ण ग्रीन कोर्ट क्लबच्या येथे पाणी तुंबलेले आहे. इलेक्ट्रीकचे जे पीलर आहेत ते पाण्यात गेलेले आहेत. उदया तिथे ब्लास्टिंग, आग लागले तर मग हे अधिकारी हा दोषी, तो दोषी करत फिरणार. कमिशनर आरोग्यांच्या एका कुणाला एस.आय.ला निलंबित करेल. परत नंतर सेटिंग लावून ते परत कामावर येतील. ज्याचा जीव जायचा तो तर गेला. आम्ही जे बोलतो ते चुकीचे असेल तर तुम्ही स्पष्ट भाषेत बोला की, हे चुकीचे बोलतोय. तुम्ही हयांचे कुठचेही पाप लपवु नका. दोन एस. आय. आहेत हे सक्षम आहेत. काही डॉक्टरांची गरज नाही. सिम्पल साध्या गोष्टी आहेत. पुस्तके आम्ही वाचतो,

त्यांनी वाचावीत. तुम्ही नोकरीला लागलात तर असा नियम तुम्हाला बांधिल आहे, तसा आम्हालाही आहे. आपण महानगरपालिकेचा अधिनियम १९४९ च्या हिशोबाने आपण चाललो आहे आणि तो सगळयांना लागू आहे. तुम्ही त्यावेळेला जी नोटीस काढली नाही ती नोटीस आपण त्यावेळेला काढायला पाहिजे होती. त्यात तुम्हीदेखील अडकलात. कशासाठी? आम्ही काय बोललो होतो? हयाच्यात कुठेही काय दिले आहे का, तोंडी चौकशी करा, का तोंडी आदेश दया, तोंडी कार्यवाही करा. समज दया. काही नाही आहे. क्षमापन करा कुठेही काहीही दिलेले नाही. आम्ही हे हयाच्याकरिता सांगतोय की जबाबदार म्हणून तुम्हाला जबाब दयायला सांगतो आणि एवढे असूनसुध्दा त्या अधिकाऱ्याने कधी, काय त्याच्यामध्ये केले का? कमिशनर साहेबांनी कुठचा निर्णय घेतला आहे. म्हणजे हे कमिशनर साहेबांपर्यंत प्रकरण गेलेलेच नाही आहे असे प्रायमाफेसी तरी दिसते.

**रमेश मनाळे (मा. प्र. उपायुक्त (मुख्यालय) सो.) :-**

मा. सभापती साहेबांनी दिलेल्या पत्रावर त्वरित कार्यवाही करण्यात येईल व त्याप्रमाणे उत्तर देण्यात येईल.

**जोजफ घोन्सालवीस :-**

सभापती साहेब हयाचे काय झाले आहे, हे आपण त्यांनाच विचारु या. हे लोक सांगणारच नाही कारण हयांनी पाठवलेच नसेल.

**रमेश मनाळे (मा. प्र. उपायुक्त (मुख्यालय) सो.) :-**

आयुक्त साहेबांकडे जाउन येतो.

**जोजफ घोन्सालवीस :-**

पान क्र. ४४ मध्ये दोनदा नाही तर चारदा पत्र पाठवून सांगितले होते आपण ते काम येथे रद्द केले, ते परत कसे झाले?

**दिपक खांबीत :-**

ते आपण रदद कुठे केले? ठराव आपल्याकडूनच आला आहे.

**जोजफ घोन्सालवीस :-**

मी आक्षेप घेतला होता की, खाडीचे पात्र आखूड होईल.

**मा. सभापती :-**

आपण पहिल्यांना आक्षेप घेतला होता. पण तो ठराव आल्यानंतर ते पास झाले होते.

**जोजफ घोन्सालवीस :-**

नंतर तुम्ही पण सांगितले की, ते घेउ नका.

**मा. सभापती :-**

नंतर ठरावामध्ये आल्यानंतर मी त्याच्यावर काहीच बोललो नाही. पुन्हा बोलले ते करायचेच आहे.

**जोजफ घोन्सालवीस :-**

आपण ते रदद केले म्हणून परत पुन्हा बोललो नाही.

**मा. सभापती :-**

ठरावामध्ये घ्यायचे म्हणून आले आहे ना.

**जोजफ घोन्सालवीस :-**

पण त्यामुळे खाडीचे पात्र आखुड होईल. तिथे काही आवश्यकता नाही. त्यामुळे ते रद्द करुन. म्हणून सभागृहाला परत विनंती करतो.

**दिपक खांबीत :-**

सभागृह नेते लिओ कोलासो साहेब हयांनी प्रपोझ केलेले काम आहे आणि त्याप्रमाणे आम्ही एस्टीमेट घेतलेले आहे.

**जोजफ घोन्सालवीस :-**

बरोबर आहे. काम जर फायदयाचे असते तर त्याला कोण विरोध करतोय. पण त्यामुळे खाडीचे पात्र आखुड होईल. सभागृह नेत्यांनी करु दे किंवा आणखीन कोणत्या नेत्यांनी करु दे. पण त्याने खाडीचे पात्र आखुड होईल.

**मा. सभापती :-**

खांबीत माहिती दया. ते त्रासदायक आहे का?

**दिपक खांबीत :-**

काम करताना खाडीचे पात्र आखूड होणार नाही याची काळजी घेऊ.

**हॅरल बोर्जीस :-**

काम चालू करते वेळी सभापती नेते हयांच्याशी जॉईन्टली सभा घेउ या.

**आसिफ शेख :-**

आपण त्यांच्याशी व्यवस्थित सुसंवाद साधा.

**दिपक खांबीत :-**

सभागृह नेत्यांनी ते काम प्रपोझ केले आहे आणि ते आवश्यक आहे.

**आसिफ शेख :-**

मान्य आहे. सभागृह नेत्यांनी ते काम प्रपोझ केले आहे आणि आपण ते घेतले व ते आता मंजुरीला आले आहे. त्यांना विश्वासात घेउन सुसंवाद साधा.

**मिलन म्हात्रे :-**

पान क्र. ४८ ला आपण जो विषय चेंज केला आहे. ठराव क्र. ६० प्रकरण क्र. ५१ ग्रंथपाल पदाची सुधारित वेतन श्रेणी लागू करणेबाबत.

**दिपक खांबीत :-**

साहेब, सुधारित करुन दिलेले आहे.

**मिलन म्हात्रे :-**

पण ते हयाच्यात आलेले नाही आणि वर जे स्टेटमेंट आहे ते काय केले आहे ते वाचताच येत नाही.

**प्र. सचिव :-**

शब्द करेक्शन करुन ते देत आहे.

**मिलन म्हात्रे :-**

हयाच्यामध्ये आणखी हे कागदपत्रे जोडले आहेत हे मी वाचले आहे.

**प्र. सचिव :-**

प्रकरण क्र. ४६ आडवे न लावता बाहेर लावलेले आहे. प्रकरण क्र. ४६ ठराव आहे. आता दिनांक ८/७/०४ च्या प्रोसिडींगला सुरुवात करतो.

**धनराज अग्रवाल :-**

पान क्र. ३ मध्ये ज्या प्रभागात पाटया नाही. टाक्या बसवायचे होते.

**मिलन म्हात्रे :-**

पान क्र. १० मध्ये जे मी मघाशी बोललो, याच्यामध्ये तुम्ही सांगितलेले होते जरा आम्ही ते सगळे व्यवस्थित चेक करु. रु. ६,६५०/- ही सगळी त्या लिस्टमध्ये सारखीच अमाउन्ट दिली होती. त्याच्याबद्दल आपण काय केले? म्हणजे रु. १६,३५०/- ही सगळीकडे बहुतेक पाच-सहा कोष्टकामध्ये ती एकच अमाउन्ट आहे. काही बंद गाळे वगैरे आम्ही मेन्शन केले होते. इंडस्ट्रियलमध्ये सर्वे करा.

**रमेश मनाळे (मा. प्र. उपायुक्त (मुख्यालय) सो.) :-**

याबाबत आपण जे पूर्ण परवाना संदर्भातील जे रेटस आणले होते. ते ठाणे महानगरपालिका, कल्याण डोंबिवली महानगरपालिका यांच्या धर्तीवर आणले होते. तथापि आपल्याकडे ते सन्मा. सदस्यांनी याबद्दल सुचना केल्या की, आपल्याकडे याबाबत स्वतंत्र सर्वे केला जावा आणि त्यानुसार आपण स्वतंत्रपणे आपली परिस्थिती पाहून आपले रेटस ठरवावे. तर त्या अनुषंगाने अदयाप कारवाई करण्यात आलेली नाही. सर्वे करायला कालावधी लागणार आहे. ज्यावेळेस सर्वे करण्यात येईल सर्वे केल्यानंतर आपण आपले दर आपल्या इथल्या परिस्थितीशी पाहून आणि इथल्या हयाच्याशी पाहून आपण आपले दर निश्चित करुया. तर यासाठी थोडासा वेळ लागणार आहे. सर्वे करणे आणि इतर बाबी करणे.

**अशोक पाटील :-**

पण आपण प्रोसिडिंगची मंजुरी घेत आहात.

**रमेश मनाळे (मा. प्र. उपायुक्त (मुख्यालय) सो.) :-**

तो विषय फेटाळलेला आहे. विषय मागे घेतलेला आहे. चर्चा झालेली आहे.

**मिलन म्हात्रे :-**

तो जो मागे घेतलेला विषय आहे. त्याच्यामध्ये जो सभापतींचा आदेश आहे. सर्वे करुन त्याचा काही अर्थ नाही. हा जो आम्ही विषय तहकुब केलेला आहे. तो कशाकरिता तहकुब केलेला आहे? तुमच्या ठराव क्र. ६३ ला तसे आले पाहिजे. मा. सभापती सो. यांच्या आदेशानुसार सर्वे करुन सदर

विषय हा महासभेत मांडण्याकरिता तहकुब करण्यात येत आहे असे तिकडे पाहिजे. जे ठरले ते शेवटी आलेच नाही. तहकुब केला.

**रमेश मनाळे (मा. प्र. उपायुक्त (मुख्यालय) सो.) :-**

महासभेत घेण्यात यावा.

**मिलन म्हात्रे :-**

त्या लाईनमध्ये ते आले पाहिजे. तुमच्या प्रोसीडिंगमध्ये ते आले पाहिजे.

**प्र. सचिव :-**

दिनांक १६/७/०४ चे इतिवृत्तांत पहा.

**आसिफ शेख :-**

पान नं. ९ मध्ये पाणीपुरवठा विभागातर्फे हा जो विषय आलेला आहे. प्रकरण क्र. ४९ त्यामध्ये अनुक्रमांक १ ते ८ आणि आमच्या प्रभागात दोन सांगितलेले ४ लाख ९९ हजार ८७३ नेहरुनगर आणि लालबहाददुर शास्त्रीनगर वाढीव एस्टिमेट वगैरे. त्याचे काम प्रगतीपथावर आहे. मी ठराव मांडलेला आणि अनुमोदन सन्मा. माजी सभापती मोहन पाटील यांनी दिले आहे आणि खाली सन्मा. सदस्य हरेश गावंड आणि सन्मा. सदस्य दिनेश नलावडे आले आहे. आमच्यावतीने त्यांनी सहया करायला हरकत नाही.

**शरद पाटील :-**

पण ठराव झालेला आहे.

**आसिफ शेख :-**

सन्मा. सदस्य हरेश गावंड आमचे मित्रच आहेत. आम्ही सांगितले ते आमचे प्रगतीपथावर काम आहे. पण ते आले नाही.

**शरद पाटील :-**

प्रगतीपथावर ठिक आहे. पण ठरावाच्या सहया

**आसिफ शेख :-**

ती दोन कामे ॲडीशनल करायची होती.

**रमेश मनाळे (मा. प्र. उपायुक्त (मुख्यालय) सो.) :-**

जो ठराव क्र. ५३ होता. तो अवलोकनार्थ होता आणि त्याच्यात आपल्या अशा सुचना होत्या की, स्थायी समितीने मंजुर न करता मा. आयुक्त यांच्याकडे पाठविण्यात यावा. तथापि हा अवलोकनार्थ केला होता. याला कुठलीही मंजुरीचे अपेक्षा नाही. ठराव मंजुर करावा असेही काही नाही. हा फक्त अवलोकनार्थ सादर केला होता. सादर करण्यासाठी जो उशिर झाला होता. त्याबददल निश्चित सगळयांना सुचना देण्यात येतील. पण हा प्रस्ताव परत आयुक्तांकडे पाठविण्याची आवश्यकता नाही.

**धनराज अग्रवाल :-**

पण प्रस्ताव पाठविला आहे ना.

**रमेश मनाळे (मा. प्र. उपायुक्त (मुख्यालय) सो.) :-**

हा प्रस्ताव आयुक्तांकडे पाठविण्यात आलेला नाही.

**धनराज अग्रवाल :-**

त्या प्रस्तावाचे सभापती साहेबांनी लेटर दिलेले आहे.

**रमेश मनाळे (मा. प्र. उपायुक्त (मुख्यालय) सो.) :-**

ते लेटर याबाबतचे नाही आहे.

**आसिफ शेख :-**

दशोरे साहेब आमचे ते ८,९,१० याच्यामध्ये ॲड करुन घ्या. मंजुरी घेउन टाका. स्थायी समितीने मान्यता दिलेली आहे. त्यामुळे आपल्या प्रभागातील गरिबांचे काम करायचे. मान्यता घेउन टाका. सचिव साहेब, सभागृहात तशी नोंद करुन घ्या.

**रमेश मनाळे (मा. प्र. उपायुक्त (मुख्यालय) सो.) :-**

उशिरा पाठवायला नको. त्या सुचना मान्य केलेल्या आहेत. हा विषय अवलोकनात आलेला. त्याबाबतच्या सुचना मान्य केल्या जातील.

**धनराज अग्रवाल :-**

हयाची जबाबदारी स्थायी समिती घेत नाही.

**आसिफ शेख :-**

आम्ही म्हणतो, गरिबोंकी सुनो वो तुम्हारी सुनेगा। ठराव क्र. ६८ मध्ये ८, ९, १० लालबहाददुर शास्त्रीनगर त्याचे एस्टिमेट दोघांचे चार लाख नव्व्याण्णव हजार आठशे त्र्याहत्तर यासह दुरुस्ती करुन मंजुर. आठ आहेत. आमचे दोन मागचे झालेले ते ॲड करुन मंजुर.

**मिलन म्हात्रे :-**

हे प्रोसीडिंग संपवायच्या अगोदर जे पेन्डीग राहिलेले त्याचे क्लिअर करा आणि मग प्रकरण क्र. ६२ ला सुरुवात करा.

**रमेश मनाळे (मा. प्र. उपायुक्त (मुख्यालय) सो.) :-**

जो ठराव क्र. ५३ होता. जो आयुक्तांकडे सादर करण्यास सुचना देण्यात आलेल्या होत्या. तो परत आयुक्तांकडे सादर करण्याची आवश्यकता नाही आहे. तो अवलोकनार्थ दिलेला होता. फेटाळणे वगैरे येणार नाही. फक्त अवलोकनार्थ तो ठराव दिलेला होता.

**मिलन म्हात्रे :-**

सारखा सारखा समज करुन दिला जातो की, जी गोष्ट आयुक्तांनी अवलोकन केलेली आहे. त्याच्यात स्थायी समितीला जास्त चर्चा करायची नाही. तुमचे मत दयायचे नाही. हे सरासर चुकीचे आहे. कारण आम्ही आता जिकडे तिकडे लोकल सेल्फ गव्हर्नमेन्टला सचिवसाहेब आपण गेलो. याच्यामध्ये आयुक्त अवलोकन करतात. म्हणजे नेमके काय करतात? त्याच्यावर स्थायी समितीने काय करावे? याचे तिकडे प्रशिक्षण दिले गेले. यांच्या सेम रँकचे आयुक्तांचे तिकडे लेक्चर झाले. त्यांनी सांगितलेले आहे म्हणजे जे काही आम्हाला तिकडे कळले आहे आणि कोणी सांगायची देखील गरज नाही. उदया एखादया आयुक्तांनी काहीतरी पाठविले अवलोकनालाच मग पाठवू नका. ते तुमच्याकडेच ठेवा. इकडे मग पाठवता कशाला? एकदा अवलोकन झाले. जर चुकीच्या पध्दतीने मंजुरी मिळाली की झालेल्या सर्व जबाबदा-यांना स्थायी समिती ही सर्व सदस्यांसह जबाबदार असते. हे कायदयामध्ये आहे. आम्ही तेच म्हणतो आयुक्त अवलोकन करतात. हे मान्य आहे. त्याच्यामध्ये जर काही त्रुटी असतील किंवा प्रशासनाकडून काही चुकीचे झालेले असेल आयुक्तांना हे म्हणायचे आहे का? त्यांनी केलेले अवलोकन योग्य आहे. हे त्यांनी म्हणावे. मग आम्ही त्याच्यावर कुठलेही भाष्य करणार नाही. त्यांच्याकडून तशी ऑर्डर घेउन या. माझे झालेले अवलोकन अगदी शंभर टक्के बरोबर आहे आणि स्थायी समितीने त्याच्यावर निर्णय घ्यावा. फक्त एवढे लेखी आणा.

**रमेश मनाळे (मा. प्र. उपायुक्त (मुख्यालय) सो.) :-**

हा मुळात स्थायी समितीकडे निर्णय घेण्यासाठी विषय आलेला नव्हता.

**मिलन म्हात्रे :-**

विषयपत्रिकेवर विषय आलेला आहे आणि तुम्ही काय सांगता?

**रमेश मनाळे (मा. प्र. उपायुक्त (मुख्यालय) सो.) :-**

मी मान्यतेसाठी नाही बोललो.

**मिलन म्हात्रे :-**

मान्यतेचा प्रश्न नाही आहे. जे रेकॉर्डवर विषयपत्रिकेवर एकदा तुमचा विषय आला की, त्याच्यावर चर्चा, निर्णय आणि आमचे मत हे त्याच्यावर पाहिजे. आलेच पाहिजे. तो विषय आला म्हणून हा वाद आला. हा आलाच नसता तर वाद झालाच नसता आणि आयुक्तांनी जरी पन्नास हजाराची खरेदी केली तरी त्यांनी अवलोकनाला आमच्याकडे पाठविलेच पाहिजे. पाच हजाराची केली तरी पाठविले पाहिजे. पण ते आता हे अवलोकन करताना ते आयुक्तांनी लक्ष दिले पाहिजे. माझा स्पष्ट आरोप आहे की, आरोग्य खात्याच्या अधिका-यांनी आयुक्तांचीदेखील फसवणुक केलेली आहे. त्यांनी कळवायला पाहिजे की, आपली ही चुक झालेली आहे. एकतर दोघांमध्ये काय झाले असेल ते आम्हाला फक्त शेवटचे एवढेच पाहिजे. आयुक्तांनी अवलोकन केलेले आहे. ते योग्य आहे. एवढे फक्त आयुक्तांनी आम्हाला लेखी दयावे. बाकी काही नाही. मग हा वादच राहणार नाही. नंतर आमची पुढची लढाई आहे ती आम्ही लढू. मग ते इकडचे राहणार नाही. आम्हाला कुठे लढायचे ते बरोबर माहिती आहे. फक्त आयुक्तांकडून तुम्ही दोन ओळीचे आणा. मी जे अवलोकन केलेले आहे ते बरोबर आहे. बाकी आम्हाला काही नको. आम्हाला वादच घालायचा नाही. आम्ही किती लोकांना सांभाळायचे? उदया आमची मंजुरी मिळाली की, आयुक्त बोलणार मी काय करायचे ते केले. स्थायी समितीने निर्णय देताना विचार करायला पाहिजे होता. त्यांनी निकाल दिला. त्यांच्या निकालानुसार हे योग्य आहे. हे आयुक्त बोलणार. त्याकरिता त्यांच्याकडून फक्त दोन ओळीचे लेखी आणा. अमुक हे अवलोकन माझ्या परिने बरोबर आहे. नंतर बाकीचे काय ते आम्ही बघतो.

**रमेश मनाळे (मा. प्र. उपायुक्त (मुख्यालय) सो.) :-**

हे फक्त मुळात नियम ७३(ड) नुसार दिलेले आहे. नियम ७३(ड) मध्ये असे क्लिअरली मेन्शन केलेले आहे की, पन्नास हजार रुपयापेक्षा अधिक. परंतु, दहा लाख अन्वये किंवा इतर ह्याच्यानुसार जी काही रक्कम विहित करण्यात आलेली आहे. त्याहून अधिक रक्कम यापेक्षा अधिक नसलेला खर्च अंतभूत असेल अशा आयुक्तांनी केलेल्या प्रत्येक समितीची माहिती त्यांनी समितीस कळविले पाहिजे. या अधिनियमाची अंमलबजावणी करताना इतर प्रसंगानुरुप जी संविध करावी लागेल अशा प्रत्येक संविधेस या कलमाची पूर्वगामी तरतुदी शक्यतोवर लागू होतील आणि या कलमाच्या ज्या तरतुदी मुळ संविधेस लागू असतील अशा संविधेच्या कोणत्याही बदलास किंवा मुक्ततेस लागू होतील.

**मिलन म्हात्रे :-**

बरोबर आहे ना. याचा काय अर्थ होतो सांगा पाहू. आपण जे अगोदर सांगितले ते आम्ही जवळजवळ शंभर वेळा स्थायी समितीला ऐकलेले आहे. मागच्या चार ओळी जरा आम्हाला काय डेफिनेशन आहे ते सांगा. तुम्ही फक्त सोयीचे तेवढे वाचले. पुढचे वाचलेच नाही.

**रमेश मनाळे (मा. प्र. उपायुक्त (मुख्यालय) सो.) :-**

जी कुठली संविधा केली जाईल त्याला पूर्वगामी तरतुदी शक्यतो लागू होतील. पूर्वगामी म्हणजे याच अ,ब,क,ड,ई.

**मिलन म्हात्रे :-**

त्यामध्ये ७३(ड) देखील आहे. मग ते अवलोकन करताना काय काय करायचे ते पण आले. म्हणजे जी पंधरा दिवसाची मुदत आहे. ती पण आली हे स्पष्टपणे बोला. आयुक्तांना ते बंधनकारक आहे.

**रमेश मनाळे (मा. प्र. उपायुक्त (मुख्यालय) सो.) :-**

ते मी कबुल केलेले आहे की, पंधरा दिवसाच्या आत देणे आवश्यक आहे आणि त्याबाबत सुचना देण्यात आलेली आहे.

**मिलन म्हात्रे :-**

हा सेक्शन वाचायची गरजच नाही. साहेब, आम्हाला माहिती आहे. आम्ही तेच म्हणतो की, आमची जी सुचना होती तुम्ही त्याच्यावर तोंडी कारवाई केली.

**रमेश मनाळे (मा. प्र. उपायुक्त (मुख्यालय) सो.) :-**

मी ही सुचना मान्य केलेली आहे आणि याबाबत तात्काळ कारवाई करुन सर्वांना लेखी सुचना देण्यात येतील.

**मिलन म्हात्रे :-**

तुम्ही त्याच्यावर दिले आहे का? बघा, आमचा कुठे वाद आला. हयाला आता जो काही जबाबदार आहे. प्रश्न पैसे किती? त्याचा नाही आहे. त्यांनी जर पंधरा दिवसात आमच्याकडे पाठविली असती तर आम्ही त्यांना परमिशन दिली नसती का? दिली असती. पण न देता त्यांनी आयुक्तांनादेखील मिसगाईड केले. आम्हालादेखील केले, सभापतींनादेखील केले आणि तुम्हालादेखील केले. आता समजा अनावधानाने झाले. झाले करुन मंजुरी झाली असती. कारभार आटोपला असता. साहेब, तुमचे सेक्शन क्लिअर म्हणजे याच्यामध्ये वाद काहीच नाही. तुम्ही नंतरदेखील कारवाई केली नाही. एवढे लाईटली घेता. तुम्ही तोंडी सुचना देता.

**मा. सभापती :-**

आपण गेल्या सभेला त्याला नामंजुरी दिली तर आपण आता पुरे करु या आणि पुढचा विषय घेउ या. आपल्या स्थायी समितीवर ते येणार नाही.

**मिलन म्हात्रे :-**

साहेब, पुढच्या सभेत आम्ही नसणार आहोत. परत एकदा तुम्हाला सांगतो याच्या पुढच्या काही सभा तुम्हाला चालवायच्या आहेत. आपल्याकडे एक फार गैरसमज आहे की, आयुक्तांनी जे काही अवलोकन करुन पाठविले आहे. ते डोळे झाकून पास करायचे. तसे नाही आहे. तरतुदी वगैरे नसतील आणि आयुक्तांनी अवलोकन केलेले आहे असे दोन-तीन प्रकार झालेले आहेत असे नाही आहे. आम्ही जे म्हणतो त्याच्यामध्ये हयांनी जर काही लेखी कारवाई केली असती तर हा एवढा चर्चेला विषय आलाच नसता. एक लेखी दोन ओळीची शोकॉज नोटिस. संपले. इकडे प्रोसिडींगला रेकॉर्ड होते. तुम्ही जे कोण असतील त्यांना नोटिस काढा. त्याच्यावर लेखी नोटीस काढा. आमचा ठराव पास केलेला आहे.

**रमेश मनाळे (मा. प्र. उपायुक्त (मुख्यालय) सो.) :-**

आपल्या सुचना मान्य केलेल्या आहेत आणि तात्काळ सर्व संबंधितांना याबाबत लेखी सुचना देण्यात येतील.

**मिलन म्हात्रे :-**

आम्ही ठराव क्र. ५६ मंजुर केलेला आहे. तुम्हाला स्पष्ट सांगतो. तुम्ही नाही करायला लागले तर पुढच्या दोन-तीन सभेनंतर मी तुम्हाला करायला लावेन. ती कला मला अवगत आहे. मला तेवढे करायला लावू नका.

**प्रकरण क्र. ६१ :-**

दि. ०१/०७/२००४, दि. ०८/०७/२००४ व दि. १६/०७/२००४ रोजीचे मा. स्थायी समितींचे इतिवृत्तांत कायम करणे.

**ठराव क्र. ७० :-**

दि. ०१/०७/२००४, दि. ०८/०७/२००४ व दि. १६/०७/२००४ रोजीच्या मा. स्थायी समितीच्या इतिवृत्तांतामध्ये मा. सदस्य यांनी सुचविलेल्या दुरुस्त्यांसह इतिवृत्तांत कायम करण्यांत येत आहेत.

**सुचक :- श्री. हरेश गावंड.** **अनुमोदन :- श्री. दिनेश नलावडे.**

**ठराव सर्वानुमते मंजुर**

**सही/-**
**सभापती**
**स्थायी समिती सभा**
**मिरा भाईंदर महानगपालिका**

(प्र. सचिवांनी प्रकरण क्र. ६२ चे वाचन केले.)

**मिलन म्हात्रे :-**

साहेब, हा जो गटनेत्यांच्या कार्यालयाचा प्रश्न आहे. हा प्रश्न सर्रास प्रशासनाच्यावतीने दुर्लक्षित ठेवलेला आहे. नउ नंबरची आमची जी सोय आहे. पहिली गोष्ट तर गटनेत्यांची कार्यालये दिवसभर चालू नसतात. आम्ही लोक येतो दोन-तीन तास बसतो आणि निघून जातो. तेवढया कालावधीपर्यंतसुध्दा जर आम्हाला ही सोय मध्यंतरी कट केली. ती बंद करताना आम्हाला कोणी विचारात घेतले का? केळकर साहेबांनी खाली आदेश दिला आणि त्यांनी सांगितले की, ही सुविधा बंद करा. एकतर तुमचा बोर्ड एवढा बिझी असतो की, त्याच्यावर लाईनच मिळत नाही. आमच्या बाकीच्या काही गटनेत्यांना बाहेर आउटगोइन्ग कसा लावायचा तेच माहिती नाही. आमची अशी स्पष्ट मागणी आहे की, आम्हाला डायरेक्ट फोन दया.

**मोहन पाटील :-**

सभापती महोदय, जर गटनेत्यांना वेळच नसेल दोन-तीन तास बसत असतील तर त्यांना ही सुविधा कशाला पाहिजे? आवश्यकताच नाही.

**मिलन म्हात्रे :-**

तुमचे तुम्ही बोला. आमच्या मोबाईलची रेन्ज आतपर्यंत पोहोचत नाही. त्यामुळे आम्हाला तो नाईलाजाने वापरावा लागतो.

**मोहन पाटील :-**

जर तीन तास त्यांच्या म्हणण्यानुसार गटनेत्यांना वेळ असेल तर सुविधा कशाला दयायला पाहिजे?

**मिलन म्हात्रे :-**

आम्ही अर्धा तास बसु. आमच्या कार्यालयाला फोन पाहिजेत की नाही हे बोलणारे तुम्ही कोण? मी माझ्या कार्यालयाशी बोलतो. मला फोन पाहिजे. माझे बोला.

**मोहन पाटील :-**

मी तुमच्याशी बोलत नाही. सभापतींशी बोलतो आहे.

**मिलन म्हात्रे :-**

ज्यांना कोणाला नाकारायचे असतील तर तुम्ही त्यांचे कट करुन टाका.

**मोहन पाटील :-**

त्यांनी स्पष्ट केले की, आम्हाला बसायला दोन-तीन तास वेळ असतो. आम्हाला वेळ नसतो. तर ज्यांना वेळ नसतो. त्यांनी बोलावे. मी माझे बोलत नाही.

**मिलन म्हात्रे :-**

मी कबुल करतो.

**मोहन पाटील :-**

त्या सदस्यांनी सांगितले की, आम्हाला दोन-तीन बसायला वेळ असतो. तर मग ही सुविधा कशाला पाहिजे? मला असे बोलायचे आहे आणि जर ही सुविधा हवी असेल तर सभापती महोदय, आपण प्रशासनाला सांगून या फोनच्या लाईन आपल्या वाढवा आणि फोनच्या लाईन वाढवून ही सुविधा निर्माण करुन दया. आता आपल्याकडे फोन चालू आहेत. आता सध्या जरी मी महापौरांच्या दालनात बसलो तरी त्यावेळेला आम्हाला लाईन मिळत नाही आणि जर ही सुविधा आपण चार-पाच दालनामध्ये निर्माण केली तरी पुढे लाईन मिळणार नाही. यासाठी आपण नवीन दूरध्वनी मागवा, वाढवा आणि नंतर तुम्ही विचार करा असे मला बोलायचे आहे.

**मिलन म्हात्रे :-**

मी स्पष्ट सांगतो. आम्हाला त्याच्याबददल काहीच म्हणायचे नाही. आमचे ऑफिस तिकडे दिवसभर चालू नसते आणि आम्हाला जो अधिकार आहे तो पाहिजे.

**धनराज अग्रवाल :-**

सभापती महोदय, राष्ट्रवादी काँग्रेस आणि काँग्रेस यांना तीन-चार केबीन आहेत. दूरध्वनीची सुविधा आहे. आम्हाला कसलीच सुविधा नाही आहे.

**मिलन म्हात्रे :-**

सगळे काही त्यांना आहे. अख्खा दुसरा मजला संपूर्ण आहे. एक फोन नाही दहा फोन लागतील. डायरेक्ट लाईनदेखील आहेत. कोणी असे बोलू नये की आम्हाला त्या लाईनवरुन बोलायचे आहे.

**मोहन पाटील :-**

लाईन न देण्याविषयी विषय नाही आहे. असा विषय आहे की, आपण जर दूरध्वनी वाढवले तर त्यांना सगळया लाईनची दूरध्वनी सुविधा मिळेल.

**धनराज अग्रवाल :-**

माझा सांगण्याचा हेतू असा आहे की, याच्यामध्ये जरा गोषवारा बघा. परस्पर फोनचा उपयोग करतील. त्यामुळे टेलिफोनचे बिल मोठया प्रमाणात होण्याची शक्यता आहे. म्हणजे आम्ही फोन करणार ते मोठया प्रमाणात वाटणार आहे. त्यांना सगळयांना ए.सी. गाडया पाहिजेत.

**मिलन म्हात्रे :-**

ए.सी. पाहिजे. बाहेरचे ज्यांचा काही संबंध नाही अशी माणसे ॲन्टी चेंबरमध्ये बसून केवढा उपयोग करतात.

**धनराज अग्रवाल :-**

आम्ही फोन केला तरी महापालिकेवर बोजा येणार आहे.

**मिलन म्हात्रे :-**

त्यांचे फोन टेप कोण करणार? आम्हाला अधिकार आहे. मी नगरसेवक आहे.

**मोहन पाटील :-**

आम्ही तुम्हाला समर्थपणे सांगतो लाईन वाढवा.

**शरद पाटील :-**

आज फक्त टेलिफोनचे बिल गटनेत्यांना फोन दिल्यानंतर वाढेल. मग तुम्हाला ए.सी. गाडया आणि हे कशासाठी पाहिजे.

**मिलन म्हात्रे :-**

चर्चा होउ दे. हा विषय चर्चेला आलेला आहे. हा गोषवारा देताना कोणी विचार केला पाहिजे की नाही.

**चंद्रकांत वैती :-**

आम्ही चर्चाच करित आहोत. सन्मा. सदस्य मिलन म्हात्रे साहेब, गटनेत्यांच्या केबीनला नऊ नंबरची सुविधा देण्याबाबत असा विषय आलेला आहे.

**मिलन म्हात्रे :-**

नुसते ९ नंबरचे नाही. आम्हाला क्लार्कसुध्दा देण्याचे मान्य केलेले होते. परंतु, शिपाईसुध्दा साधा दिलेला नाही.

**चंद्रकांत वैती :-**

विषयामध्ये प्रशासनाकडून असे येते की, दूरध्वनीचा दुरुपयोग केला गेला नाही पाहिजे. दुरुपयोग म्हणजेच असे म्हणायचे आहे की, मोठया प्रमाणावर बिल येण्याची शक्यता आहे. शक्यता अशा नाकारता येत नाहीत. त्यांनी शक्यता धरली तर त्यांचे जे कर्तव्य होते. त्या कर्तव्याला अनुसरुन त्यांनी आपल्याला सांगितलेले आहे. आता आपल्याकडून आपण थोडीशी काळजी घेतली पाहिजे. आपण फक्त कुठल्या तरी पक्षाचेच नेतृत्व करतो असे नाही. तर जनतेचे आपण प्रतिनिधीत्व करित असतो. आपण शहराला काय चांगले देता येईल म्हणूनच फोनचा वापर करु. त्या दूरध्वनीवरुन आपण काय जेवायला केलेले आहे? आणि मी जेवायला किती वाजता येउ? असा प्रश्न आपण विचारणार नाही. तो लोकांच्या हितामध्ये विचारु. सन्मा. सदस्य मोहन पाटीलसाहेबांनी सांगितले की, आपल्याकडे असलेल्या लाईनमध्ये अधिक व्यस्तता असते तर लाईन वाढवण्याबाबत चांगली सुचना आहे. या सुचनेचा प्रशासनाने विचार करावा आणि ९ नंबरची सुविधा उपलब्ध करुन देण्यात यावी या मताचा मी आहे. त्या गोष्टीला विरोध नाही. परंतु, आपणदेखील एका गोष्टीचे तारतम्य बाळगले पाहिजे. जशी आता मला आजची माहिती मिळाली आहे. आमचे स्वीय सहाय्यक आहेत त्यांनी सांगितले की, आयुक्तांनी सर्व केबीनच्या दूरध्वनी बिलाचा आढावा घेतलेला आहे. आपल्या केबीनचे बिल साधारणपणे रु. १५०० ते रु. १६०० येते. परंतु, तुम्ही उपमहापौर झाल्यापासून आपल्या दालनामध्ये खूप लोक येतात. तर काही लोक फोनला हात लावतात. तर मी त्यांना काही बोलू का? असे मला विचारले. म्हणजे एकूण प्रशासन सर्व गोष्टींची नोंद घेत असते आणि ही नोंद घेताना उदया कोणावर असा मोठा आक्षेप होईल की, तुमच्याकडून दूरध्वनीचा जास्त वापर केला गेला तर असा प्रकार न होता आपण ही काळजी घेतली पाहिजे आणि गटनेत्यांच्या दालनाना ९ नंबरची सुविधा दयावी आणि ही सुविधा दिल्यावर आपल्या लोकांनी प्रत्येक गटनेत्यांनी तिथे काळजी घ्यायची आहे की, आपल्या दूरध्वनीचा जास्त वापर आपल्या व्यतिरिक्त इतर कोणी करणार नाहीत. याची काळजी घ्यायची आणि ९ नंबरची सुविधा देण्याबाबतचा मी ठराव मांडत आहे.

**मिलन म्हात्रे :-**

आपण जी सुचना केली. प्रत्येकाचे डिटेल काढा. बिल येउ दया. आमचे पण किती येते ते आणि प्रत्येकाचे डिटेल काढा.

**मोहन पाटील :-**

मिरा भाईंदर महानगरपालिका झाल्यानंतर सुविधा मिळायला पाहिजेत. या ठिकाणी काही सदस्यांनी सांगितले त्यांना ए.सी. गाडया पाहिजेत . ए.सी. गाडया नाही पाहिजेत. जर जेव्हा नगरपालिकेची महानगरपालिका होते. जेव्हा पदाधिकारी होते. आपणसुध्दा सत्तेमध्ये या आणि आपण आपण यावे अशी आमची इच्छा आहे. पण आल्यानंतर आपण दुस-याकडे एक बोट दाखवतो तेव्हा आपल्याकडे चार बोटे असतात. त्याचा आपण विचार केला पाहिजे. परंतु, आम्हाला ते बोलायचे नाही आहे. जेव्हा सर्वसामान्य आलेले पदाधिकारी त्यांना सुविधा दिल्या पाहिजेत. पदाधिकारी म्हणून आपणदेखील आहात. जर या ठिकाणी महापालिकेने गटनेता म्हणून आपल्याला पद दिलेले आहे, आपल्या पक्षाने पद दिलेले आहे. शिफारस केलेली आहे. आपण या मिरा भाईंदर महानगरपालिकेमध्ये या पदी आलेले आहात. म्हणून आपल्याला कोणतीही सुविधा न मिळावी हा विषय नाही आहे. प्रशासनाने आर्थिक बाबतीमध्ये जर सुचना केली असेल, तर सुचना केल्याचा खुलासा सन्मा. उपमहापौर चंद्रकांत वैतीजी यांनी सांगितले की, त्यांच्या दालनामध्ये येणारा जो नागरिक किंवा जो येणारा जास्त जास्त जो वर्ग आहे. ज्याच्यामुळे जर दूरध्वनीचा दुरूपयोग होत असेल तर त्याच्यावर नियंत्रण ठेवले पाहिजे. असा मोठेपणा उपमहापौरांनी या ठिकाणी दाखविला तर आपल्याला प्रशासनाने काय बोलायला पाहिजे हा विषय होउच शकत नाही आणि तो विषय होउ नये. याला अनुमोदन होण्यापूर्वी मला या सुचना मांडायच्या आहेत की, आपण प्रथम नवीन फोनची सुविधा करा आणि ही सुविधा निर्माण केल्यानंतर काय होईल? पुन्हा वरदेखील असेच प्रॉब्लेम होणार आहेत. वर आणि खाली असलेले पदाधिकारी यांना एकच दर्जा आहे. त्यांचा मान-सन्मान तेवढाच आहे. त्यांच्या मानसन्मानामध्ये कुठे काही कमी नाही आहे किंवा गटनेते म्हणून त्यांच्या इथून ज्या पध्दतीने सुविधा उपलब्ध करायला पाहिजे. ती सुविधा आपण दिली पाहिजे. परंतु, जर फायनान्शिअल बाबतीत जर काही सुचना प्रशासनाने मांडल्या असतील त्याच्यावर एवढी तीव्र भूमिका घेण्यापेक्षा आपण आपली खबरदारी घेतली

पाहिजे अशाप्रकारची भावना प्रत्येक पदाधिका-यांनी, गटनेता असू दे, अन्य कुठलाही पदाधिकारी असू दे. त्याने प्रत्येकाने घेतली पाहिजे आणि आपण यापुढे नवीन सुविधा करण्याकरिता नवीन फोन त्वरित मागवावे. असे सभापती महोदय मी विनंती करतो आणि या ठरावास मी माझे अनुमोदन देत आहे.

**मिलन म्हात्रे :-**

आयुक्तांचे जे कमेन्टस आहे. प्रत्येक सभेमध्ये याच्यावर चर्चा झालेली आहे. ठाणे महानगरपालिकेमध्ये सहानंतर सगळया लाईटस बंद केल्या जातात. ए.सी. केबीन ज्याच्यामध्ये ए.सी. आणि लाईट ज्याच्यामध्ये आपला अधिकारी केबीनच्या बाहेर निघतो. तेव्हा सगळे बंद केले जाते. मी लाईट आणि टेलिफोनबददल बोलत आहे. प्रत्येक डिपार्टमेन्टला कोण ना कोणतरी फोनवर बसलेले असते.

**मोहन पाटील :-**

ठराव झाल्यानंतर तुम्ही बोलता.

**मिलन म्हात्रे :-**

आम्हाला माहिती होते. हे तुम्ही बोलणार म्हणून मी मघाशी उभा राहिलो होतो. हे आम्हाला माहिती आहे. आम्ही दोन वर्षे तुमच्याकडून शिकलेलो आहे. तुम्ही प्रशासनाच्या हया गोष्टी करता त्याच्यावर कोणी आयुक्तांनी आदेश काढले आहेत का? की ज्या केबीनला अधिकारी नसतील त्याचे लाईट बंद करा. ए.सी. बंद करा. टेलिफोन बंद रहायला पाहिजे. केबीन बाहेरुन लॉक झाला पाहिजे. जर अधिकारी नाही आहेत. आता सन्मा. सदस्य चंद्रकांत वैतीसाहेब नाही आहेत. तर ते केबीन लॉकच करुन टाका. प्रश्नच येणार नाही. लाईट ए.सी. सगळयाचीच बचत होईल. हयाच्यावरती मागच्या दोन-तीन वेळेला चर्चा झाली. आयुक्त तेच आहेत. प्रशासनाकडून आपल्या कुठल्याही डिपार्टमेन्टला कुठलेही साधे पत्रक नाही की ही बचत करण्याकरिता हे करावे. हयाच्याबददल आपण काय केले?

**धनराज अग्रवाल :-**

लोकप्रतिनिधीसाठी सगळे नियम लागू आहेत. प्रशासनाला कुठलाही नियम लागू नाही.

**मिलन म्हात्रे :-**

प्रशासनाबद्दल काय?

**मा. सभापती :-**

प्रशासनाचीदेखील माणसे असतात ना.

**मिलन म्हात्रे :-**

शिपाई लोक फोन घेउन तासनतास बोलत राहतात. मी बघितलेले आहे.

**धनराज अग्रवाल :-**

त्यांनादेखील नियम लागू होउ दया.

**मा. सभापती :-**

लाईट, ए.सी. बंद केला तर ते कुठे जाणार?

**आसिफ शेख :-**

सभापती साहेब, मला वाटते आदेशाची वगैरे आवश्यकता नाही. प्रत्येकाने आपल्यावरुन जग ओळखायला पाहिजे. हे संकेत असतात.

**मिलन म्हात्रे :-**

तुम्ही प्रत्येक केबीनचा हिशेब दया. तुम्हाला जसे रु. १६००/- आले. तसे प्रत्येक हयाचे काढा. ॲन्टी चेंबरचे पण काढा.

**याकुब कुरेशी :-**

ठिक आहे. ठराव मंजुर झालेला आहे. तर पुढचा विषय घ्यावा अशी मी प्रशासनाला विनंती करतो.

**मा. सभापती :-**

आपण प्रशासन किती पैसा खर्च करतो? तो आपण हिशेब मागतो का?

**मिलन म्हात्रे :-**

मागितला पाहिजे. आमचे हिशोब तुम्ही घ्यायला लागलात की, आम्ही केबीनमध्ये बसल्यानंतर टेलिफोन बिल एवढे येते.

**चंद्रकांत वैती :-**

माझा सांगण्याचा असा उद्देश होता की, हे जे आहे की आपण लोकप्रतिनिधींनी काय पाळले पाहिजे आणि दुसरे दूरध्वनी एवढ्यासाठीच आले पाहिजेत की, आपल्याला वरच्या कर्मचाऱ्यांना, अधिकाऱ्यांना लाईन मिळणार नाही. त्यांची लाईनदेखील वारंवार बिझी राहिल म्हणून जेव्हा सन्मा. सदस्य मोहन पाटील यांनी सांगितले की, दुसऱ्या अतिरिक्त लाईन मागविल्या पहिजेत आणि ते गरजेचे आहे आणि त्याबाबत योग्य ती कार्यवाही तातडीने व्हायला पाहिजे.

**आसिफ शेख :-**

सन्मा. सदस्य मोहन पाटील यांनी जी सुचना केलेली आहे की, दूरध्वनी अजून नवीन मागायचे आहेत. तर अजून पाच-सहा नवीन दूरध्वनी मागवून घ्या.

**मा. सभापती :-**

मी सात दिवसाचा अवधी देतो. सात दिवसात नउ नंबर चालू होईल.

**मिलन म्हात्रे :-**

चालू होईल म्हणजे काय? बंदच करायचा नाही आहे. आम्ही सागितले आम्ही तीनच तास बसतो आहे. सन्मा. सदस्य चंद्रकांत वैतीसाहेब दिवसभराचा हिशेब देतात.

**मा. सभापती :-**

आणखी फोन लावण्याची सुविधा उपलब्ध करुन देउ.

**मिलन म्हात्रे :-**

ते तुम्हाला काय करायचे ते करा. आमच्या सुविधा बघा. अजून आम्हाला शिपाई मिळालेले नाहीत. आमच्याकडे कोण क्लार्क नाही आहे.

**मा. सभापती :-**

हा विषय शिपाई आणि क्लार्कचा नाही.

**मिलन म्हात्रे :-**

मग आला पाहिजे ना. तो घेतला का नाही. आम्हाला जी नियमात तरतुद आहे ती झालीच पाहिजे असे नाही आहे. हे तुम्ही उदार असे दिलेले नाही. केबीनसाठी आम्हाला भांडायला लागले आहे.

**दिपक खांबीत :-**

साहेब, सगळया डिपार्टमेन्टला टेलिफोन, लाईट व पंखे गरज नसेल तेव्हा किंवा बाहेर जात असेल तेव्हा बंद करावेत असे परिपत्रक काढले आहे.

**मिलन म्हात्रे :-**

त्याचे कोण अंमल करते का?

**दिपक खांबीत :-**

तुम्ही बोललात की, केबीन पण बंद करायच्या. तुम्ही निर्णय घ्या.

**मिलन म्हात्रे :-**

अधिकारी नसेल तर केबीन बंद करायलाच पाहिजे.

**आसिफ शेख :-**

ते संकेत पाळायचे सांगितले ना. पुन्हा पुन्हा काय ते? आदेशाची आवश्यकता नसते. पत्रकाची आवश्यकता नसते. संकेत पाळायचे असतात.

**प्रकरण क्र. ६२ :-**

महानगरपालिकेतील सर्व पक्षाचे गटनेते यांचे कक्षांत दूरध्वनी सेवेमध्ये क्र. ९ ची सेवा उपलब्ध करुन देणे बाबत.

**ठराव क्र. ७१ :-**

मिरा भाईंदर महानगरपालिकेत मुख्य कार्यालाच्या तळमजल्याव विविध पक्षाचे गटनेते व त्या पक्षाचे नगरसेवक यांना स्वतंत्र कार्यालय फर्निचरसह व दुरध्वनीची व्यवस्था करुन देण्यांत आली आहे. दुरध्वनीची व्यवस्था देते वेळी त्यांच्या कार्यालयास बाहेरुन येणारे कॉल हे प्रथम महानगरपालिकेच्या टेलिफोन बोर्डवर ऑपरेटर जवळ येतात. त्यानंतर ऑपरेटरकडून संबंधीत पक्ष कार्यालयात आलेला फोन वर्ग केला जातो. तसेच जर पक्ष कार्यालयातून गटनेते अथवा नगरसेवक यांना बाहेर फोन करावयाचा असल्यास त्यांना प्रथम बोर्डवर फोन करुन नंबर द्यावा लागतो. यात बराच कालावधी लागत असल्याने व बोर्डवर नेहमी टेलिफोन कार्यरत (बिझी) रहात असल्याने विशेष करुन विलंब लागतो. परंतु, काही प्रसंगी तातडीच्या वेळी संपर्क करावयाचा असल्यास गैरसोय होते. करिता प्रत्येक

पक्षाच्या गटनेत्यांना त्यांच्या कक्षामधूनच परस्पर टेलिफोन करणे शक्य होणेकरिता टेलिफोन बोर्डवर असलेली नऊ नंबरची सुविधा प्रत्येक गटनेत्याच्या कक्षात टेलिफोनवर उपलब्ध करुन देण्याबाबत मागणी आहे.

तरी प्रथम टेलिफोन संख्येत वाढ करावी म्हणजे टेलिफोन बोर्डवर लाईन बिझी राहणार नाही. प्रत्येक गटनेत्यांच्या कक्षात टेलिफोनवर नऊ नंबरची सुविधा उपलब्ध करुन देण्यांस मंजुरी देण्यांत येत असून येणाऱ्या खर्चास मंजुरी देण्यांत येते.

**सुचक :- श्री. चंद्रकांत वैती.** **अनुमोदन :- श्री. मोहन पाटील.**

**ठराव सर्वानुमते मंजुर**

**सही/-**
**सभापती**
**स्थायी समिती सभा**
**मिरा भाईंदर महानगपालिका**

(प्र. सचिवांनी प्रकरण क्र. ६३ चे वाचन केले.)

**आसिफ शेख :-**

विषय क्र. ६३ ची आम्ही टिपणीच दिली नाही.

**जोजफ घोन्सालवीस :-**

या पाईपलाईन जास्त कुठे पडणार आहेत? कुठल्या भागात जास्त पडणार आहेत.

**याकुब कुरेशी :-**

प्रकरण क्र. ६३ ची टिपणी दिलेली नाही.

**चंद्रकांत वैती :-**

त्या लाईन वीस ठिकाणी टाकायच्या आहेत.

**जोजफ घोन्सालवीस :-**

मिरा रोडमध्ये टेंडर व काहीही न करता पहिलेच लाईन पडलेले आहेत.

**हॅरल बोर्जीस :-**

काही सदस्यांना टिपणी दिलेली नाही तर कृपया त्यांना टिपणी देण्यात यावी.

**जोजफ घोन्सालवीस :-**

मिरा रोडला निविदा काढण्याच्या अगोदरच पाईप लाईन टाकण्यात आलेली आहे. मी तुम्हाला दाखवतो आणि येथे चार-पाचदा टेंडर काढूनही कुणीही आले नाही. याला कारण काय? हा ठराव पास होउन जवळ जवळ किती महिने झाले आहेत?

**एस. के. दशोरे :-**

निविदा न काढता कुठेही पाईप लाईन टाकण्याचे काम झालेले नाही. असे कुठेही झालेले नाही.

**जोजफ घोन्सालवीस :-**

आता मी तुम्हाला दाखवतो. मिरा रोडला असे झाले आहे.

**चंद्रकांत वैती :-**

असे कुठे झाले ते आपण आम्हाला दाखवा. मग आमच्या मागण्या आहेत. त्या दाखवतो की, कुठे पाईप लाईन टाकायच्या आहेत. हे टेंडर चार वेळा मागे गेले आहे आणि मिरा रोडमध्ये पाच ठिकाणी पाईप लाईन टाकायचे आहेत. ते अजून टाकले नाही.

**जोजफ घोन्सालवीस :-**

चार पाच वेळा निविदा काढले आहेत. पण असे चार पाच वेळा कुठेच निविदा काढल्या नाहीत.

**मोहन पाटील :-**

सभापती महोदय, हा गेल्या चार-पाच वेळा विषय गेलेला आहे आणि उत्तन सारख्या ठिकाणी आज पाणी नाही आहे.

**चंद्रकांत वैती :-**

उत्तनला पाण्याची लाईन टाकण्यात आलेली नाही असे चर्चेला बोलेले गेलेले आहे.

**आसिफ शेख :-**

निविदेचा प्रश्न नाही. आपण हयाच्या विरोधात आहात का?

**जोजफ घोन्सालवीस :-**

हयाला कोण विरोध करतोय, पाण्याच्या पाईप लाईनसाठी.

**एस. के. दशोरे :-**

साहेब, हयाच्यामध्ये भाईंदर, मिरा रोड सगळे आहे.

**जोजफ घोन्सालवीस :-**

हे सगळे आम्ही जाणतो. पण आतापर्यंत उत्तनला पाण्यापासून वंचित ठेवले हयाला कारण फक्त आम्ही ठराव पास केला आणि राजकारण. तुम्ही आकस म्हणून अजूनपर्यंत काम केले नाही.

**मा. सभापती :-**

पेपरला चार वेळा जाहिरात दिली पण कोण आले नाही.

**जोजफ घोन्सालवीस :-**

दुसऱ्या ठिकाणी तुम्ही लगेच घेतले. येथे का उशीर झाला.

**मा. सभापती :-**

उशिरा घेतले नाही. चार वेळा पेपरला जाहिरात दिली होती.

**जोजफ घोन्सालवीस :-**

भाईंदरमध्ये कुठेच लाईन पडली नाही का? असे कसे बोलता तुम्ही? इथे ठराव पास केले, इथे लाईन टाकायची आहे, तिथे लाईन टाकायची आहे. त्यावेळेला भाव वाढले नाहीत. इथे फक्त भाव वाढलेले आहेत. मी बोलता होतो की मी स्वतः कॉन्ट्रॅक्ट घेतो. ही पाण्यासारखी गरजवंत गोष्ट आहे. त्याच्यामध्ये तुम्ही राजकारण करता.

**दिनेश नलावडे :-**

सन्मा. सभापती साहेब, आपल्याकडे हा जो प्रकरण क्र. ६३ आला आहे. हा विषय माझ्या मते चार वेळा नामंजुर झाला होता. त्याचे निविदा स्विकारले नाही. परत पुन्हा हा विषय आपल्याकडे आलेला आहे. हा रितसर विषय आलेला आहे. सध्या भाईंदरमध्ये भरपूर ठिकाणी पाण्याची पाईप लाईन टाकण्याची आवश्यकता आहे. उत्तनसारख्या ठिकाणी, माझ्या प्रभागात आणि बाकीच्या ठिकाणी हा विषय फार महत्वाचा आहे आणि संपूर्ण मिरा भाईंदरमध्ये वीस ठिकाणी पाईप लाईन टाकायचे आहे. हया विषयाच्या मंजुरीसाठी मी ठराव मांडत आहे.

**मोहन पाटील :-**

अनुमोदन देण्यापूर्वी मला बोलायचे आहे, मिरा भाईंदर परिसरामध्ये पाण्याचा एवढा अभाव आहे. ज्याच्यामुळे उत्तनमध्ये जी परिस्थिती झालेली आहे. तर सभापती महोदय हया उत्तनच्या हया ठिकाणी पाईप लाईनमध्ये डी.एस.आर. मध्ये जो फरक होता. त्या फरकामुळे बऱ्याच वेळेला ही निविदा परत गेलेली आहे. ज्याच्यामुळे उत्तन या ठिकाणी पाण्याचा अभाव झालेला आहे आणि उत्तनला पाणी मिळावे म्हणून सन्मा. सदस्य सांगतो, आपण पहिल्यांदा या ठिकाणी आक्षेप घेतला आणि हयाच्यावर बरीच चर्चा सुरु झाली.

**जोजफ घोन्सालवीस :-**

मी आक्षेप घेतलेला नाही. आपण राष्ट्रवादी काँग्रेसने ठरावाला विरोध केला होता आणि काँग्रेसने या ठरावाला पाठिंबा दिला होता. त्यामुळे तो ठराव पास झाला होता.

**मोहन पाटील :-**

म्हणून सन्मा. सदस्य दिनेश नलावडेजी हयांनी जो ठराव मांडलेला आहे. त्याला मी अनुमोदन देतो आणि पहिले आपण उत्तनला पाणी दयायला पाहिजे. त्याच्यावर राजकारण करणारी लोक आहेत. त्यांनी पाण्यासाठी राजकारण करु नये.

**जोजफ घोन्सालवीस :-**

आपण चुकीचे बोलता.

**शरद पाटील :-**

सभापती महोदय, पाण्याच्या पाईप लाईनला कोणी विरोध केलेला नाही आहे. असे हे खोट वक्तव्य करुन चालणार नाही. आम्ही पाण्याच्या पाईप लाईनला विरोध केलेला नाही.

**जोजफ घोन्सालवीस :-**

संपूर्ण राष्ट्रवादी काँग्रेसने त्यावेळेला ठरावाला विरोध केला होता. काँग्रेसने या ठरावाला पाठींबा दिला होता. तो ठराव पास झाला म्हणून आम्ही उत्तनचे नागरीक त्यांचे आभारी आहोत.

**मोहन पाटील :-**

काँग्रेस आणि राष्ट्रवादीची सत्ता हया ठिकाणी आहे. म्हणून जे चांगले काम होईल ते राष्ट्रवादीच करणार आहे.

**मिलन म्हात्रे :-**

सभापती महोदय, आता ही जी चर्चा झाली. एखादया विभागाला कुठच्या तरी पक्षाने पाण्याची सोय केली हे आता येथे दर्शविले जाते, पण प्रथमदर्शनी मी तुम्हाला हे सांगतो की, हे जे टेंडर रिटर्न गेले आणि आपल्या येथे नागरिकांना उत्तन, मिरा रोड म्हणा. कुठेही हया लोकांना जवळ जवळ आठ-नउ महिन्यापासून वंचित राहावे लागले. आता आम्हाला दशोरे साहेबांनी हयाच्यात दिसून येते. माती खणण्याचे, खडडे खणायचे टेंडर आपण दुस-याला देतोय. पाईप लाईन आपण स्वतः खरेदी करणार आहोत. ही जर पध्दत नउ महिन्या अगोदर लगेच पटकन केले असते तर आता हया सगळया विभागाला आतापर्यंत पाणी पोहोचलेही असते.

**मा. सभापती :-**

आपण हयाचे चार वेळा निविदा काढल्या आहेत.

**मिलन म्हात्रे :-**

साहेब, तसे नाही.

**मा. सभापती :-**

निविदा काढण्याकरिता पंधरा दिवस गेले.

**मिलन म्हात्रे :-**

साहेब, पण ती निविदा काढण्याची गरजच नव्हती. आपण डायरेक्ट पाईप मागवायला पाहिजे होते.

**मा. सभापती :-**

आपल्याकडे डायरेक्ट ठेकेदाराकडून आले पाहिजे.

**मिलन म्हात्रे :-**

पाईप लाईन डायरेक्ट काढायचे ऑप्शन आपल्याकडे होते. पाईप आपण घेउ शकत होतो.

**याकुब कुरेशी :-**

पाईप जर डायरेक्ट काढले असते तर तेथूनही आरोप झाला असता.

**मिलन म्हात्रे :-**

नाही ना. आता कशाला?

**याकुब कुरेशी :-**

आता निविदा चार वेळा मागे केल्यानंतर ते स्वतःहून करताहेत. त्याच्यामध्ये खो घालतात. तर त्याच्यामध्ये कशाला खो घालायला पाहिजे.

**मिलन म्हात्रे :-**

पाईप लाईन टाकतोय हा मागे विषय येउन गेला आहे आणि पाईप लाईन टाकली आणि लगेच पाणी आले अशातला भाग नाही आहे. अजून पाईप लाईनच्या टाक्या बनायच्या बाकी आहेत. कोणी उगीच काही करु नये की, हे आम्ही आणले, त्यांनी आणले असे काहीच नसते. टाक्या बनवा मग आपण बघू.

**धनराज अग्रवाल :-**

सभापती महोदय, हा जो विषय आणला आहे. तर पाण्याची लाईन सगळया ठिकाणी झाली पाहिजे. हयात कोणाचेही दुमत नाही. हयाच्यात काही राजकारण करायचे नाही. पण हे टेंडर आलेले आहे. चार महिन्याने आपण टेंडर आणतोय, सहा महिन्याने टेंडर आणतोय. आता त्याच्यात काय फरक झाला आहे. पहिले आपण तीस टक्क्यांनी आणले होते आणि आता ३९ टक्के आणि प्लस हे आणले. तर हे आपण मिळून आणले आहे. आजपर्यंत असे येत नव्हते. तो सप्लायर होता तो डायरेक्ट एफ.ओ.आर. दयायचा की, ही तुमचा रेट. आता तुम्ही ११६.३० टक्के, एम.एस.टी., ऑक्ट्रॉय तीन टक्के, थर्ड पार्टी इंटरेस्ट एक टक्का म्हणजे २५ टक्के तुम्ही आपोआप त्याला अबव्ह करुन घेतले आहे. हे २५ टक्के निराळे झाले आणि ते दुसरे निराळे झाले. ते अबव्ह आहेत. पण आपण किती टक्के अबव्ह देउ शकतो?

**एस. के. दशोरे :-**

आपण जे रेट मागितले आहेत. ते रेट कॉन्ट्रक्टप्रमाणेच घेतलेले आहेत आणि जे रेट आहे. त्यांनी दिलेले एफ.ओ.आर. आहे आणि ते मॅन्युफॅक्चरिंग रेट आहेत. त्याच्यावर १६.३ गव्हर्नमेंटला एक्साईस डयुटी जाणार आहे. तीन टक्के ऑक्ट्रॉय आपल्यालाच भरायला लागणार आहे.

**धनराज अग्रवाल :-**

आपल्याला रेट काय लागणार आहे. आपण रेट वाढवून दिलेले आहे.

**एस. के. दशोरे :-**

फायनल हे रेट लागणार.

**धनराज अग्रवाल :-**

फायनल तुम्ही वाढवून दिलेले रेट लागणार असे कसे? आजपर्यंत असे रेट आलेले नव्हते. आजपर्यंत तुमच्या काळातही पाईपलाईन खरेदी झालेली आहे.

**एस. के. दशोरे :-**

हे रिझनेबल रेट आहेत.

**धनराज अग्रवाल :-**

रिझनेबल मी विचारत नाही. हे पहिल्यांदा असे कसे रेट आले?

**एस. के. दशोरे :-**

आपण ह्याच्यात कम्पॅरिझन करु शकतो.

**धनराज अग्रवाल :-**

हे जे प्रायव्हेट लिमिटेड मॅन्युफॅक्चरिंग कंपनी आहे त्यांना तुम्ही बाहेर काढले आणि जे सप्लायर आहेत ते दोन तुम्ही तिथे ठेवले.

**एस. के. दशोरे :-**

मॅन्युफॅक्चरिंग नाही. त्यांनी कंन्डीशन टाकली आहे आणि सात दिवसांत पुन्हा शंभर टक्के पेमेन्ट पाहिजे.

**धनराज अग्रवाल :-**

आपण असे बोला. आपण असे बोलता की, कुठलेही कागद जोडलेले नाही, असे ह्याच्यात लिहिलेले आहे. आपण पेमेन्ट देऊ शकत नाही म्हणून त्याचे घेतलेले नाही.

**एस. के. दशोरे :-**

कंडीशन ह्याच्यात टाकली आहे. निविदा सादर केली. शंभर टक्के पाईप पुरवठा केल्यानंतर सात दिवसांच्या आता अदा करा. सगळे ह्याच्यात दिले आहे.

**धनराज अग्रवाल :-**

हे जे फॅक्टरीकडून माल दुसरे व्यापारी घेतात ते व्यापारी त्यांना बिल बनवता. कमी जे आहे ते लागूनच बिल येते. साहेब, मी देखील व्यापारी आहे. आपण मला काय सांगू नका. मला सर्व माहिती आहे. मॅन्युफॅक्चरने माल घेतला तर तो सगळे बिल लावून देतो, लावून दिल्यानंतर तुम्ही त्याला रिसेल म्हणतात आणि हे रिसेलवाले लावणार आहेत. त्याच्यात वाढवून द्या. पन्नास टक्के वाढवून द्या. पाईपलाईन लागली पाहिजे. ह्याच्यात काय लफडे असेल तर त्याला आम्ही जबाबदार राहणार नाही.

**शरद पाटील :-**

सभापती महोदय, या विषयाबद्दल दशोरे साहेब, तुम्हांला एक गोष्ट सांगू इच्छितो ह्याबद्दल आपण सर्व कायदेशीर कोणत्याही गोष्टीची जबाबदारी आम्ही घेणार नाही आणि कायदेशीर गोष्टी करुन तुम्ही केले असेल तर हे ठिक आहे. तर ह्या पाईपलाईनला कोणाचा विरोध नाही.

**एस. के. दशोरे :-**

शासनातर्फे पूर्ण कायदेशीर बाब चर्चा करुन करण्यांत आलेली आहे.

**शरद पाटील :-**

पण कायदेशीर गोष्टीमुळे कुठेही काही आले असेल तर त्याला आम्ही जबाबदार नाही. ह्याची नोंद इतिवृत्तांत व्हावी.

**प्रकरण क्र. ६३ :-**

सी.आय. (एस. अँड एस.) पाईप पुरवठा करणेकामी निविदा मंजुरीबाबत.

**ठराव क्र. ७२ :-**

मिरा भाईंदर महानगरपालिका हद्दीतील विविध प्रभागांमध्ये आवश्यकतेनुसार जलवाहिन्या टाकण्यासाठी डी १ नमुन्यात स्पर्धात्मक निविदा मागविण्यात आलेल्या होत्या. दि. १४/०५/०३ रोजी उपरोक्त कामाअंतर्गत दोन ठिकाणी जवाहिनी टाकणेकरिता निविदा मागविण्यात आलेल्या होत्या. त्यावेळी प्राप्त निविदापैकी सर्वात कमी दराची निविदा ही अंदाजित रक्कमेपेक्षा ३८.७०% जास्त दराची होती. वाटाघाटीअंती लघुत्तम निविदाकाराने अंदाजित रक्कमेपेक्षा ३०%जास्त दराने काम करणेस तयारी दर्शविली. सदरचे दर बाजार भावापेक्षा जास्त वाटल्याने फेर निविदा काढण्यात आल्या. दरम्यानच्या काळात पाणी पुरवठ्याबाबत नागरिक व लोकप्रतिनिधी यांची वाढती मागणी लक्षात घेउन एकुण २० ठिकाणी जलवाहिनी टाकणे करिता दि. २१/०४/२००४ रोजी निविदा मागविण्यात आल्या. यावेळीही प्राप्त झालेल्या निविदा १९.२०% ते ४८% अंदाजित रक्कमेपेक्षा जास्त दराच्या होत्या. यावेळी पाईप उत्पादक कंपनी कडील दर मागवून निविदा दरांशी तुलना करण्यात आली.

वाटाघाटीअंती १९% ते ३९.४५% जास्त दराने काम करण्याची निविदाकाराने तयारी दर्शवली. सदरचे दरही जास्त वाटल्याने पुन्हा एकवार फेर निविदा काढण्यात आल्या. तथापि यावेळी कंत्राटदारांकडून प्रतिसाद न मिळून एकही निविदा प्राप्त झाली नाही. यानंतर सदर कामास फार मोठया प्रमाणात प्रसिद्धी देवून मराठी सह इंग्रजी वृत्तपत्रातही निविदा सुचना प्रसिद्ध करण्यात आली. तथापि यावेळीही मागील वेळेप्रमाणे प्रतिसाद न मिळून एकही निविदा प्राप्त झाली नाही. दरम्यानच्या काळात बाजारामध्ये बिडाच्या पाईपचे दर सातत्याने वाढत असल्याचे आढळून आले. अशप्रकारे वर्षभरात एकूण चार वेळा निविदा सुचना प्रसिद्ध करूनही योग्य व रास्त भावात निविदा प्राप्त होउ शकली नाही. विविध प्रभागांमध्ये जलवाहिन्या टाकणेबाबत नागरीकांचा तगादा सुरूच होता. अखेर बाजारात पाईपच्या वाढत्या दरामुळे कंत्राटदारांचा नकारात्मक प्रतिसाद लक्षात घेवून पाईप पुरवठा करणेसाठी पाईप उत्पादक कंपन्याकडून अथवा अधिकृत विक्रेता यांचेकडून दर करारासाठी स्पर्धात्मक निविदा मागवून व पाईप अंथरणेसाठी निविदा काढून अथवा मजुर सहकारी संस्था यांचेकडून काम करून घेणेबाबतच्या प्रस्तावास मा. आयुक्त सो यांनी मंजूरी दिली आहे.

यानंतर दि. १७/०६/०४ रोजीच्या दैनिक लोकमत, नवाकाळ, वृत्तमानस, सुरज प्रकाश, नवभारत व फ्री प्रेस जनरल या वृत्त पत्रात सी.आय. (एस ॲन्ड एस) टायटन पाईप्स आय.एस.नं. १५३६ : २००१ आणि सम कक्ष ISO/B.S.स्टॅंडर्ड प्रमाणे १०० मी.मी ते ३५० मी.मी. व्यासाचे पाईप पुरवठा करणेबाबत जाहीर निविदा प्रसिद्ध करण्यात आली. सदर जाहीर निविदा सुचनेनुसार एकूण ३ निविदा प्राप्त झाल्या. त्यापुढील प्रमाणे आहेत. **१. मे. कपिलांश धातु उद्योग लि. २. मे. समीर एन्टरप्रायजेस ३. मे. केसरी ॲन्ड कं.**

उपरोक्त निविदा दि. १३/०७/०४ रोजी दु. ३.३० वाजता मुख्य लेखापरिक्षक व सचिव मिरा भाईंदर महानगरपालिका यांच्या समक्ष उघडण्यात आल्या. सर्वप्रथम मे. कपिलांश धातु उद्योग लि. यांची निविदा उघडली असता लिफाफा क्र. १ मध्ये खालील त्रुटी आढळल्या.

१. सर्शत निविदा सादर केली असून १००% देयक पाईप पुरवठा केल्यावर सात दिवसाच्या आत अदा करावे. अशी शर्त लिखित स्वरूपात नमुद केलेली आहे.
२. पाईप पुरवठा केल्याबाबत कोणतेही प्रमाणपत्र जोडलेले नाही.
३. सद्या हातात असलेली कामे याबाबत कागदपत्रे जोडलेली नाहीत.
४. अनुभवाचा दाखला जोडलेला नाही.

मे. कपिलांश धातु उद्योग लि. यांनी सशर्त निविदा भरल्यामुळे व उपरोक्त त्रुटी आढळल्यामुळे अथवा लिफाफा १ मधील अटीनुसार कागदपत्रे सादर न केल्यामुळे निविदेतील अटी-शर्तीनुसार लिफाफा क्र. २ उघडणेत आला नाही.

मे. समीर एन्टरप्रायजेस व मे. केसरी ॲन्ड कं. यांच्या निविदा उघडल्या असता लिफाफा १ मध्ये आवश्यक सर्व कागदपत्रे आढळली. यास्तव उपरोक्त निविदाकारांचा लिफाफा २ उघडण्यात आला असता त्यांनी प्रस्तावित केलेल्या दराचा तुलनात्मक तक्ता खालीलप्रमाणे आहे.

| **अ.क्र.** | **पाईपचा व्यास मि.मि. मध्ये** | **कंत्राटदाराचे नाव** | | |
|---|---|---|---|---|
| | | **कपिलांश धातुउद्योग प्रा.लि.** | **समीर एन्टरप्रायजेस** | **केसरी ॲन्ड कं.** |
| | | **निविदा दर** | **निविदा दर** | **निविदा दर** |
| १ | १०० | निविदा उघडणेत आली नाही | ७६५.०० | ५९०.०० |
| २ | १५० | - ׀׀ - | १०७१.०० | ८७०.०० |
| ३ | २०० | - ׀׀ - | १५७३.०० | १२७०.०० |
| ४ | २५० | - ׀׀ - | २१२१.०० | १७१०.०० |
| ५ | ३०० | - ׀׀ - | २७३६.०० | २२०५.०० |
| ६ | ३५० | - ׀׀ - | ३२५८.०० | २७८०.०० |

सदर निविदा ह्या उत्पादक कंपनी/अधिकृत विक्रता यांचेकडून उत्पादन दरावर आधारित **दर करारासाठी** इतर सर्व कर व वजावटी वगळून मागविणेत आल्या होत्या. **मे. केसरी ॲन्ड कं.** यांनी प्रति मिटर परिमाणास दिलेले दर हे सर्वात कमी असून सदर दरामध्ये कोणतेही शासकीय अथवा इतर कर/वजावटी समाविष्ट नसून F.O.R. दर आहेत. करिता निविदेतील अटी-शर्तीनुसार सोबतच्या तक्त्यानुसार (२) निविदेतील पाईपच्या व्यासानुसार शासकीय कर व इतर चार्जेस समाविष्ट करून कंत्राटदाराला अदा करावयाचे दर खालीलप्रमाणे आहेत.

| अ.क्र. | पाईपचा व्यास | निविदेतील दर प्रति मीटर | इतर कर प्रति मीटर | अंतिम दर प्रति मीटर |
|---|---|---|---|---|
| १ | १०० मी.मी. | ५९०.०० मी. | २२८.८४ | ७९७.०८ |
| २ | १५० मी.मी. | ८७०.०० मी. | ३४७.६४ | ११८३.४३ |
| ३ | २०० मी.मी. | १२७०.०० मी. | ५३४.४१ | १७३०.३२ |
| ४ | २५० मी.मी. | १७१०.०० मी. | ७२३.२९ | २३३०.११ |
| ५ | ३०० मी.मी | २२०५.०० मी.. | ९३४.०४ | ३००४.८४ |
| ६ | ३५० मी.मी. | २७८०.०० मी. | ११२८.८३ | ३७८९.५३ |

सदर बाबतीत कंत्राटदारांनी दिलेले दर कराराचे दर अन्य दुस-या प्रमुख उत्पादक कंपनीच्या दराशी तुलना करणेसाठी पाईपचे दर मागविणेत आले असता इलेक्टोस्टील कास्टींग लि. कलकत्ता यांचेकडील जुलै २००४ महिन्यातील पाईप पुरवठा दराशी तुलना केली असता. मे. केसरी ॲन्ड कं. यांनी दिलेले दर बाजारभावाशी व इतर प्रमुख उत्पादक कंपनीच्या पुरवठा दरापेक्षा वाजवी व संयुक्तिक आहेत. सुमारे एक ते दिड वर्षापासून जलवाहिन्या टाकणेच्या कामासाठी निविदा काढूनही प्रतिसाद मिळत नाही. प्रस्तावित केलेली सर्व कामे अत्यावश्यक सेवेतील असून तातडीने करणे आवश्यक आहे. सन २००४-०५ च्या अर्थसंकल्पात नविन जलवाहिनी टाकणे या शिर्षाखाली ८.०० कोटी रक्कमेची तरतुद केली असून सदरचा खर्च उपरोक्त तरतुदीतून भागविणेत येईल. तक्ता २ मधील शासकीय कर व इतर चार्जेस समाविष्ट करून येणा-या खालील अंतिम दरास मान्यता मिळावी.

| अ.क्र. | पाईपचा व्यास | निविदेचा दर (प्रति मीटर) | इतर करासहित अंतिम दर (प्रति मीटर) |
|---|---|---|---|
| १ | १०० मी.मी. | ५९०.०० मी. | ७९७.०८ |
| २ | १५० मी.मी. | ८७०.०० मी. | ११८३.४३ |
| ३ | २०० मी.मी. | १२७०.०० मी. | १७३०.३२ |
| ४ | २५० मी.मी. | १७१०.०० मी. | २३३०.११ |
| ५ | ३०० मी.मी. | २२०५.०० मी. | ३००४.८४ |
| ६ | ३५० मी.मी. | २७८०.०० मी. | ३७८९.५३ |

**मे. केसरी ॲन्ड कं.** यांनी दिलेले वरील दर वाजवी व संयुक्तिक असल्याने इतर करासहित समाविष्ट असलेल्या दराने निविदा मंजूर करणेस व सदर दराने वेळोवेळी येणारी देयके प्रदान करणेस मा. स्थायी समिती मंजूरी देत आहेत.

**सुचक : श्री. दिनेश नलावडे** **अनुमोदक : श्री. मोहन पाटील**

**ठराव सर्वानुमते मंजुर**

**सही/-**
**सभापती**
**स्थायी समिती सभा**
**मिरा भाईंदर महानगपालिका**

(प्र. सचिवांनी प्रकरण क्र. ६४ चे वाचन केले.)

**चंद्रकांत वैती :-**

मा. सभापती साहेब, विशेष कार्यकारी अधिकारी भू-संपादन नेमणुकी देण्याबाबतचा विषय आलेला आहे. अर्थात श्री. एम. एच. मोरे साहेब ह्यांची आपण जेव्हापासून नेमणुक केली तेव्हापासून त्यांचे कामकाज चांगले चालू आहे अशी माझी माहिती आहे आणि त्यांना मुदतवाढ देण्यासाठी येथे या स्थायी समिती सभागृहात कोणाचा विरोध असेल असे मला वाटत नाही. परंतु, गेल्या नेमणुकीपासूनच्या पाच पहिन्यात त्यांनी काय प्रकारे कुठचे काही स्थायी समितीने विशेष भू-संपादन ही प्राथमिकता त्याला दिली होती आणि प्रायोरिटीमध्ये करायला सांगितले होते. त्याच्यामध्ये आपण कुठपर्यंत आहोत आणि सद्यस्थितीत त्यांना अजून कुठल्या डिपार्टमेंटचे सहकार्य लागेल. कारण पुढच्या दोन दिवसांनी त्यांची मुदत संपते. त्याच्यामुळे मुदत द्यायला कुठल्याही प्रकारची हरकत नाही. तर एकदा श्री. मोरे साहेबांनी स्थायी समितीच्या सभागृहासमोर आपण केलेल्या कामाचा थोडक्यात आढावा द्यावा आणि प्रस्तावित काय काम आहे त्याच्याबद्दल थोडीशी माहिती द्यावी.

**अशोक पाटील :-**

तत्पुर्वी आपण मुदवाढ देतोय की, नवीन नेमणुकीस मंजुरी देतोय?

**धनराज अग्रवाल :-**

सभापती महोदय, हे जे पोस्ट हो ते सरकारमान्य पोस्ट आहे का? सँक्शन पोस्ट असेल मग वारंवार मुदतवाढीकरिता कशासाठी आणायचे? त्यांना येथे ठेवून घ्या.

**रमेश मनाळे (मा. प्र. उपायुक्त (मुख्यालय) सो.) :-**

विशेष कार्यकारी अधिकारी भु-संपादन हे आपल्याकडे मंजुर पद नाही. आपल्या आस्थापनेवर अशा प्रकारचे पद मंजुर नाही आहे. तथापि नगररचनेच्या अंतर्गत आपल्याला आरक्षणानुसार जे काही भुखंड घ्यायचे आहे, ताबा घ्यायचा आहे, शासनाकडून किंवा खाजगी स्वरुपाचे आहे ते आपल्याला करार पद्धतीने घ्यायचे आहे त्या संदर्भात आवश्यक कार्यवाही करणे, शासनाकडे पत्रव्यवहार करणे किंवा झालेला पत्रव्यवहार आहे त्याला फॉलोअप करणे, त्यासाठी आपल्याला अशा अनुभवी अधिकाऱ्यांची आवश्यकता आहे आणि ते निवृत्त उप-जिल्हाधिकारी आहेत आणि जोपर्यंत आरक्षण घेणे आणि भुखंड भूसंपादन करणे हे जोपर्यंत चालू राहणार आहे तोपर्यंत आपल्याला अशा एखाद्या अनुभवी व्यक्तीची आवश्यकता राहणारच आहे. त्या अनुषंगाने आपण तात्पुरती ही नियुक्ती करत आहोत.

**शरद पाटील :-**

आपल्याकडे ती पोस्ट मंजुरच नाही की, येथे ती मंजुर होऊ शकते?

**रमेश मनाळे (मा. प्र. उपायुक्त (मुख्यालय) सो.) :-**

सद्यस्थितीत ती पोस्ट आपल्या आस्थापनेवर मंजुर नाही.

**शरद पाटील :-**

ठिक आहे, पाच महिन्यात त्यांनी काय काम केले आहे त्याची माहिती द्या. आज आम्ही ह्यांना पहिल्याच सभेला बघतोय.

**दिनेश नलावडे :-**

अगोदर दोन-तीन सभेला हे आलेले आहेत.

**एम. एच. मोरे :-**

सभापती महोदय, दहा सरकारी जागेची मोजणी करायची होती. टी.आर.आर.कडून त्या सर्व जागेची मोजणी झालेली आहे आणि त्यापैकी सात साईडचे नकाशे आपल्याकडे आलेले आहेत. त्यामध्ये थोडीशा त्रुटी असल्याने मार्कींग करायचे राहिले आहे आणि ते आम्ही राणे, जे सर्व्हेअर आहेत त्यांना दिले आहे आणि ते नकाशे त्यांच्याकडून आले की, तयाचे ब्लु-प्रिंट तयार करुन जिल्हाधिकारी, ठाणे ह्यांच्याकडे पाठवतो आणि त्यांच्याकडून आदेश निर्गमित करुन घेतो, म्हणजे त्या जमिनीचा आपल्याला ताबा मिळेल. तीन जागा उत्तनच्या साईड आलेल्या आहेत. त्याची मोजणी झालेली आहे. परंतु, नकाशे टी.आर.आर.कडून आलेले नाहीत. त्याचा मी पाठपुरावा करत आहे. सर्व्हेअरने नकाशे तयार करायला घेतले आहेत. पुढच्या आठवड्यात ते आपल्याला मिळेल. त्यानंतर १९९४-९५ मध्ये आठ जागा कलेक्टरने आपल्याला मंजुर केल्या होत्या. त्याचे पझेशन आपण घेतलेले आहे आणि ती साईड डेव्हलप झालेली आहे. त्या आठ जागांपैकी सात जागा सरकारी आपल्या नावावर करण्याबाबत मी कार्यवाही केलेली आहे आणि त्या सात-बाराच्या उताऱ्यामध्ये आले नांव इतर हक्कात दाखल झालेले आहे. एक जागा त्याच्यामध्ये पेपर वॉन्टींग आहे. ते राहिल्यामुळे ते राहिले आहे. त्यानंतर ग्रामपंचायत, नगरपालिका झाल्यापासून आपल्याकडे ज्या जागा आहेत त्या ५७ जागा सरकारी आपले दप्तरी आपल्या नावावर चढविण्यासाठी मी कार्यवाही करत आहे आणि त्याबद्दल पाठपुरावा करत आहे. मध्यस्थी इलेक्शन झाल्यामुळे महसुल अधिकारी कामात गुंतले होते. त्यामुळे त्यात थोडेसे डिले झालेले आहे. २० जागा मिठागराच्या आपल्याला ताब्यात घ्यायच्या आहेत. त्यामध्ये हमीपत्र द्यायचे आहे आणि त्याबाबतचा ठराव आपण येत्या मा. महासभेत मांडत आहोत. त्याच्यानंतर उत्तनचे २९ नंबरचे जे आरक्षण आहे कत्तलखान्यासाठी ती जागा संपादन करण्यासाठी आपण येत्या मा. महासभेमध्ये तो ठराव मांडत आहोत. त्यानंतर भाईंदर आरक्षण क्र. १८४ पार्कींगसाठी आपल्याला जागा घ्यायची आहे. त्याची सुद्धा जागा संपादन करण्याबाबतचा ठराव आपण येत्या मा. महासभेमध्ये मांडत आहोत. तो मंजुर झाल्यानंतर त्याबाबत मी कार्यवाहीसाठी पेपर तयार करत आहे.

**मिलन म्हात्रे :-**

ती जागा कोणाकडून घेणार?

**एम. एच. मोरे :-**

ती जागा खाजगी आहे.

**मिलन म्हात्रे :-**

त्याचे मालक कोण आहे?

**एस. आर. शेंडे :-**

सात-बाराप्रमाणे त्या जागेची मालकी वाडीलाल शाह ह्यांच्याकडे आहे आणि सद्यस्थितीत पॉवर ऑफ ॲटर्नी त्या जागेची आर.एन.ए. बिल्डरकडे आहे.

**जोजफ घोन्सालवीस :-**

साहेब, २९ नंबरचे कत्तलखान्याचे?

**एस. आर. शेंडे :-**

२९ जागा देखील खाजगी आहे.

**मिलन म्हात्रे :-**

भाईंदर पुर्व का पश्चिम?

**एस. आर. शेंडे :-**

मिरा रोड स्टेशनच्या समोर पुर्वेला.

**अनंत पाटील :-**

सॉल्ट डिपार्टमेंटची जागा कुठली आहे.

**एम. एच. मोरे :-**

सॉल्ट डिपार्टमेंटची जागा आपण अगोदरच आरक्षितमध्ये दाखवलेली आहे. तर सॉल्ट डिपार्टमेंटने आपल्याकडून हमीपत्र मागितलेले आहे की, जी बाजारभावाने रक्कम होईल.

**अनंत पाटील :-**

आपण त्या सॉल्ट डिपार्टमेंटचे सर्व्हे नंबर सांगू शकाल का?

**एस. आर. शेंडे :-**

तो विषय आम्ही मा. महासभेत दिलेला आहे आणि तीन तारखेला महासभा आहे त्याची डिटेल टिपणी लिस्टसह त्याच्यामध्ये दिलेली आहे, सर्व्हे नंबर सहित.

**धनराज अग्रवाल :-**

सॉल्ट डिपार्टमेंटची जागा ही वादाचीच आहे. तर सेंन्ट्रल गव्हर्नमेंट सांगते की, ती आमची जागा आहे व शिलोत्रीवाले सांगतात की, आमची जागा आहे. शिलोत्रीवाले तिथे जमीन पिकवतात आणि ते जागा सोडत नाही तर आपण ती कशी ताब्यात घेणार हे मला कळत नाही.

**अशोक पाटील :-**

मोरे साहेब, खाजगी जमिनीचे आणि मिठागराच्या जमिनीचे डी.एल.आर.प्रमाणे सर्व्हे केलेला आहे. त्याची ज्या आरक्षणखाली जागा आहे. उदा. ७७८ सर्व्हे नंबर तर त्याचा तुम्ही सर्च घेतलेला आहे का? नक्की जमीन सॉल्ट डिपार्टमेंटच्या मालकीची आहे का? नक्की त्याच्या मालकी हक्काबद्दल तुम्ही सर्च त्याचा घेतलेला आहे का? निदर्शनात काय झाले आहे त्याची आपण जारा माहिती द्या.

**एम. एम. मोरे :-**

त्यामध्ये जे दोन आरक्षण आहे त्याच्यामध्ये सॉल्ट डिपार्टमेंट, सेंन्ट्रल गव्हर्नमेंट असे स्पष्टपणे सात-बारात नमुद केलेले आहे.

**अशोक पाटील :-**

कुठचे दोन सर्व्हे नंबर? आरक्षण कुठचे आहे?

**एम. एच. मोरे :-**

सर्व्हे नंबर आता माझ्याकडे नाही आहे आणि त्यात बरेचसे आरक्षण आहे.

**एस. आर. शेंडे :-**

सॉल्ट डिपार्टमेंटचे हे वीस आरक्षित जागेचा जो मी उल्लेख केला त्याची सविस्तर माहिती मा. महासभेच्या वेळी आम्ही आपल्याला देऊ आणि त्यावेळी सविस्तर चर्चा करता येईल.

**अशोक पाटील :-**

आता आपण त्यांच्या पाच-सहा महिन्यांच्या कामगिरीबद्दल चर्चा करतोय. तर त्यांनी आता जे डी.एल.आर. जे सर्व्हे केलेले आहे त्याबद्दल त्यांनी त्याच्या टायटलशिपबद्दल अभ्यास केलेला असेत तर त्याची आम्हांला माहिती मिळू द्या. टायटल संदर्भात.

**एस. आर. शेंडे :-**

सध्या जागेची मोजणी केलेली आहे. मालकी ठरल्यानंतर जागा आपल्याला हस्तांतरित होतील.

**अशोक पाटील :-**

साहेब, मालकी ठरणे तो रेव्हेन्युचा विषय आहे. कलेक्टरच्या अखत्यारितला विषय आहे. पण आता हे भूसंपादन अधिकारी यांनी त्यांच्या कार्यक्षेत्रात अभ्यास केलेला असेल तर साधारण जुजबी माहिती आपण आम्हांला देउु शकता की, ह्या मालकी बद्दल साधारण माहिती असेल की, सॉल्ट डिपार्टमेंट ह्याचा मालक आहे, का सेंन्ट्रल गव्हर्नमेंट आहे, का स्टेट गव्हर्नमेंट आहे? सध्या तुमच्या निदर्शनात काय आलेले आहे?

**एम. एच. मोरे :-**

त्याच्यामध्ये एक जे स्पॉट आहे ते भद्री आगार असे म्हटले आहे आणि दुसरा जो आहे तो पेलणी आगार आणि बुबू आगार असे म्हटले आहे आणि बाकी जे जागा आहेत त्या सॉल्ट डिपार्टमेंट असे क्लिअरली सातबारामध्ये आहे.

**अशोक पाटील :-**

हे जे पेलणी आगार आणि बुबू आगार आहे. आपण जे सात-बारामध्ये बघितले आहे त्याचा सर्च तुम्ही काढला आहे. त्याच्या संदर्भात तुम्हांला काय कल्पना आहे.

**एम. एच. मोरे :-**

त्याच्याबद्दल सध्या तर मी भाष्य करु शकत नाही. कारण तो फेरफार असे म्हणतोय, लीझ लॅन्ड आहे असे.

**अशोक पाटील :-**

साहेब, आपल्याला त्या स्पेशल कामगिरीसाठी नेमलेले आहे.

**एम. एच. मोरे :-**

मी जेव्हा त्याचा फेरफार बघितला १९५८ सालचा जो फेरफार आहे.

**अशोक पाटील :-**

आपण रेव्हेन्यु डिपार्टमेंटशी संबंधित आहात म्हणून ह्याबाबत आपल्याला ह्याची जास्त माहिती असेल. पण मालकीबद्दल त्याच्याशी वाद राहील. कारण मध्यस्थी एक-आठ दिवसांपुर्वी त्याच्याबद्दल तसे आले होते.

**धनराज अग्रवाल :-**

सॉल्ट डिपार्टमेंटची जागा घेणे हे फार कठिण काम आहे, हे मी तुम्हांला सांगतो.

**अशोक पाटील :-**

साहेब, आपण लाखो रुपये स्टेडिअमच्या जागेसाठी खर्च केला आहे.

**एस. आर. शेंडे :-**

आपली स्टेडिअमची जागा आहे, त्याचे दोन सर्व्हे नंबर आहेत, २२९ आणि २३०. एका सातबारावर पेलणी आगार व एका सातबारावर बुबू आगार अशी नोंद सद्यस्थिती आहे. ती जागा मार्च १९९४ला जिल्हाधिकारी ह्यांच्याकडून आपल्याला प्राप्त झाली. अठरा हेक्टर अशी एकूण जागा. परंतु सहा महिन्याच्या आत सप्टेंबर १९९४ ला मालकी निर्विवाद सरकारची सिद्ध होत नसल्यामुळे जिल्हाधिकारी यांनी तो आदेश रद्द केलेला आहे. त्याच्यानंतर ती जागा सद्यस्थितीत मालकी कोणाची हा अजूनची विषय सुटलेला नाही. कारण त्याच्या ना महाराष्ट्र गव्हर्नमेंटची नोंद आहे, ना सॉल्ट डिपार्टमेंटची नोद आहे. त्याच्यावर फक्त पेलणी आगार आणि बुबू आगार अशी नोंद आहे. त्याच्यामुळे पेलणी आगार आणि बुबू आगार ही नोंद कशी आली ह्यासाठी मागच्या ४०-५० वर्षाचा महसुल विभागाचा जो रेकॉर्ड असेल तो शोधुन बघावा लागेल आणि त्याच्यामध्ये ज्याची मालकी निश्चित होईल त्याच्याकडून आपल्याला ती जागा प्राप्त करुन घ्यावी लागेल. तर त्या जागेची मागणी आम्ही दोन्ही डिपार्टमेंटकडे करतो, सॉल्ट डिपार्टमेंटकडे करतो आणि महाराष्ट्र शासन, जिल्हाधिकारी ह्यांच्याकडेही करतो. तर ज्याची सिद्ध होईल त्याच्याकडून आपण जागा घेऊ. जागा अल्टीमेटली आपल्याला घ्यायची आहे.

**मोहन पाटील :-**

सभापती महोदय, आपण ज्या आगरांचे नांव त्या उता-यावर आहे त्या उता-यावरुन आपल्याला सिद्ध होत नाही की, ही जागा राज्य शासनाची आहे की, सेंन्ट्रल गव्हर्नमेंटची आहे. राज्य शासनाची जागा जर असेल तर त्यांच्याकडून ती जागा घेण्यासाठी आपल्याला सोयीस्कर मार्ग आहे. सभापती साहेब, मला असे बोलायचे आहे की, जर ती जागा मिळण्यासाठी दोन्ही ठिकाणी आपण पत्रव्यवहार केला. राज्यशासनाकडे तर सेंट्रल गव्हर्नमेन्टला आपण प्रयत्न का करु नये? असे माझे मत आहे की, आपण राज्यशासनाकडे प्रयत्न करित असताना जो झोपलेला आहे. त्याला जागा करुन आपल्याला

फायदा नाही. आपण पूर्णपणे उत्तर दिले की, ही जागा आमची नाही आहे. तर आपण त्यांच्याकडे गेले पाहिजे आणि जर जागा त्यांची असेल तर आपण करु शकतो आणि जर सेंट्रल गव्हर्नमेन्टची जागा असेल तर त्याला प्रोसीजर ब-याच मोठया प्रमाणात आपल्याकडे आहे. कारण त्यांना पैसे दिल्याशिवाय ती जागा आपल्या ताब्यात येणार नाही. त्यांना पूर्ण पैसे दयावे लागेल. राज्यशासनाची जर जागा असेल तर ती जागा आपल्याला विदाउट पैशांनी मिळू शकते. परंतु, सेंट्रल गव्हर्नमेन्टची जागा असेल तर ती मिळू शकत नाही. म्हणून माझी हया ठिकाणी सुचना अशी आहे की, आपण ही जागा राज्यशासनाकडे पूर्णपणे हयाचा पत्रव्यवहार करावा. पूर्णपणे त्यांच्या ॲथोरिटीकडे पत्रव्यवहारापेक्षा प्रत्यक्षरित्या आपण गेले पाहिजे आणि त्याची माहिती आपण मिळवली पाहिजे. सर्च रिपोर्ट आपण काढला पाहिजे, चाळीस एक वर्षाचा. नंतर आपण त्या ठिकाणी सेंट्रल गव्हर्नमेन्ट अप्रोच झाले पाहिजे, असे माझे मत, माझी सुचना मी हया ठिकाणी मांडतो.

**अशोक पाटील :-**

सन्मा. सदस्यांशी मी सहमत आहे. कारण आपण हया ठिकाणी भूसंपादन अधिका-याच्या नेमणूकीस मंजुरी देत आहोत आणि त्यांच्यावर ही विशेष जबाबदारी आहे. कारण हया ब-याचशा जागा ज्या आरक्षणाखाली आहेत. त्या जास्तीत जास्त जागा हया मिठागराच्या आहेत. हया मिठागराच्या मालकी संदर्भात हा वादांकित विषय आहे आणि त्याच्यासाठी भूसंपादन अधिका-याला ही विशेष कामगिरी करावयाची आहे. कारण आता मा. महासभेसमोर विषय ठेवण्यात आलेला आहे. त्याच्यामध्ये तुम्ही सॉल्ट डिपार्टमेन्टकडे अशी मागणी केलेली आहे की, बाजारभावाप्रमाणे आम्हाला त्या जागेचा मोबदला देण्यात यावा. म्हणजे आपण त्यांना मोबदला देता म्हणजे त्यांची मालकी मान्य करतो असा एका अर्थाने त्याचा अर्थ निघू शकतो. त्याच्यामुळे सन्मा. सदस्य मोहन पाटील हयांनी जी सुचना मांडली आहे. ती बरोबर आहे आणि ते प्रथम महाराष्ट्र शासन, कलेक्टर हयांच्याकडे पाठपुरावा आणि जमिन तुमच्या आहेत आणि हे आम्हाला मिळावे, आरक्षणाखाली आणि त्यांनी जर कळवले की, हया जमिनी आमच्या नाही आहेत. हया सेंट्रल गव्हर्नमेन्टच्या आहेत. त्याच्यानंतर पुढची स्टेप होउ शकते.

**एस. आर. शेंडे :-**

जिल्हाधिकारी साहेब हयांच्याकडे आमची मागणी चालू आहे आणि त्याच्यासाठी जी मोजणी फी भरायची होती, जागेच्या हद्दी निश्चित करण्यासाठी जागेची फी भरुन, जागेची मोजणी झालेली आहे. जागेचा मोजणी नकाशा प्राप्त झालेला आहे. तो नकाशा जिल्हाधिकारी हयांच्याकडे देउन जागा परत मागायची आहे. त्या नकाशाप्रमाणे. त्यानंतर ते ठरवतील की, ती जागा शासनाची आहे किंवा नाही. तर त्याच्यामुळे आपली पहिली प्रायोरिटी जिल्हाधिकारी हयांच्याकडे आहे आणि त्यांच्याकडून जेव्हा निश्चित होईल की, ही जागा त्यांची नाही. मग अल्टरनेटीव्ह करुन हयाचा विचार करण्यात येईल.

**धनराज अग्रवाल :-**

मी माझा अनुभव सांगतो, मी सॉल्टचा व्यापारी होतो. माझेसुध्दा आगार होते. बेलापूर, उरण येथे २५ ते ३० वर्ष झाली आहेत. आम्हीदेखील तिथे भांडतोय. पण अजून सेंट्रल गव्हर्नमेन्ट सांगते की, आमची जागा आहे. कोर्टाने ऑर्डर दिली की, तुम्ही बँकेत जा, पैसे उचलायचे नाही अशी ऑर्डर आलेली आहे. म्हणजे ती जागा कुणाची आहे. तर त्यांना तुमचा पत्ता लागणार नाही. मी तुम्हाला सांगून ठेवतो. सॉल्ट डिपार्टमेन्टची जागा घेण्याचे कलेक्टरचे राईटस नाहीत. ती सेंट्रल गव्हर्नमेन्टची सगळी जागा आहे.

**मोहन पाटील :-**

आपण बोललात ते बरोबर आहे. परंतु, मुर्धा, राई हया ठिकाणी सात-बाराचे ज्या खाजगी जागा होत्या. त्या जागेचा आगार केले आणि आगार केल्यानंतर हा शिलोत्री जो आहे त्याला फक्त काम करण्याचे, श्रम करण्याचे एवढे माहिती आहे. त्या पलिकडे त्यांना कल्पना नसल्या कारणाने त्याने काय उता-यावर लक्ष दिले नाही. उतारावर आगार करुन मोकळे झाले. कारण त्यावेळेला जो धंदा मासळी विक्री, मीठ उत्पादन करणे व दुसरा व्यवसाय नव्हता या ठिकाणच्या स्थानिक लोकांना. त्याच्यामुळे त्यांनी सात-बारा उतारावर जे काय चेंजेस करायचे होते ते त्यांनी बघितले नाही व त्या तलाठी लोकांनी काय केले तर हया ठिकाणी शेती पिकते म्हणजे सात-बारावर शेती आहे. हया ठिकाणी आगार पिकतो म्हणून मिठागर आहे असे केले. मुळात जो रेकॉर्ड आहे. तर काही सात-बाराच्या जमिनी होत्या. तो रेकॉर्ड होता. तसेच सन्मा. सदस्य धनराज अग्रवालजी हयांनी सांगितले ते कबुल आहे. मग ज्या नवी मुंबई या ठिकाणी आणि प्रॉपर मुंबईमध्येसुध्दा व डहाणूपर्यंत हा जो पटटा होता. तर ती फक्त मिठागरे होती आणि या ठिकाणी मेन आगार असल्यामुळे हया ठिकाणी मेन उदयोग तो होता.

**याकुब कुरेशी :-**

सभापती महोदय, हा विषय कुठला आहे आणि कुठले रुपांतर चालले आहे.  मला तेच कळत नाही.  हा विषय मा. महासभेत आहेच ना.

**चंद्रकांत वैती :-**

मा. सभापती साहेब, या विषयावर मी विचारणा केली होती की, श्री. एम.एच. मोरे साहेब हयांनी आपल्या नियुक्तीनंतर काय काय प्रकारे कार्यवाही केली.  एकूण त्यांच्या आतापर्यंतच्या वक्तव्यावरुन फार चांगले ते काम करत आहे हे आपल्या निदर्शनास आलेले आहे आणि त्याच्यामुळे आपल्या सदस्यांच्या अभ्यासुवृत्ती जागी झाली आणि त्यांनी एकूण आपला अभ्यास कसा आहे आणि आपली माहिती सादर केलेली आहे.  सन्मा. सदस्य मिलन म्हात्रे साहेब पाच महिन्याची मुदतवाढ देण्याचा प्रश्न आहे.  सदरचा ठराव मी मांडत आहे.  अनुमोदन व्हायच्या आत आपण माहिती दया.

**मिलन म्हात्रे :-**

हयांनी आता जी माहिती दिली, ती माहिती देत असताना त्याच्या महापालिकेच्या ज्या मालमत्ता आहेत, शाळा, आपण येथे बसलो आहोत ती इमारत.  हयाच्या मालकी हक्काबददल टायटलबद्दल त्यांनी काहीच माहिती दिलेली नाही.  एकूण नगरपालिकेच्या शाळा व त्यानंतर ही जी कार्यालय आहेत. ती, गोडाउन, क्रिडांगण, बगीचे हयाबद्दल महापालिकेच्या कामकाजाबद्दल आपण त्यांना आस्थापनेवर घेतले आहे, पाच महिन्याकरिता.  पण नगरपालिकेचे आपले आपण करु शकत नाही तर सॉल्ट डिपार्टमेन्ट आणि स्टेट गव्हर्नमेन्ट तर दूरचे राहिले आणि मघाशी सन्मा. सदस्य मोहन पाटील हयांच्या तोंडून जे वक्तव्य निघाले की, कोणाला झोपलेल्याला जागे करु नये.  पण आपण दरवेळेला जी जागा कोणीही घेतो.  त्याच्यामध्ये जाहीर नोटीस निघते.   पैशांचे देणे घेणे जसे सन्मा. सदस्य अशोक पाटील बोलले की, आपण त्यांना पैसे देणार आहोत.  ते पैसे दयायच्या अगोदर पेपर नोटीस निघते आणि जर पेपर नोटीस काढायची नसेल तर तुमची कमीत कमी महापालिकेच्या नोटीस बोर्डावर ती नोटीस लावावी लागते.  कलेक्टरच्या, जिल्हाधिका-यांच्या आणि तहसीलदारांच्या ऑफिसलासुध्दा त्या नोटीसा लागतात.  हे जे व्यवहार आपण करणार आहोत, ट्रान्सफरचा तो काय तुम्ही लपवून करु शकत नाही.  प्रत्येक वेळेला काही काही मॅटरमध्ये कलेक्टर म्हणतो की, माझी जागा आहे.  नंतर सॉल्ट डिपार्टमेन्ट बोलतो की ही आमची जागा आहे.  हयाच्यामध्ये सारखा सारखा वाद उत्पन्न होण्याची आपली शक्यता आहे.  बरेचसे आगार हे खाजगी आहेत.  त्याकरिता सॉल्ट डिपार्टमेन्टकडून तुम्ही खरडा अजून मागितलेला दिसत नाही आहे.  त्यांचे सॉल्ट डिपार्टमेन्टकडे खरडे रजिस्टर आहे. त्याच्यामध्ये शंभर वर्षापूर्वीच्यासुध्दा नोंदी आहेत. प्रत्येक आगाराच्या नावानुसार नोंदी आहेत.  त्याचा कुठेही आपण उल्लेख केलेला नाही आणि शेवटची गोष्ट मी आपणास सांगतोय.  आम्ही नगरसेवकांनी आपल्याला पत्रव्यवहार केलेला आहे.  त्याचे आपल्याकडून अजून उत्तर आलेले नाही.  त्याबद्दलसध्दा आपण जी काय माहिती दयायची आहे ती दयावीत.

**आसिफ शेख :-**

सभापती महोदय, हया ठिकाणी मुदतवाढीच्या विषयाचा ठराव मांडलेला आहे आणि त्याला सन्मा. सदस्य याकुब कुरेशी हयांनी अनुमोदन दिलेले आहे.  तर हया ठिकाणी मी एक गोष्ट विचारु इच्छितो की, आपण जे हमीपत्र मीठ विभागाला लिहून देणार त्यामध्ये आमच्या परिसरातील लालबहाददुर.

**अशोक पाटील :-**

आपण त्यांना हमीपत्र लिहून देणार आहोत असे नाही तर त्यांनी मागणी केलेली आहे.

**आसिफ शेख :-**

कोणी मागणी केली आहे?

**अशोक पाटील :-**

सॉल्ट डिपार्टमेन्टने मागणी केलेली आहे आणि हे मा. महासभा ठरवणार आहे.

**आसिफ शेख :-**

म्हणजे विचाराधीन आहे आणि आमच्या प्रभागातील लालबहाददूर शास्त्रीनगर, नेहरुनगर जे आहे त्या जागादेखील मीठ विभागाच्या जागी झोपडया वसलेल्या आहेत.  येथील सर्व्हे नं. ७२२(अ), ७५५, ७७३ हयाची माहिती घेतली आहे का?  आणि जर घेतले नसेल तर त्यामध्ये समावेश करुन घ्या. कारण आपल्या तिथे महापालिकातर्फे ज्या सुविधा पुरवायच्या असतात.  तेव्हा अडचणी निर्माण होतात व ते तिथे काय करु देत नाही.  त्यामुळे आपण हमीपत्र लिहून देणार हा विचाराधीन विषय आहे. तेव्हा या सर्व्हे नंबरचा त्यामध्ये समावेश करण्यात यावा.  त्याचप्रमाणे मिरा रोड परिसरात आपण सुंदर

असे स्मशानभूमी, दफनभूमी, जॉगींग पार्क बांधलेले आहे. त्याच धर्तीवर आपल्या भाईंदर पश्चिम परिसरात आपल्याला बांधायचे आहे. तर त्यासाठी सॉल्ट डिपार्टमेन्टच्या जागेबाबत विचार करायचा चालले आहे. ते देखील करुन घ्या.

**एस. आर. शेंडे :-**

सध्या मा. महासभेत जो विषय ठेवला आहे. तो वीस आरक्षित जागेबाबत ठेवला आहे. त्याच्यात ॲडीशन करायचे असेल तर मा. महासभेची मान्यत होईल त्यावेळी करता येईल.

**आसिफ शेख :-**

ठिक आहे.

**मिलन म्हात्रे :-**

आमचे उत्तर दिले नाही, महापालिकेच्या मालमत्तेचे काय केले?

**एम. एच. मोरे :-**

मी अगोदर सांगितले आहे की, नगरपालिका आणि महानगरपालिका ज्यावेळेला झाल्या. त्यावेळेला ज्या जागा आपल्या ताब्यात होत्या त्या प्रॉपर्टीचे नाव सात-बारावर चढली नव्हती. ते त्याने मागे रेफरेन्स केले होते. त्याप्रमाणे त्यांनी ॲडीशनल जी माहिती मागितली होती. ती मी एकत्रित करुन सर्कलला दिली आहे आणि सर्कनले ती ठाणा तहसीलदाराकडे पाठवलेली आहे. आता सर्कलची पोस्ट सध्या रिकामी आहे. ते आल्यानंतर मी त्यांच्याकडून ५७ ज्या प्रॉपर्टीज आहेत. त्यांची नावे सातबारावर चढवण्याची कार्यवाही करण्यात येईल.

**मा. सभापती :-**

मला माहिती आहे की, ही जागा आमच्या अवर लेडी नाझरेथ चर्चची आहे व याबाबत आपण मला पंधरा दिवसात माहिती पुरवावी. कारण ही जागा आमच्या अवर लेडी नाझरेथच्या असल्या कारणाने आपल्या हया नगरपालिकेला पैशाची मागणी मी करु शकतो. आमच्या फादरांकडून, बिशपाकडून ही आमच्या अवर लेडी नाझरेथची जागा पन्नास वर्षापासून आमच्या हद्दीत होती. या पंधरा दिवसात आपण हयाचा खुलासा करुन आणावा.

**अशोक पाटील :-**

सभापती साहेब, कुठली जागा हे जे नगरपालिकेचे कार्यालय आहे ते नाझरेथ चर्चच्या मालकीच्या जागेमध्ये आहे.

**एम. एच. मोरे :-**

हे कार्यालय सिटी सर्व्हे नंबर येत आहे व ही जागा आपल्याला कलेक्टरने मंजूर केलेली आहे आणि सिटी सर्व्हे असल्यामुळे आपण ते नगर भूमापन हयांच्याकडे सात-बारावर लाव लावण्यासाठी अर्ज केलेला आहे.

**मा. सभापती :-**

पूर्वी कोणाकडे होती? आपण सर्च काय आहे ते बघा.

**एम. एच. मोरे :-**

आपल्याला कलेक्टरने जागा मंजूर केलेली आहे. आपल्याला कायदेशीर ताबा दिलेला आहे आणि फक्त सिटी सर्व्हेमध्ये नाव लावायचे आहे.

**प्रकरण क्र. ६४ :-**

विशेष कार्य अधिकारी (भूसंपादन) नेमणूकीस मंजूरी देणे.

**ठराव क्र. ७३ :-**

मिरा भाईंदर महानगरपालिका क्षेत्रातील शासकीय/खाजगी जागा ताब्यात घेणेसाठी आवश्यक प्रस्ताव तयार करणे व शासनाकडे पाठविणे, खाजगी जागा ताब्यात घेणेसाठी भूसंपादन/कराराने/विकास हक्क प्रमाण पत्राद्वारे ताब्यात घेणेसाठी आवश्यक ती कार्यवाही करणे तसेच नगररचना विभागामार्फत यापुर्वी तयार केलेले शासनाकडे पाठविलेले प्रस्तावाचा शासन स्तरावर पाठपुरावा करणे इ. कामे करण्याकरिता मा. स्थायी समिती सभा ठराव क्र. २११ दि. २६/०२/२००४ अन्वये श्री. एम. एच. मोरे यांची विशेष भूसंपादन अधिकारी या पदावर पाच महिन्याकरिता नेमणुक करण्यांत आलेली आहे. सदर मुदत दि. ३१/०७/२००४ रोजी संपत आहे. श्री. एम. एच. मोरे यांनी त्यांना दिलेली कामे वेळेवर पार पाडलेली आहेत. परंतु आरक्षणाखालील शासकीय/खाजगी/जागा ताब्यात घेणेसाठी आवश्यक प्रस्ताव तयार करणे, शासनाकडे पाठविणे तसेच खाजगी जागा ताब्यात घेणेसाठी भूसंपादन/कराराने/विकास हक्क प्रमाणपत्राद्वारे ताब्यात घेणेसाठी आवश्यकत ती कार्यवाही करण्याची कामे बाकी आहेत. त्यामुळे

श्री. एम. एच. मोरे, उप जिल्हाधिकारी (निवृत्त) यांना पुढील पाच महिन्याकरिता रु. १०,०००/- प्रति महिना मानधनावर नेण्यांस मंजुरी देण्यांत येत आहे.

**सुचक :- श्री. चंद्रकांत वैती.** **अनुमोदन :- श्री. याकुब कुरेशी.**

**ठराव सर्वानुमते मंजुर**

**सही/-**
**सभापती**
**स्थायी समिती सभा**
**मिरा भाईंदर महानगपालिका**

(प्र. सचिवांनी प्रकरण क्र. ६५ चे वाचन केले.)

**शरद पाटील :-**

विधी सल्लागार म्हणून आपण माळी साहेब हयांना मुदतवाढ देत असाल तर तुम्ही दया. पण विधी सल्लागार म्हणून महासभेमध्ये जो विषय बिना टिपणीने आला त्याला त्यांनी विधी सल्लागार म्हणून सल्ला दिला नाही की आपल्याला.

**मा. सभापती :-**

ते विधी सल्लागार नाही. विशेष कार्यकारी अधिकारी आहेत.

**शरद पाटील :-**

ते विशेष कार्यकारी अधिकारी जरी असले तरी ते सल्लागार आहेत किंवा नाहीत आणि मा. महासभेच्या वेळेला जेव्हा बिगर टिपणीने विषय येतो. तेव्हा ते सल्ला देत नाही का?

**प्र. सचिव :-**

असे जे विषय आहेत तरी काही विषय प्रशासनाकडून येतात. काही विषय स्वतः मा. महापौर देतात आणि मा. महापौरांच्या काही विषयाला प्रशासन टिपणी देत नाही.

**शरद पाटील :-**

आता मला दुस-या गोष्टीचे क्लेरिफिकेशन करावे की , दोन्ही बॅलेट पेपरवर नंबर येउ नये म्हणून पहिल्या वेळेला नाईक साहेबांनी येथे माफी मागितली. पहिले जेव्हा स्थायी समितीला दोन्ही बॅलेट पेपरला नंबर आल्यानंतर सन्मा. सदस्या रिटा शाह हयांनी तो विषय उचलल्यावर तेव्हा नाईक साहेबांनी येथे माफी मागितली की, आमची चूक झाली आणि परत तिच पुनरोक्ती आपण उपमहापौर आणि स्थायी सदस्यांना वापरली, तेव्हा दोन्ही बॅलेट पेपरवर नंबर होते. तेव्हा माफी का मागितली हयाचे पहिल्यांदा उत्तर दया आणि तेव्हा माफी मागितली तेव्हा तुम्ही त्यांना काय बोलला नाहीत का असा नियम आहे.

**मिलन म्हात्रे :-**

गोपनियता आहे म्हणून नंबर नसावे.

**शरद पाटील :-**

गोपनियता असावी म्हणून नंबर नसावे नाहीतर तुमचे गुप्त मतदानाचा अर्थ काय?

**बी. एम. माळी :-**

सभापती महोदय, बिना नंबरची मतपत्रिका देवू नये कारण असे बिना नंबरचे मतपत्रिका दिली तर मतदार झाले हे आपल्याला दाखवता येणार नाही म्हणून बिना नंबरची मतपत्रिका कुठेही दिली जात नाही आणि याबाबत कलेक्टरकडे चौकशी करुन जे नियमात आहे तसे केले आहे.

**धनराज अग्रवाल :-**

आता डावखरे साहेबांचे इलेक्शन झाले. तेव्हा बॅलेट पेपरवर नंबर दिसायला नाही पाहिजे असे आहे आणि ही चुक झालेली आहे.

**शरद पाटील :-**

आम्हाला नंबर आणायला सांगितला तेव्हा आम्ही स्लीप वरचा नंबर फाडून तो घेउन गेलो होतो. बॅलेट पेपरचा आम्हाला दिलेल्या स्लिपवर नंबर नव्हता. हे मी खात्रीदायकरित्या सांगतोय.

**दिनेश नलावडे :-**

सन्मा. सदस्य शरद पाटीलजी आपण जे बोललात, त्याला उत्तर माळी साहेबांनी दिले की, हयांनी कलेक्टर साहेबांकडे जाउन चौकशी वगैरे केली. सर्व ठिकाणी चौकशी केली आणि नियमानुसार त्यांनी जे सांगितले त्याप्रमाणे मंजुरी दिलेली आहे.

**धनराज अग्रवाल :-**

हयाला विधान परिषदेचा नियम लागू नव्हता का?

**मिलन म्हात्रे :-**

नलावडे साहेब, हया गंभीर विषयावर तुम्ही पडू नका. हयाच्यामध्ये ठाणे महानगरपालिका खोपकर हयांचा मर्डर झाला आहे आणि विधान परिषदेच्या निवडणुकीमध्ये कलेक्टर निवडणुक अधिकारी होते.

**चंद्रकांत वैती :-**

सन्मा. सदस्य शरद पाटील साहेब, याबाबत सचिवांनी खुलासा केला की, याबाबत शासनाचे स्पष्ट निर्देश आणि संकेत काय आहे ते मागवले जातील.

**शरद पाटील :-**

याला आम्ही जबाबदार राहणार नाही आणि जे चुकीचे झाले आहे त्याला आमचा विरोध आहे. हे पडताळून आल्यानंतर आम्ही त्याला मंजुरी देउ. पण सध्या हे चुकीचे चालले आहे.

**मिलन म्हात्रे :-**

मागे जे पंधरा दिवस उशिरा आरोग्याचा प्रस्ताव पाठवायचे होते ते ह्यांनी सहा महिन्यांनी पाठविले. ते सुध्दा हयांचे काम होते. त्यांनी चेकिंग करुन मग पुढे यायला पाहिजे होते. त्यांनी ते थांबवायला पाहिजे होते. त्यांनी सभापती साहेबांपुढे आणले नाही पाहिजे होते.

**प्र. सचिव :-**

प्रशासनाने ज्या दिवशी घेतले त्याच दिवशी आम्ही आणले.

**मिलन म्हात्रे :-**

तुम्ही आयुक्त साहेबांचा पिरियड बघा आणि मग आणा. ही सर्वस्वी जबाबदारी त्यांची होती. आज सन्मा. सदस्य मॉरस रॉड्रीक्स सभापती आहेत. उदया सन्मा. सदस्य मोहन पाटील असतील. आम्ही नसणार पण हे लोक असतील. उदया हया चुका ज्या आहेत ते माळी साहेबांकडून चुक झाली ते कबुल झाले पाहिजे. हयाच्याबद्दल प्रशासनाचे काय म्हणणे?

**मा. सभापती :-**

त्याबददल त्यांनी सांगितले आहे.

**प्रकरण क्र. ६५ :-**

श्री. बी. एम. माळी यांची विशेष कार्यकारी अधिकारी म्हणून सचिव विभागाकडे नेमणुक करणेबाबत.

**ठराव क्र. ७४ :-**

मुंबई प्रांतिक महानगरपालिका अधिनियम १९४९ मधील प्रकरण २ नियम ५३(३) अन्वये श्री. बी. एम. माळी यांना सचिव विभागाकडे विशेष कार्यकारी अधिकारी म्हणून दि. ०५/०८/२००४ पासून पांच महिन्यांकरीता दरमहा रुपये १०,०००/- (अक्षरी रुपये दहा हजार मात्र) या मानधनावर नेमणुक करणेंस ही स्थायी समिती सभा मंजुरी देत आहे.

**सुचक :- श्री. आसिफ शेख.** **अनुमोदन :- श्री. दिनेश नलावडे.**

**ठराव सर्वानुमते मंजुर**

**सही/-**
**सभापती**
**स्थायी समिती सभा**
**मिरा भाईंदर महानगपालिका**

(प्र. सचिवांनी प्रकरण क्र. ६६ चे वाचन केले.)

**मोहन पाटील :-**

प्रकरण क्र. ६६ मध्ये नवीन वाहने खरेदीबाबत. मिरा भाईंदर महानगरपालिकेच्या असलेल्या प्रशासकीय अधिकारी, पदाधिकारी हयांना गाडयांची आवश्यकता आहे आणि ज्या ॲम्बेसिडर गाडया आहेत. त्या गाडयांचा पेट्रोलचा जो एव्हरेज आहे. त्या एव्हरेजचा काय ठिकाणा नसतो. त्याच्यामुळे कुठे पाच, कुठे चार असा एव्हरेज येतो आणिएवढी महागाई वाढते आणि एवढे पेट्रोलचे भाव वाढताहेत. त्याच्यामुळे आपण पेट्रोलच्या गाडया घेतात. त्याला एव्हरेज कमी भेटला पाहिजे अशा पध्दतीचा आपण गाडया घेतल्या पाहिजे. तर माझे हया ठिकाणी असे मत आहे की, नवीन वाहने खरेदी करायचे

आहेत.  त्याकरिता आपल्याला मारुती एस्टिमच्या ज्या गाडया आहेत.  ते आपण खरेदी करावे आणि गाडी खरेदी केल्यानंतर ज्या अधिका-यांना गाडया दयायला पाहिजे.  त्यांना दिले पाहिजे.  हे स्थायी समितीच्या संबंधित असलेले आपण लेखापाल हयांच्याकडे गाडी नाही आहे.  त्यांनाही तुम्ही नवीन गाडीची सुविधा निर्माण करा आणि गाडया खरेदी करणेबाबत, मारुती एस्टीम गाडया खरेदी करण्याचा ठराव मी मांडत आहे.

**मिलन म्हात्रे :-**

मी या ठरावाला विरोध करत आहे.  कारण मागच्या वेळेला अत्यावश्यक बाब हायड्रोलिक गाडीची आली.  हायड्रोलिक प्रेशरची शिडी, वृक्ष छाटणीचे वाहन, जे भाडयाने मिळत नाही.  त्याचा आपण ठराव नाकारलेला आहे आणि नवीन गाडया घेण्याकरिता शासनाचे संपूर्ण जी. आर. चा विचार करावा.  कारण मुंबई महानगरपालिकेच्या प्रत्येक प्रभाग समितीच्या सभापतीला इंडिका गाडी वाहन भाडयाने दिले आहे.  हयाची ही तुम्ही नोंद करुन घ्या.  ठाणे महानगरपालिकेतसुध्दा गाडया भाडयाने दिलेल्या आहेत.  इंडिका गाडयासुध्दा भाडयाने घेतलेल्या आहेत.  अशा प्रकारे तुम्ही भाडयाने गाडया घ्याव्यात अशी माझी नोंद करुन घ्या.  नवीन गाडया घेण्याकरिता गव्हर्नमेन्टचा जी. आर आहे.  त्याचे पालन करावे आणि या ठरावाला माझा विरोध नोंदवून घ्या.

**चंद्रकांत वैती :-**

मा. महिला बालकल्याण समिती सभापती आणि प्रभाग समित्यांकरिता गाडया घ्यायच्या आहेत. सन्मा. सदस्य मोहन पाटील हयांनी हया विषयात जो ठराव मांडलेला आहे की, नवीन वाहन खरेदी शिर्षाखाली ३६ लाख रुपयाची तरतुद आहे आणि आपण ज्या गाडया घेतोय त्याला २९ लाख रुपये खर्च अपेक्षित आहे.  हया एस्टीम गाडया घ्याव्यात असे सांगितलेले आहे आणि सन्मा. सदस्य मोहन पाटील साहेबांनी सांगितले की, आपले लेखापरिक्षक, मुख्य लेखापरिक्षक हयांना ही एक वाहन दयायला पाहिजे.  तर हे पद तसे सांविधानिक पद आहे.  ते हयाच्यावर मंजुर पॅटर्नप्रमाणे आहे आणि मुख्य लेखापरिक्षक हे वारंवार आपण कोणाच्यातरी गाडीमधुन येत जात असताना दिसत असतात.  तर त्यांना वाहन दिले पाहिजे.  ही एक चांगली सुचना आहे.  सन्मा. सदस्य मोहन पाटील साहेबांनी जो ठराव मांडला त्या ठरावाला मी अनुमोदन देत आहे.  तसेच, आपल्याकडे भाडयाने गाडी घेण्याची तरतुद आहे.  त्याच्यासाठी आपण तेरा हजार रुपयाची मंजुरी दिलेली आहे.  तर बरेच अधिकारी भाडयाने गाडया वापरत आहेत.

**मिलन म्हात्रे :-**

तशाच वापराव्यात.  आपल्याकडे ३६ ची तरतुद आहे.  ३९ एवढा खर्च येणार आहे.

**आसिफ शेख :-**

अंतर्गत लेखा परिक्षकांना दयायला पाहिजे.  आपले जे प्रभाग अधिकारी आहेत.

**अशोक पाटील :-**

आपल्या हया मिरा भाईंदर महानगरपालिकेत पदाधिकारी आणि अधिकारी हयांच्याकडे एकंदरित किती गाडया आहेत आणि महिन्याकाठी सरासरी इंधनासाठी किती खर्च केला जातो.  हयाची कृपया माहिती सभागृहासमोर दिली तर बरे होईल.

**जोजफ घोन्सालवीस :-**

किती गाडया खरेदी करणार आहोत.  त्याचीही माहिती देण्यात यावी.

**धनराज अग्रवाल :-**

आताच विषय आला की, टेलिफोनचा बिल वाढणार आहे.  तर हयाच्यामुळे इंधनचे बिल किती वाढणार आहे?

**चंद्रकांत वैती :-**

नवीन सुचना आलेली आहे की, आपल्याला ज्या किंमती दिलेल्या आहेत.  त्यात साधारणपणे चार ते पाच हजाराचा डिफरन्स आहे.  तर दुसरी फ्रेश त्यांनी माहिती दयावी आणि तशी नोंद करुन घ्यावी.

**मिलन म्हात्रे :-**

तो प्रश्न येतच नाही. आम्ही आपल्याला भाडयाचे प्रपोझल दिले आहे.  आपण गाडया भाडयाने दयाव्यात आणि सगळया अधिका-यांना दया.  आम्ही नाही म्हणून बोलत नाही.  तुम्हाला उदाहरण दिले आहे.

**शरद पाटील :-**

सभापती महोदय, आम्ही विचारतोय आमचे सदस्य विचारतात गाडया किती मागवणार  आहात.

**रमेश मनाळे (मा. प्र. उपायुक्त (मुख्यालय) साो.) :-**

महिला बालकल्याण समिती आणि इतर प्रभाग समिती अध्यक्ष चार असे एकूण पाच गाडया मागवण्याचा प्रस्ताव आणलेला आहे.

**चंद्रकांत वैती :-**

आणि हया सहाव्या गाडीची सुचना स्थायी समिती सदस्यांकडून आलेली आहे.

**मोहन पाटील :-**

सभापती महोदय, ह्यात अशी एक सुचना करा, नवी मुंबई महानगरपालिका, ठाणे महानगरपालिका, मुंबई महानगरपालिका, कल्याण महानगरपालिका, भिवंडी महानगरपालिका हयांच्या महापौरांना विशेष गाडया आहेत आणि आमच्या महापौरांकडे अम्बेसिटर गाडी आहे तर आपण हयांना ही विशेष गाडी दया. ही सुचना आपण मांडून ठेवावी.

**चंद्रकांत वैती :-**

या सुचनेला आमचा पाठिंबा आहे.

**मिलन म्हात्रे :-**

दोन वर्षापूर्वी ज्या गाडया घेतलेल्या आहेत. त्याची कंडीशन काय? त्यावेळेला सुध्दा अशी मते मांडली गेली आणि गाडया घेतल्या गेल्या. त्याबददल काय? ह्या ठरावाला माझा विरोध नोंदवून घ्या.

**मा. सभापती :-**

सन्मा. सदस्य मिलन म्हात्रे हयांचा या ठरावाला विरोध आहे. त्याची नोंद घेण्यात यावी.

**प्रकरण क्र. ६६ :-**

वाहन खरेदी करणेबाबत.

**ठराव क्र. ७५ :-**

मिरा भाईंदर महानगरपालिका महिला व बालकल्याण समितीच्या सभापती यांची निवड झालेली आहे. तसेच प्रभाग समिती सभापतींची निवड लवकरात लवकर होणार आहे. त्यांना दैनंदिन कार्यालयीन कामकाजाकरिता व मिरा भाईंदर हद्दीतील विकास कामावर देखरेख ठेवून नियंत्रण राखण्यासाठी वाहनाची आवश्यकता आहे. यासाठी मारुती एस्टीम (LX) कंपनीचे अधिकृत विक्रेते यांच्याकडून ५ वाहने खरेदी करण्यांत यावी. या कामी अंदाजित रक्कम रु. २४,३४,३६५/- (मिरा भाईंदर जकात कर वगळून) एवढे अपेक्षित आहे. अंदाजपत्रकात भांडवली खर्च ''अ'' सामान्य प्रशासन नविन वाहने खरेदी या शिर्षकाखाली रु. ३६,००,०००/- इतकी तरतुद उपलब्ध आहे. सदर नविन वाहने खरेदी नंतर ''नविन वाहने खरेदी'' तरतुदीतील उर्वरित रक्कमेमधून मा. महापौर यांचे करिता एक विशेष वाहन उपलब्ध करण्यांत यावे व मा. महापौर यांस नविन वाहन उपलब्ध झाल्यानंतर मा. महापौर यांचे पुर्वीचे वाहन मा. मुख्य लेखापरिक्षक यांना उपलब्ध करावे.

याकामी प्रशासनाने विविध कंपन्यांचे दरपत्रके मागविलेली आहेत. त्यात सध्या सतत वाढत असलेली पेट्रोल, डिझेल यांच्या किंमती, गाडीवर होणारा मेन्टेनन्सचा खर्च याचा विचार करता मारुती एस्टीम (LX) ही गाडी किफायतशीर असल्याने अधिकृत विक्रेते यांनी सादर केलेल्या दरानुसार मारुती एस्टीम (LX) ५ वाहने व मा. महापौर यांचे करीता १ विशेष वाहन असे एकूण ६ गाड्या खरेदी करणे कामी मुंबई प्रांतिक महानगरपालिका अधिनियम १९४९ चे कलम ७३ नुसार मंजुरी देण्यांत येत आहे.

**सुचक :- श्री. मोहन पाटील.** **अनुमोदन :- श्री. चंद्रकांत वैती.**

**ठराव सर्वानुमते मंजुर**

**सही/-**
**सभापती**
**स्थायी समिती सभा**
**मिरा भाईंदर महानगपालिका**

(प्र. सचिवांनी प्रकरण क्र. ६७ चे वाचन केले.)

**मोहन पाटील :-**

संगणकीकरणाबाबत आपण प्रोग्रेस सांगा की, काय चालले आहे आणि कुठून आणखीन आपल्याला काय मागवायचे आहे. मागे मागवले होते.

**सुभाष माशाळकर :-**

हा विषय आमचा नाही.

**मोहन पाटील :-**

आपल्याला विषय माहित नाही का?

**आसिफ शेख :-**

हा मालमत्ता कराचा विषय आहे.

**मोहन पाटील :-**

हा संगणकाचा भाग आहे ना?

**विजय पाटील :-**

संगणकाचा भाग आहे ते बरोबर आहे.

**सुभाष माशाळकर :-**

ठेका पद्धतीने केलेले आहे. तर त्या ठेकेदाराबद्दलचे आहे.

**विजय पाटील :-**

केतन कम्प्युटर्सला आपण २००३-०४ मध्ये ठेका दिला होता आणि त्यांनी जो डेटा तयार केलेला आहे. आपल्या माहितीवरुन तो आपण एका एंन्ट्रीला एक रुपया याप्रमाणे आपण त्याच्याकडून विकत घेतोय व तेथून डेटा मिळाल्यानंतर तो सर्व डेटा माशाळकर साहेबांकडे देवून ह्या वर्षीपासून आपण मिरा भाईंदर महानगरपालिका आता संगणकीकरण करतोय त्याप्रमाणे ती बिले महानगरपालिकेकडून काढणार.

**मोहन पाटील :-**

विजय पाटीलजी, माशाळकरांनी जे उत्तर दिले ते उत्तर आम्हांला अनपेक्षित आहे. सभापती महोदय, विषय तो नाही आहे. संगणकाचा भाग आल्यानंतर संगणकात स्पेशल म्हणजे आपण हुशार आहात आणि आपल्याला ती माहिती पुर्णपणे आहे, म्हणून आपल्याला ह्या ठिकाणी पाचारण करण्यांत आलेले आहे. म्हणून कुठलेही विषय संगणकाबद्दल आले तर आपल्या अधिका-यांमध्ये, डिपार्टमेंटमध्ये को-ऑर्डीनेशन राहणे फार जरुर आहे. हा को-ऑर्डीनेशन नसल्यामुळे असे उत्तर मिळाले. त्यांनी सांगितले हा विषय माझा नाही, तुमचा आहे. म्हणजे एकाने शर्ट घालायचे आणि एकाने पँट घालायची असे करुन चालणार नाही. आपण को-ऑर्डीनेशनमध्ये ही कामे करा आणि आता आपल्याला ह्याची आवश्यकता आहे तर आम्ही कोणत्याही गोष्टीला नकार दिला नाही आणि ज्याने मिरा भाईंदर महानगरपालिकेचे हित होत असेल, आर्थिक बाबतीमध्ये, ते काम करण्यासाठी आम्ही तत्पर प्रशासनाच्या बरोबर आहोत. परंतु, माशाळकरजी आपण जर संगणकाबाबत कुठले विषय आले आणि आपल्या डेटा मागवायचा आहे. तर आपल्या त्या को-ऑर्डीनेशनमध्ये राहायला पाहिजे. कारण शेवटी आपल्याला एकत्र काम करायचे आहे, सेवा विभाग केल्यानंतर.

**सुभाष माशाळकर :-**

साहेब, याबाबत मी आपल्याला स्पष्टीकरण देतो.

**याकुब कुरेशी :-**

आता आपल्याला विजय पाटलांनी सांगितले की, असे असे संगणकीकरण करुन घ्यायचे आहे. तर ज्याला ठेका पद्धतीने दिले होते तो प्रत्येक खात्याला एक रुपया लावून देणार आहे.

**विजय पाटील :-**

आपण त्याला एक रुपया देणार आहोत.

**याकुब कुरेशी :-**

आपण त्याला एक रुपया देणार म्हणजेच त्याने आपल्याकडून ठेका पद्धतीने ही बिले बनविण्याची जबाबदारी घेतली आहे आणि आपल्याला आता परत देतांना एक-एक रुपया प्रत्येक बिलाच्या मागे घेणार आहे. तो आपल्याकडून ते कुठल्या हिशोबाने आणि त्याला द्यायचे कशाला? आपली किती खाती आहेत?

**विजय पाटील :-**

आपली दोन लाख, दोन हजार खाती आहेत.

**याकुब कुरेशी :-**

म्हणजे दोन लाख रुपये आपल्याला खर्च येईल आणि जर हे आपण नवीन आपल्या पद्धतीने करायला गेलो तर आपल्याला किती खर्च येईल?

**विजय पाटील :-**

साहेब, हे जर आपल्या पद्धतीने करायला गेलो तर ह्याला साधारणपणे तीन लाख रुपये एवढा खर्च येणार आहे आणि ह्याला तीन महिन्याचा अवधी लागणार आहे.

**याकुब कुरेशी :-**

याच्यामध्ये वाटाघाटी करुन आपण रक्कम कमी करुन घ्या. एक रुपया आपल्याला द्यायला लागतो. त्यामुळे जवळ जवळ दोन ते अडीच लाख रुपये आपल्याला खर्च येणार आहे.

**शरद पाटील :-**

तो जो ठेकेदार आहे त्याने ठेक्याने आपली कामे केली आणि त्याचा डेटा तो आपल्याकडे का देत नाही? का सुपूर्त करत नाही?

**मा. सभापती :-**

हा माशाळकरांचा प्रश्न आहे. त्यांना बोलू द्या. कारण हे विषय आणतात आणि माशाळकर तुमच्यावर बरीच तक्रार आहे की, तुम्ही विषय कधी आम्हांला सांगत नाही. कसे घेता? जर ठेक्यावर घेतले तर ठेक्यावर तुम्ही काम केले पाहिजे.

**आसिफ शेख :-**

सभापती साहेब, येथे ह्यांचा संबंधच येत नाही.

**याकुब कुरेशी :-**

हा जो डेटा आहे तो मागच्या वेळी ठेका पद्धतीने दिला त्यांचा आहे.

**मा. सभापती :-**

आपल्या महानगरपालिकेकडे ह्यांची फ्लॉपी पाहिजे.

**सुभाष माशाळकर :-**

याबाबत मी आपणांस उत्तर देतो.

**धनराज अग्रवाल :-**

सभापती महोदय, मला याबाबत एक-दोन प्रश्न विचारायचे आहेत. दि. ३१/०३/२००४ रोजी त्याची मुदत संपलेली आहे. त्याला किती महिने झाले.

**विजय पाटील :-**

तीन महिने झाले.

**धनराज अग्रवाल :-**

तीन महिने होऊन गेले आता तुम्ही गोषवाऱ्यामध्ये काय दिले आहे? आपण जर बिल बनवले तर तीन लाख रुपये एवढा खर्च येणार आणि तीन महिने अवधी लागणार. म्हणजे तीन महिने ह्या लोकांनी पहिलेच घालविले आहे. जाणुनबुजून घालवले का? हेतु पुरःस्सर घालवले का? आपल्याकडे सक्षम अधिकारी आलेले आहेत. ते सगळे डेटा एंन्ट्री करु शकतात. त्यांना आपण त्याच्यासाठी ठेवले आहे. आज त्यांना किती महिने झाले? प्रत्येक गोष्टीला जर आपल्याला बाहेरुन सगळे घ्यायचे असेल तर माशाळकरांचे काम काय आहे?

**सुभाष माशाळकर :-**

मा. सभापती साहेबांच्या अनुमतीने बोलतो. हे जे विचारले आहे, तर आपणांना टोटली कन्फ्युज झालेले आहे. पुर्वी केतन कम्प्युटर्स हा ठेकेदार आपल्या महापालिकेची बिले वगैरे काढत होता. आतापर्यंत मागच्या वर्षाचे क्लोजींग पुर्ण संपल्यानंतर ते क्लोजींग करुन डेटा आमच्याकडे यायला पाहिजे व त्याच्यानंतर बिल काढायला पाहिजे हे मान्य आहे. हे आमचे ठरलेले आहे. त्याप्रमाणे केतन कम्प्युटर्स क्लोजींग कम्प्लीट करुन आम्हांला, महापालिकेला डेटा हॅन्डओव्हर केलेले नाही आहे. अजूनही मागच्या वर्षीचे क्लोजींग आता संपत आहे. १ तारखेपर्यंत संपवून देतो म्हणून सांगितलेले आहे. १ तारखेला क्लोजींग करुन तो ज्यावेळेला डेटा देतो. त्यावेळेला टोटल डेटा करेक्ट करुन ते ॲक्च्युअली करेक्टेड डेटा महापालिकेला द्यायचे आहे. मग आम्ही ज्यावेळेला बिल काढतोय त्यावेळेला करेक्ट केलेले बिल सगळ्यांना वाटले जाईल. आता सध्या त्याचे पुर्ण क्लोजींग संपलेले नाही आहे. त्याच्यानंतर जे डेटा एंन्ट्री मालमत्तांचे केलेले आहे, तर पुर्वी जे महापालिकेने त्याच्याबरोबर ॲग्रीमेंट बनवले होते तर कुठेही उल्लेख केलेला नाही. त्या डेटाचे मालकी हक्क कोणाचे आहे? ते ॲग्रीमेंटमध्ये नाही आहे आणि ज्यावेळेला आम्ही तो डेटा मागायला गेला त्यावेळेला तो उठून बसला. तो डेटा मी एंन्ट्री केलेला आहे, मालकी हक्क महापालिकेचा असला तरी आणि एंन्ट्री करायला मी जी मेहनत घेतली आहे त्या मेहनतीचे पैसे पाहिजे म्हणून तो तसा बोलला आहे.

**याकुब कुरेशी :-**

त्याला एकही रुपया द्यायची गरज नाही. ही मालमत्ता नगरपालिकेची आहे, ही गोष्ट लक्षात ठेवा. आपण गटार साफसफाई करायला ठेकेदाराला ठेका पद्धतीने देतो. म्हणून ते गटार ठेकेदाराचे झाले असे नाही. ते गटार महानगरपालिकेच्या मालकीचे आहे आणि तो जो डेटा आहे तर आपण

त्याला ठेका पद्धतीने दिले होते. तो डेटा महानगरपालिकेचा आहे. त्याला एकही रुपया न देता तो सर्व डेटा आपल्याकडे मोफत आला पाहिजे ही नोंद करुन घ्यावी.

**मोहन पाटील :-**

ती जी ॲग्रीमेंन्टची कॉपी आहे ती आपण आम्हांला द्या. त्याच्यात काय नोंद केली आहे ते बघू.

**याकुब कुरेशी :-**

ॲग्रीमेंन्ट काहीही असले तरी तो डेटा आपला आहे. आपण त्याच्यावर कायदेशीर कार्यवाही करा. जर तो डेटा देत नसेल तर त्याच्यावर कायदेशीर कारवाई करा.

**आसिफ शेख :-**

त्याला जेलमध्ये बसवा. मागच्या वेळी आयुक्त साहेबांकडे हा विषय चर्चेला होता तर आयुक्त साहेबांनी स्पष्ट सांगितले की, जर तो डेटा देत नसेल तर त्याला जेलमध्ये बसवा आणि आता पुन्हा विषय आलाच कसा? मालमत्ता आपली, प्रॉपर्टी आपली. देत नाही म्हणजे काय?

**मा. सभापती :-**

दरवर्षी त्याची दादागिरी चालते. तुम्हांला ह्या कामासाठी बसवले आहे. तुम्ही ह्याच्यासाठी काम करायला पाहिजे.

**चंद्रकांत वैती :-**

सभापती साहेब, आपण त्याला गेल्या वेळेच्या टेन्युअरमध्ये त्याने काम केल्यानंतर त्याची जी ठरलेली रक्कम असेल, भाडे ते आपण दिले असेल आणि आपल्याला ती फ्लॉपी द्यायला पाहिजे होती. तो डेटा द्यायला पाहिजे होता. हे कायदेशीररित्या बरोबर आहे. आपले काम संपल्यानंतर आपल्या कामाशी संबंधित असलेल्या सर्व गोष्टी त्यांनी आपल्याकडे सुपूर्त करायला पाहिजे होत्या. परंतु ह्या सभागृहाच्या निदर्शनासमोर माशाळकर साहेब मी आपल्यावर आक्षेप घेतो. आपण ज्या पद्धतीने ह्या सभागृहात सर्व स्थायी समिती सदस्य असतांना, ज्या पद्धतीने तुम्ही सांगितले माझे नाही. ही जबाबदारी झटकण्याचे काम आपले बरोबर नाही. एक तर आपण पूर्ण महाराष्ट्रीयन आहात की, नाही तेही मला कळत नाही. आपली मराठी भाषा थोडीशी असते. पण ज्या पद्धतीने तुम्ही सांगितले ती पद्धत चुकीची आहे. संगणकाशी संबंधित विषय आल्यानंतर तुम्ही त्या विषयात स्वतःची माहिती सादर करायला पाहिजे होती आणि सांगायला पाहिजे होते की, हे अशा प्रकारचे आहे आणि मागच्या केतन कम्प्युटर्सकडून आपल्याला डेटा घ्यायचा होता. ह्या विषयी माझ्याशी काही बोलणे झालेले नाही. चर्चा झालेली नाही असे सांगायला पाहिजे. हे माझे नाही सांगून तुम्ही ज्या पद्धतीने जबाबदारी झटकण्याचा प्रयत्न केला हे संपूर्ण सभागृहाला आवडलेले नाही. आपण मागे प्रस्ताव आणला त्या प्रस्तावाच्या कशा धज्ज्या उडाल्या हे आपल्याला माहिती आहे. आपण आणलेला विषय या सभागृहाने अगदी समर्थपणे सांभाळून घेतलेला आहे, ते सांगा आणि आजपर्यंत आपल्या विषयी आमचे असे मत आहे की, स्थायी समितीला, सदस्यांना कुठल्याही प्रकारची माहिती नसतांना आपले विषय येत असतात. ही आमची शेवटची सभा आहे. ह्याचा अर्थ असा नाही की, ह्याच्यापुढे आमच्याकडून कुठल्याही प्रकारचा आक्षेप घेतला जाईल आणि त्यानंतर आपल्या विषयात मी विशेष बाब म्हणून स्वतः लक्ष घालणार आहे. आपल्याकडून अशा प्रकारचे उत्तर अपेक्षित नव्हते, ज्या पद्धतीने आपण उत्तर दिले, हे महानगरपालिकेचे काम आहे. संपूर्ण संगणकाची जबाबदारी तुमची आहे.

**सुभाष माशाळकर :-**

ठिक आहे, मी माझी जबाबदारी पार पाडेन.

**चंद्रकांत वैती :-**

आणि त्या वेळेला तुम्ही अशा प्रकारे उत्तर दिले ते चुकीचे आहे. ह्याच्यापुढे अशी घटना घडता कामा नये आणि सन्मा. सदस्य याकुब कुरेशी व आसिफ शेख ह्यांची जी सुचना आलेली आहे. ती सुचना जशीच्या तशी आपण स्विकारायला पाहिजे आणि त्यात जर तो करत नसेल तर सन्मा. आयुक्त सो., महापौर सो., सभापती सो. ह्यांच्याकडे आणून संबंधित ठेकेदाराला आपण विचारले पाहिजे की, आपण कशाला पैसे मागता?

**आसिफ शेख :-**

हा विषय फेटाळण्यांत यावा.

**अशोक पाटील :-**

सभापती महोदय, हा जो मालमत्ता कराचा विषय चालू आहे तर केतन कम्प्युटर्स ह्यांना जो ठेका दिलेला आहे त्याचे आतापर्यंतचे बिल अदा करण्यांत आले आहे किंवा नाही.

**विजय पाटील :-**

त्या ठेकेदाराने २००३-२००४ चे जे बिल आहे त्याच्यातले ८० टक्के बिल आपण दिलेले आहे आणि २० टक्के बिल बाकी आहे.

**अशोक पाटील :-**

तुम्ही त्यांचे बिल पेंन्डींग ठेवा, जोपर्यंत ते आपल्याला डेटा देत नाही.

**आसिफ शेख :-**

टोटल अमाऊंट सांगा.

**विजय पाटील :-**

तीन लाख रुपये त्याचे बिल बाकी आहे.

**आसिफ शेख :-**

त्या ठेकेदाराला किती रक्कम अदा करण्यांत आलेली आहे.

**विजय पाटील :-**

पाच लाख ऐंशी हजार म्हणजे सहा लाखापर्यंत बिल दिलेले आहे.

**आसिफ शेख :-**

त्याने मोफतपणे आपल्याला डेटा दिला पाहिजे. जर देत नसेल तर फौजदारी गुन्हा दाखल करा. आपण हा विषय फेटाळून द्या.

**याकुब कुरेशी :-**

ते आपल्याकडे पैसे मागतात आणि तुम्ही पद्धतशीरपणे विषय आणता?

**आसिफ शेख :-**

संगणक विभाग आणि कर विभाग ह्याच्यात सुसंवाद राहिला पाहिजे. कोणा एकाला टारगेट करणे योग्य नाही आहे. दोघांचा सुसंवाद राहूनच काम झाले पाहिजे आणि तो ठेकेदार जर डेटा देत नसेल तर त्याच्यावर गुन्हा दाखला करा आणि त्याला जेलमध्ये बसवा. चुकीच्या पद्धतीने विषय येणे योग्य नाही.

**मिलन म्हात्रे :-**

सभापती महोदय, या विषयामध्ये आपला जो संगणकाचा डेटा तयार केलेला आहे त्याच्यात त्याने अनेक चुका केलेल्या आहेत. आपल्या सन्मा. सदस्यांच्या नावावर काही थकबाकी दाखवलेली आहे. त्याबद्दल आपण नोटीस वगैरे काय त्यांना काढली का?

**मा. सभापती :-**

आपल्या महापालिकेतही किती चुका होतात.

**मिलन म्हात्रे :-**

चुकी म्हणजे केवढी? असे नाही आहे, उद्या जर तुमच्याकडे थकबाकी दोन रुपये बाकी असेल तर तुमचे नगरसेवक पद जाईल.

**मा. सभापती :-**

आपले पाच लाख टॅक्स भरणारे आहेत. तर त्यात पन्नास चुका होणारच.

**मिलन म्हात्रे :-**

प्रश्न तो नाही.

**मा. सभापती :-**

आपल्या महापालिकेत, स्थायी समितीत किती चुका होतात ते तुम्हांला माहिती नाही.

**मिलन म्हात्रे :-**

आपण सदस्य आहात आणि आपल्या नावाने थकबाकी दाखविली तर त्याचे परिणाम आपल्याला माहित नाही. ह्या गांर्भियाने चुका केल्या आणि आपण त्यांना नोटीस देखील काढली नाही. त्याच्यावर माझ्या तक्रारी आहेत.

**मा. सभापती :-**

ह्याचे जे बिल बाकी आहे तर त्याला बिल देऊ नये असा मी आदेश देतो. जोपर्यंत डेटा देत नाही तोपर्यंत त्याला त्याचे बिल देण्यांत येऊ नये. दुसरे तीन महिन्यात सांगतात तर एक महिन्यात आपण दुसरी व्यक्ती आणून देऊन दुसरा डेटा तयार करायला तेच तीन लाख दुस-याला देऊ शकतो. त्याला बिल अदा करणे हे चुकीचे आहे.

**प्रकरण क्र. ६७ :-**

मालमत्ता कराचा संगणकीय डेटा वाजवी दराने खरेदी करणेबाबत.

**ठराव क्र. ७६ :-**

मिरा भाईंदर महानगरपालिकेने सन २००३-२००४ या वर्षाकरिता मालमत्ता करांची बिले काढणे, नोटीसा बजावणे, भरणा पावल्यांची नोंद करणे, क्लोजिंग रजिस्टर तयार करणे, मागणी रजिस्टर बनविणे, आकारणी रजिस्टर तयार करणे इत्यादी कामांचा ठेका मेसर्स केतन कॉम्प्युटर्स यांना प्रति खातेदार रुपये ४.४५ पैसे याप्रमाणे देण्यांत आलेला होता. सदर कामाची मुदत ही दिनांक ३१/०३/२००४ रोजी संपलेली आहे. या पुढे ठेका पद्धतीने काम करण्याची गरज महानगरपालिकेस उरलेली नाही. या वर्षापासून महानगरपालिका स्वतः मालमत्ता करांची सर्व कामे संगणकावर करणार आहे. तथापी ठेकेदार मेसर्स केतन कॉम्प्युटर्स यांच्याकडे उपलब्ध असलेला मालमत्ता करांच्या माहितीचा संगणकीय डाटा वाजवी मुल्य देऊन विकत घेणे आवश्यक आहे. अन्यथा महानगरपालिकेस स्वतःचे डेटा एंन्ट्री ऑपरेटर यांची नेमणुक करुन सदर काम करावे लागणार आहे व ह्या कामांस किमान तीन महिन्यांचा अवधी लागण्याची शक्यता आहे व या कामास अंदाजे रुपये ३,००,०००/- इतका खर्च अपेक्षित आहे. महानगरपालिकेचे मालमत्ता खातेदार साधारणपणे २,०४,००० इतके आहेत, ठेकेदार मेसर्स केतन कॉम्प्युटर्स हे रुपये १/- याप्रमाणे प्रत्येक खातेदारांचा संगणकीय डाटा देण्यांस तयार आहेत. रुपये १/- प्रती खातेदार मुल्य विचारात घेता द्यावयाची रक्कम ही अंदाजे रुपये २,१०,०००/- पर्यंत होणार आहे व सदर खर्च हा संगणक खरेदी/प्रशिक्षण या लेखा शिर्षामधून करण्यांत येणे बाबत व मेसर्स केतन कॉम्प्युटर्स यांच्याकडून मालमत्ता करांचा डाटा खरेदी करण्यास रुपये १/- याप्रमाणे दिलेल्या प्रस्तावास (महानगरपालिकेच्या मालकीचा डाटा असल्याने) मंजुरी नाकारण्यांत येत आहे. मेसर्स केतन कॉम्प्युटर्स यांच्याकडे असलेला डाटा हा महानगरपालिकेने पुरविलेल्या माहितीच्या आधारे तयार केलेला आहे. यामुळे या डेट्यांची मालकी महानगरपालिकेची असल्याने मेसर्स केतन कॉम्प्युटर्स यांनी मालमत्ता कराचा डाटा जोपर्यंत देत नाही तोपर्यंत त्यांचे उर्वरित राहिलेले बिल देऊ नये, तसेच ठेकेदार श्री. मिलिंद पाटील, अभिनव विद्या मंदिर, भाईंदर (पुर्व) यांच्यावर महानगरपालिका मालकीचा कर विभागाचा डाटा न देणे /डाटा न दिल्याने महानगरपालिकेचे आर्थिक नुकसान होणे याकरिता फौजदारी गुन्हा नोंदवण्यांत यावा तसेच मालमत्ता करांच्या कामाकरिता महानगरपालिकेने ठेक्याने कर्मचारी (संगणकीय कामाकरिता) घेण्यांत यावे, सदर खर्च हा संगणक खरेदी / प्रशिक्षण या लेखा शिर्षामधून करण्यांस ही सभा प्रशासकीय व आर्थिक मान्यता देत आहे. सदर कामामध्ये महानगरपालिकेचे श्री. सुभाष माशाळकर, माहिती आणि तंत्रज्ञान अधिकारी यांचे मार्गदर्शन घ्यावे.

**सुचक :- श्री. आसिफ शेख.** **अनुमोदन :- श्री. चंद्रकांत वैती.**

**ठराव सर्वानुमते मंजुर**

**सही/-**
**सभापती**
**स्थायी समिती सभा**
**मिरा भाईंदर महानगपालिका**

(प्र. सचिवांनी प्रकरण क्र. ६८ चे वाचन केले.)

**दिनेश नलावडे :-**

प्रकरण क्र. ६८ चा ठराव मी मंजुरीसाठी मांडत आहे.

**याकुब कुरेशी :-**

सदर ठरावाला माझे अनुमोदन आहे.

**प्रकरण क्र. ६८ :-**

माहे एप्रिल २००४ ते जून २००४ अखेरच्या त्रैमासिक जमा खर्चास मंजुरी मिळणेबाबत.

**ठराव क्र. ७७ :-**

मिरा भाईंदर महानगरपालिकेचे माहे एप्रिल २००४ ते जून २००४ अखेरचे त्रेमासिक लेखे MAC 1971 Form No. 27 नुसार तयार करुन मुख्यलेखापरिक्षक ह्यांचेकडुन तपासणीकरुन घेण्यांत आलेल्या वार्षिक लेख्यास आजची सभा मंजुरी देत आहे.

**सुचक :- श्री. दिनेश नलावडे.** **अनुमोदन :- श्री. याकुब कुरेशी.**

**ठराव सर्वानुमते मंजुर**

**सही/-**
**सभापती**
**स्थायी समिती सभा**
**मिरा भाईंदर महानगपालिका**

(प्र. सचिवांनी प्रकरण क्र. ६९ चे वाचन केले.)

**चंद्रकांत वैती :-**

सदर विषयाची टिपणी मिळालेली नाही.

**शरद पाटील :-**

सदर विषयाची टिपणी मिळालेली नाही आणि हा विषय परत परत येतो, भुईभाडेबाबत विचार विनिमय करणे. सभापती महोदय, या विषयाबद्दल ज्यांचे भुईभाडे वसुल करायची जी जबाबदारी आहे. ही सर्व प्रशासनाची जबाबदारी आहे.

**मा. सभापती :-**

मला आयुक्त साहेबांनी पत्र दिले आहे. ते पत्र मी वाचून दाखवतो. आपण दोनदा हा विषय स्थायी समितीमध्ये घेतलेला आहे आणि जेवढे कमी करता येईल तेवढे कमी करण्यांत आलेले आहे आणि त्याच्यापेक्षा आपण अजून कमी करु शकत नाही. ह्याचे स्थायी समिती सदस्यांना धोकादायक असल्यामुळे आपण ह्याच्याहून अजून कमी करु शकत नाही. तेव्हा आपण ह्याचा गोषवारा दिलेला नाही.

**अनंत पाटील :-**

अध्यक्ष महोदय, या विषयामध्ये आयुक्तांनी म्हटले आहे, महसुल कमी केले तर आर्थिक तुट होणार आहे, त्याच्याशी मी सहमत आहे. तसे आपल्याला करायचे नाही. परंतु, जो आपण ठराव पुर्वी केलेला आहे तो फक्त मार्केटच्या अंतर्गत गाळ्याबाबत होता. आपण मार्केटच्या अंतर्गत गाळ्याच्या व्यतिरिक्त फक्त जागेवर बसलेल्या लोकांना तुम्ही बिल अदा केलेले आहे. त्याला जबाबदार कोण?

**मा. सभापती :-**

मार्केटच्या अतर्गत आहे. मार्केटच्या बाहेर देण्याचा प्रश्नच येत नाही.

**अनंत पाटील :-**

मार्केटच्या अंतर्गत नाही आपण त्यांना व्यतिरिक्त दिलेले आहे.

**मिलन म्हात्रे :-**

मार्केटच्या बाहेर जे बसतात, ज्यांना आपण कुठल्याही सुविधा दिलेल्या नाहीत. मार्केट बांधून दिले नाही, लाईट दिले नाही.

**अशोक पाटील :-**

आचारसंहिता सुरु होण्याच्या अगोदर त्यांनी आपल्याकडे ऑब्जेक्शन दिलेले आहे.

**अनंत पाटील :-**

जो पहिला ठराव दिला होता त्या ठरावाशी आम्ही सहमत आहोत. परंतु ज्यावेळी ठराव झाला आणि तुम्ही चोराला सोडून संन्याशाला फाशी देण्याचा हा प्रकार चालू आहे. ग्रामपंचायतीपासून जे भुईभाडे भरत होते, ते स्वतःच्या कष्टाने केलेले स्टॉल आहे. त्यांना सुद्धा ह्या ठरावाच्या अंतर्गत मार्केट जे आपल्या मालकीचे मार्केट आहेत. त्या मार्केटवाल्यांना द्यायला आमची हरकत नाही. बाहेरच्या लोकांना दिलेले आहे. त्याच्यामध्ये कटलरी दुकाने, केस कर्तनालय आहेत, मासळी विक्रेते आहेत व ज्यांना छप्परसुद्धा नाहीत अशांना भुईभाडे आपण कसे दिले?

**विजय पाटील :-**

महानगरपालिकेने भुईभाडे बाबत सर्व्हे केलेला आहे आणि प्रत्यक्ष महानगरपालिकेचा लिपीक तेथे जाऊन नांवे घेतलेली आहेत. त्याच्या नंतरच आपण ही बिले दिलेली आहेत.

**अनंत पाटील :-**

लिपीकांना त्यांचे स्टॉल दिसले नाही का? लिपीकांनी तुम्हांला जे भुईभाड्याचे दिले आहे तर तिथे स्टॉल नाहीच आहे. अंतर्गत स्टॉलचा त्या ठरावामध्ये उल्लेख आहे.

**विजय पाटील :-**

आपल्या मार्केटमध्ये जे बसतात त्यांनाच आपण बिले दिलेली आहेत.

**मिलन म्हात्रे :-**

मागच्या वेळेला आपण चुक कबुल केलेली आहे की, आमचा सर्व्हे चुकीचा झाला, बाहेरच्या लोकांची नांवे ह्याच्यात घेतलेली आहेत. आम्ही ज्यावेळेला असे ठरवले.

**विजय पाटील :-**

म्हात्रे साहेब, आपण त्याच्यानंतर परत सर्व्हे केला.

**मिलन म्हात्रे :-**

आपल्या मार्केटमध्ये जे बसतात व सुविधा घेतात त्यांना भाडेवाढ करायची.

**विजय पाटील :-**

जे मासे विक्रेते आहेत त्यांनी स्वतःहून उत्स्फुर्तपणे नांवे दिलेली आहेत.

**मिलन म्हात्रे :-**

कोणीही नांवे द्यावीत. आता जे आयुक्तांचे पत्र दिले आहे त्याच्यात आयुक्त काय म्हणतात. ह्यात रक्कम कमी केली तर नगरपालिकेचा लॉस होईल. त्याला स्थायी समितीचे सर्व सदस्य जबाबदार राहीतील. तो जो रंग दिला गेला आहे तसे नाही आहे. आम्ही त्यावेळेला तुमचा कुठलाही प्रस्ताव फेटाळलेला नाही आहे. त्यावेळेला काय सांगितले. चुकीच्या पद्धतीने कर आकारली केली गेली आहे. तुम्ही जी फी दिली आहे, ती चुकीच्या पद्धतीने केली आहे. जसे आता त्यांनी पत्र दिले आहे, तसे आपण एखाद्या माणसाला चुकीचे लावले तर तो सुद्धा उद्या तुम्हांला जबाबदार धरणारच आहे.

**विजय पाटील :-**

आम्ही सर्वांना बिले दिली त्याच्यानंतर ही सगळी जी मंडळी आहेत, मासळी विक्रेते आहेत.

**मिलन म्हात्रे :-**

उद्या समजा, तुम्ही एखाद्या जागेचा अर्ज करणार की, माझे येथे स्टॉल आहे आणि तुम्ही मला भुईभाडे लावा. तर ते तुम्ही ठरवायचे आहे की, कोणाला भुईभाडे लावायचे आहे आणि कोणाला नाही.

**विजय पाटील :-**

मार्केटच्या आतमध्ये जे बसलेले आहेत त्यांनाच भुईभाडे लावण्यांत आलेले आहे.

**आसिफ शेख :-**

आपण पुन्हा आयुक्त साहेबांना पत्र लिहा की, आपण नागरिकांच्या हिताच्या दृष्टीकोनातून जे मासळी विक्रेते आहेत, जे स्थानिक आहेत त्यांना न्याय मिळाला पाहिजे आणि त्यांच्या हिताच्या दृष्टीकोनातून कृपया आपण फेरविचार करा असे आपले आयुक्तांना पत्र जाऊ द्या आणि ह्याच्यावर पुन्हा विचार करुन त्यांना न्याय दिला पाहिजे.

**शरद पाटील :-**

सभापती महोदय, त्याच्यावर निर्णय झालेला आहे आणि फेरविचार वगैरे आपण करुन दिलेले आहे. याच्यापेक्षा अजून रेट कमी होणार नाही. दोनदा कमी झाले आहे. एकदा ह्यांच्याच काळात झाले आहे आणि त्यांच्याही काळातही झाले आहे. कमी केले आहे आणि आता कुठे कमी करता?

**आसिफ शेख :-**

आपण कायदेशीर जबाबदारी घेऊ नका, आयुक्त साहेब कायदेशीर जबाबदारी घेतील.

**शरद पाटील :-**

आम्ही त्याला मंजुरी देत नाही. तुम्ही मंजुरी द्या, तुमच्या पद्धतीने.

**आसिफ शेख :-**

तुम्ही जबाबदारी घेऊ नका.

**शरद पाटील :-**

नाहीच घेणार. हे दोनदा झालेले आहे. आहे ते जसेच्या तसे ठेवा.

**मिलन म्हात्रे :-**

आपल्या प्रिमायसेसमध्ये त्यांना लावायचे असे ठरलेले आहे.

**जोजफ घोन्सालवीस :-**

साहेब, आपण माहिती द्या की, एखाद्या भुईभाड्याला किती वेळा मुल्यांकन करता येते? असे काही कायद्यात आहे का?

**याकुब कुरेशी :-**

मागच्या वेळी भुईभाड्याचे प्रकरण झाले. त्यावेळी आपल्याकडे बराच मोठा मोर्चा आला होता. त्यानंतर आपण आपल्या नगरपालिकेच्या कर्मचाऱ्यांच्या वतीने सर्व्हे करुन घेतलेला आहे. तर ज्यांना स्टॉल दिलेले आहेत त्यांची मार्केटमध्ये दुकाने आहेत अशा लोकांना भुईभाडे आकारणी करण्यांत आलेली आहे, का रस्त्यावर बसतात त्यांना ही आकारणी केलेली आहे?

**शरद पाटील :-**

रस्त्यावर बसतात त्यांना ही भुईभाडे आकारणी केलेली आहे हाच त्यांचा विषय आहे.

**याकुब कुरेशी :-**

असे रस्त्यावर बसणा-यांवर जर भुईभाडे आकारणी केलेली आहे तर ती चुकीची आहे आणि याबाबत कोणाचे ऑब्जेक्शन असेल ते चौकशी करुन त्वरीत रद्द करावे.

**आसिफ शेख :-**

सन्मा. सभापती महोदय, आपण कर निरिक्षक आणि मुख्य निर्धारक ह्यांना विचारा की, अशी किती प्रकरणे आहेत त्याची माहिती घ्या आणि आयुक्त साहेबांना आपण व्यवस्थित माहिती द्या. आयुक्त साहेबांना वस्तुस्थिती कळली नसेल म्हणून त्यांनी सांगितले की, आर्थिक नुकसान होत आहे.

**विजय पाटील :-**

एकूण १०९ मासळी विक्रेते आहेत. १५ मटण विक्रेते आहेत. असे एकूण १२४ भुईभाडेकरुन आहे. साहेब, सर्व्हे केलेला आहे.

**चंद्रकांत वैती :-**

मार्केटमध्ये बसतात त्यांना आपण भाडे लावतोय. पण रस्त्यावर संपूर्ण शहरामध्ये ओळी मासे विक्रेत्यांनी अतिक्रमण केलेले आहे. प्रत्येक स्ट्रीटवरती बसून मोठा त्रास निर्माण झालेला आहे आणि त्याची सगळी घाण रस्त्यावर टाकली जाते. संपूर्ण शहरात कुठेही बघा ते बसलेले असतात आणि त्यांना आपण कुठल्याही प्रकारचे चार्ज लावत नाही किंवा उचलत नाही. पण आपले जे लोक बसतात, मार्केटमध्ये बसतात, जे स्थानिक लोक व्यवसाय करत आहेत तर ह्यांच्यावर वारंवार असे करण्यापेक्षा जो कमी रेट केला आहे तो ग्राह्य धरावा.

**अनंत पाटील :-**

सभापती महोदय, आपण जो ठराव केलेला आहे तो अंतर्गत मार्केटच्या गाळ्या संदर्भात आहे. जे भुईभाडे भरलेले आहे, जे ग्रामपंचायती पासून स्वतःच्या कष्टाने त्याने स्टॉल बांधलेले आहेत. त्यांनासुद्धा हाच रेट चालू केला आहे. त्यांना जवळ जवळ वार्षिक अडीचशे रुपये भाडे होते आणि त्यांना तुम्ही नोटीस पाठवून सहाशे रुपये लावले आहे. म्हणजे त्या माणसावर अन्याय होत नाही का? वार्षिक अडीचशे आणि आता महिन्याला सहाशे रुपये त्यांना कसे जमणार?

**विजय पाटील :-**

साहेब, हा जो ठराव केलेला आहे.

**अनंत पाटील :-**

अंतर्गत मार्केटचा ठराव केला आहे.

**अशोक पाटील :-**

आपल्या मालकीचे जे प्रिमायसेस आहे तिथे बसणा-या लोकांना आपण हा ठराव केलेला आहे.

**विजय पाटील :-**

ते आतमध्येच बसलेले आहे.

**अनंत पाटील :-**

नाही. बाहेरच्यांना आपले बिल दिलेले आहे.

**विजय पाटील :-**

साहेब, आतमध्ये जे बसतात त्यांनाच बिल दिलेले आहे.

**अनंत पाटील :-**

नाही. हवे असल्यास आपण एक समिती गठित करा आणि आताच्या आत्ता बघायला चला.

**मोहन पाटील :-**

सन्मा. सदस्य अनंत पाटील आपल्याकडे असे प्रकरण असतील, त्या प्रकरणाची माहिती आपण स्थायी समिती समोर आणा आणि त्याची आपण चौकशी करु.

**अनंत पाटील :-**

सभापती साहेब, ह्याकरिता आपल्याला किती वेळा भेटलो. खारीगांवच्या महिला आपल्याकडे आल्या होत्या.

**शरद पाटील :-**

सभापती महोदय, त्या महिला मार्केटमध्ये बसणा-या आहेत.

**मोहन पाटील :-**

अनंत पाटील साहेब, तुमच्याकडे अशा केसेस आहेत तर तुम्ही आणा.

**अनंत पाटील :-**

ठराव काय आहे ते आपण वाचा.

**विजय पाटील :-**

राईला फक्त सात लोक आहेत व त्यांनाच आम्ही बिल पाठविले आहे.

**अनंत पाटील :-**

पण मार्केटमध्ये एकही माणूस नाही.

**याकुब कुरेशी :-**

मार्केटमध्ये बसत नाही त्यांना तुम्ही मार्केटमध्ये बसवा. महानगरपालिकेने एवढे रुपये खर्च करुन मार्केट बांधले आहे ते कशाकरिता.

**अनंत पाटील :-**

राईला तुम्हांला सहाशे रुपये भाड्याने घर मिळेल.

**मोहन पाटील :-**

सभापती महोदय, मार्केटमध्ये राहून जर त्याला पत्रा शेड, लाईट, पंखा, पाणी जर त्याला मिळते तर सहाशे रुपये भाडे त्यांना वाईट नाही आहे आणि जे मार्केटच्या बाहेर बसतात त्यांच्याकडून आपण महिन्याला किती घेतो?

**शरद पाटील :-**

त्यांच्याकडून बाराशे रुपये घेतो.

**मोहन पाटील :-**

मग मार्केटच्या आत बसणाऱ्यांकडून आपण कमीच फी घेतोय.

**आसिफ शेख :-**

अनंत पाटील साहेब, आता तुम्हांला सांगितले ना, तुमच्याकडे जर तशी यादी असेल, जे मार्केटच्या बाहेर बसतात आणि त्यांच्याकडून असे भुईभाडे घेत असतील, तर आपण ते भावी सभापतींकडे देऊन टाका.

**शरद पाटील :-**

सभापती महोदय, सन्मा. सदस्य अनंत पाटील ह्यांचे म्हणणे असे आहे की, बाहेर बसणाऱ्यांना तुम्ही पावती लावता. त्यांची तशी काय तक्रार असेल तर त्याची चौकशी करुन ती पावती कॅन्सल करण्यांत यावी असे तुम्ही सांगा.

**मा. सभापती :-**

आपण अशी यादी घेऊन या. आम्ही त्याच्यावर ताबडतोब कार्यवाही करु.

**अनंत पाटील :-**

जे ग्रामपंचायतीपासून स्टॉल आहेत त्यांना वार्षिक अडीचशे रुपये होते त्यांना देखील दिले आहे. ते देखील आपण कॅन्सल करा.

**मा. सभापती :-**

जे माकेटमध्ये नाही व बाहेर बसतात त्यांची आपण चौकशी करु.

**विजय पाटील :-**

साहेब, ती नगरपालिकेची जागा आहे आणि नगरपालिकेच्या जागेत ते दोन आहेत ते धंदा करत आहेत.

**आसिफ शेख :-**

त्यांच्याकडून बाजार फी घेतात.

**विजय पाटील :-**

बाजार फी नाही. दोन भुईभाडेकरु आहेत, ग्रामपंचायत वेळेपासून आहेत आणि ते आता सध्याच्या महानगरपालिकेच्या जागेतच धंदा करत आहेत म्हणून आम्ही त्यांना पाचशे रुपये भाडे पाठवले आहे.

**आसिफ शेख :-**

रोजची आपण जी बाजार फी घेतो त्याची वर्षाला किती रक्कम होते.

**विजय पाटील :-**

बाराशे रुपये होते.

**आसिफ शेख :-**

म्हणजे वर्षाच्या हिशोबाने भुईभाडे स्वस्त होईल.

**अनंत पाटील :-**

स्वतःने बांधकाम केलेल्या स्टॉलवर सहाशे रुपये महिना लावला तर त्या लोकांनी काय करायचे?

**नितीन ठाकुर :-**

त्यांनी तिथे स्वतःने बांधले आहे तर नगरपालिकेने त्यांना बांधकाम करण्याची परवानगी दिली का? त्याची माहिती द्या. कोण, कुठेपण बांधेल आणि त्याला तुम्ही भाडे लावणार का? कसे काय?

**याकुब कुरेशी :-**

बेकायदेशीर असेल तर तोडून टाका.

**अनंत पाटील :-**

ते स्टॉल आहेत ते कायदेशीर आणि ग्रामपंचायत काळापासूनचे स्टॉल आहेत व जे बेकायदेशीर बांधले आहेत ते तोडायची ऑर्डर काढा. दोन दिवसापुर्वी लावलेले स्टॉल तोडून टाका, हिम्मत असेल तर नगरपालिकेची. त्यांना तुम्ही आसरा द्यायचा आणि जे जुने लोक आहेत त्यांना अडीचशे रुपये वार्षिक भाडे होते आणि त्यांना तुम्ही सहाशे रुपये मासिक भाडे लावले आहे. तुम्हांला आमच्या गावामध्ये सहाशे रुपये भाड्याने रुम देतो.

**मा. सभापती :-**

अनंत पाटील तुम्ही आयुक्त साहेबांकडे तक्रार करायची.

**प्रकरण क्र. ६९ :-**

भुईभाड्याबाबत फेरविचार करणे.

**ठराव क्र. ७८ :-**

सदर विषयावर साधक बाधक चर्चा करुन सर्वानुमते नामंजुर करण्यांत आला.

**सुचक :- श्री. मोहन पाटील अनुमोदन :- श्री. आसिफ शेख**

**ठराव बहुमताने नामंजुर**

**सही/-**

**सभापती**

**स्थायी समिती सभा**

**मिरा भाईंदर महानगपालिका**

(प्र. सचिवांनी प्रकरण क्र. ७० चे वाचन केले.)

**आसिफ शेख :-**

प्रकरण क्र. ७०, जो विषय आलेला आहे, सदर कामगारास वारसा पद्धतीने रु. २५५०-५५-२६६०-६०-३२०० या वेतनश्रेणीत नेमणुक करणेंस ही सभा मंजुरी देत आहे असा मी ठराव मांडत आहे.

**शरद पाटील :-**

अनुमोदन होण्यापुर्वी सभापती महोदय मला ह्याच्यावर बोलायचे आहे. त्यांना त्यांच्या जागेवर भरती देण्याबाबत आमचा कुठेही विरोध नाही. पण एक विधवा महिला आज दिड वर्ष झाले, तिचा विषय आता येतो. तो विषय तुम्ही ताबडतोब का आणत नाही? विषय ताबडतोब आणुन त्यांना तुम्ही का देऊ शकत नाही? ह्याचे कारण काय?

**आसिफ शेख :-**

त्यांना कायदेशीर प्रक्रिया पुर्ण करायची आहे.

**शरद पाटील :-**

किती कायदेशीर प्रक्रिया आहेत ते आपल्याला माहित आहे का?

**गोविंद परब :-**

सदर विषय हा वेळेवरच आला असता. परंतु, ती लोक मुंबईमध्ये राहतात. मयतकरांची पत्नी आणि मुंबईमध्ये वारस दाखला त्वरीत मिळत नाही. हा हायकोर्टाचा वारस दाखला येतो व नऊ महिन्यांनी वारस दाखला आला आहे. त्यामुळे त्याला वेळ लागला आहे. १४ जुन २००४ रोजी कोर्टाने वारस दाखला दिलेला आहे. हायकोर्टाचा निर्णय आहे त्याच्यामुळे वेळ झाला आहे. आपल्याकडून वेळ झालेला नाही.

**याकुब कुरेशी :-**

सदर ठरावास माझे अनुमोदन आहे.

**प्रकरण क्र. ७० :-**

लाड समितीच्या शिफारशीनुसार वारसा पद्धतीने सफाई कामगार म्हणून नियुक्त देणेबाबत. (कुमार शिवपेरुमल स्वामी काशी)

**ठराव क्र. ७९ :-**

महानगरपालिका आस्थापनेवर सफाई कामगार म्हणून दि. १/६/१९९० पासून कार्यरत श्री. स्वामी काशी (स.का.) यांचे दि. २७/२/२००३ रोजी निधन झाले असून कै. स्वामी काशी (स.का.) यांची वारस पत्नी आरुपुरी स्वामी काशी यांनी अर्जाद्वारे त्यांच्या वारस मुलाला पतीचे जागेवर नोकरी मिळणेंस विनंती केली आहे.

शासन निर्णय क्र. संकिर्ण-२२९२/१९९९/प्र.क्र.१६४/९२/नवि-६, दि. ३०/६/१९९४ व शासन निर्णय क्र. अकंपा/१०००/प्र.क्र. २०/२०००/आठ, दि. २८/३/२००१ व शासन निर्णय क्र. मागास-२२२००२/५१०/ प्र.क्र.५३/२००२/नवि-६, दि. १७/८/२००२ अन्वये साफसफाई अथवा तत्सम काम करणाऱ्या सफाई कामगाराची आर्थिक स्थिती सबळ नसल्याने त्यांच्या कुटूंबीयांना नोकरीची शाश्वती मिळणे अत्यंत आवश्यक असून सफाई कामगार मयत झाल्यास त्याच्या वारसास लाड समितीच्या शिफारशीनुसार सदर शासन निर्णयाचा अवलंब करुन मयत कर्मचारी यांचा जवळचा नातेवाईक वारस या महानगरपालिका सेवेत नसल्याने मयत कर्मचाऱ्यांच्या एका वारसाला रिक्त जागेवर नेमणुक देता येते.

सबब कै. स्वामी काशी (स.का.) यांचा वारस श्री. शिवपेरुमल स्वामी काशी (मुलगा) यास मयत कर्मचाऱ्यांचे रिक्त जागेवर 'सफाई कामगार' म्हणून वारसाने रु. २५५०-५५-२६६०-६०-३२०० या वेतनश्रेणीत नेमणुक करणेंस मान्यता देण्यांत येत असून येणाऱ्या खर्चास आर्थिक व प्रशासकीय मंजुरी आहे.

**सुचक :- श्री. आसिफ शेख** **अनुमोदन :- श्री. याकुब कुरेशी.**

**ठराव सर्वानुमते मंजुर**

**सही/-**
**सभापती**
**स्थायी समिती सभा**
**मिरा भाईंदर महानगपालिका**

(प्र. सचिवांनी प्रकरण क्र. ७१ चे वाचन केले.)

**चंद्रकांत वैती :-**

अवलोकनाचा हा विषय आलेला आहे आणि प्रत्यक्ष ह्या विषयाचा बोध होत नाही. कारण एकूण किती रक्कम त्याला लागणार आहे, ते अजिबात समजत नाही. ह्याच्यामध्ये तुम्ही साधारण पाहिले तर ह्या गोषवाऱ्यामध्ये बेंचची किंमत रु. १,९७५/- आहे आणि असे २७४ बेंचेस आपल्याला बनवायचे आहेत. एक फालकन कैची पाहिली तर त्यांची किंमत रु ५५४/- आहे आणि ती एका ठिकाणी २५ आणि एका ठिकाणी २० कैच्या. मग एकूण अमाऊंट किती होते आणि साधारणपणे स्थायी समितीच्या समोर पंधरा दिवसाने आपल्याला आणायचे असते. मे महिन्याचा विषय अगदी जुलै महिन्याच्या अखेरीस येतो. तर संपूर्ण ह्याच्यामध्ये वृक्षप्राधिकरणाची तरतुद किती आहे आणि किती खर्च करतोय? पुन्हा आपण रोपटी पाहिल्यानंतर एकूण रोपट्यांवर वेगवेगळी विभागलेली की, कुठे एकच प्रकारचे रोपटे पाचशे मागवले तर कुठे दोन हजार मागवले. तर व्यवस्थित ह्याचा अर्थबोध होत नाही. तर वनखात्याने व्यवस्थित सांगावे कसे काय आहे?

**गोविंद परब :-**

वृक्ष संवर्धन अंतर्गत १ कोटी १५ लाखाची तरतुद आहे आणि २५ लाखाची तरतुद आहे, त्यांच्यातून पिंजरे, माती, रोपे त्याच्यामधून तरतुद करणार आहे आणि हे विषय आहेत तर हे चार प्रकारचे आदेश आहेत. त्याला ३५ लाखापर्यंत खर्च होणार आहे.

**चंद्रकांत वैती :-**

ते खरे आहे. आपण वृक्षरोपणासाठी ठेकेदार नेमला होता व त्याला जबाबदारी दिली होती. तर त्या ठेकेदाराने कुठे काम पुर्ण केले नसेल, रोपटी लावायचे बाकी आहेत. तर अशा ठिकाणी त्याची पुर्तता करायला पाहिजे होती. म्हणजे आपण नेमके काय करतोय हे आपल्याला कळत नाही असा प्रकार चालला आहे.

**शरद पाटील :-**

सभापती महोदय, हे आता वैती साहेबांनी विचारले की, ठेकेदारांची काय माहिती आहे. ठेकेदाराने किती झाडे लावली आहे. माझ्या माहितीप्रमाणे मी एका ठेकेदाराला रोज सांगतो. आमच्या येथे तीन झाडे लावायची आहेत. पण ते लावतच नाही.

**गोविंद परब :-**

भाईंदर पुर्वेला जेवढी झाडे लावायची आहेत तेवढी सगळी झाडे लावण्यांत आलेली आहे.

**शरद पाटील :-**

त्याचे काम पुर्ण झाले?

**गोविंद परब :-**

भाईंदर पुर्वेला पुर्ण झाडे लावून झालेली आहेत आणि दिप डेव्हलपर्स यांची झाडे लावायची बाकी आहेत आणि त्याला एक नोटीस दिलेली आहे. आता फायनल नोटीसनंतर जवळ जवळ त्याचे टेंडर कॅन्सल होणार.

**शरद पाटील :-**

आम्हांला त्याची माहिती लेखी द्या. परबजी किती ठेकेदारांना किती झाडे लावायला दिली आहेत? पिंजऱ्यांचा रंग कोणता आहे?

**गोविंद परब :-**

याबाबत आपल्याला लेखी माहिती देण्यांत येईल.

**दिनेश नलावडे :-**

सभापती महोदय, हा जो विषय आलेला आहे त्या संदर्भात मी आपल्याला बोलतो. नवघर रोडवर नवीन रोड होणार आहे. त्या संदर्भामध्ये या ठिकाणी ठेकेदाराने खड्डे वगैरे करुन ठेवलेले आहे. तो रोड होण्यासाठी आम्ही त्या ठेकेदाराला सांगितलेले की, या ठिकाणी सध्या नवघर रोडला रोपटे लावू नका. दिवाळी नंतर नवघर रोड तयार होणार आहे. तर तिथे ती रोपटी नंतर लागली पाहिजे.

**चंद्रकांत वैती :-**

दि. १८/०६/२००३ रोजी प्रसिद्ध केलेल्या जाहिर निविदांनुसार खालीलप्रमाणे निविदा प्राप्त झालेल्या आहेत.

**गोविंद परब :-**

जुने आहेत त्यांनाच दिले आहे.

**चंद्रकांत वैती :-**

नवीन आहेत त्यांना द्यायला पाहिजे होते. आपण १८/०६/२००३ रोजी केल्या होत्या. कसा काय हा विषय गडबडीने आणलेला दिसतोय.

**हॅरल बोर्जीस :-**

एका ठिकाणी शेणखत रु. ३००/- ब्रास दाखवले आहे आणि दुसऱ्या पानावर तेच शेणखत रु. ६५०/- ब्रासने दाखवले आहे.

**गोविंद परब :-**

रु. ६५०/- बरोबर आहे.

**हॅरल बोर्जीस :-**

रु. ३००/- आधीच्या पानावर लाल मातीचे हजार रु. १,०००/- ब्रास आहे. पुन्हा रु. ६४५/- मातीचे ब्रास दाखवले आहे. तर रु. १,०००/- की, रु. ६४५/- यापैकी किंमत कोणती आहे? विवरणपत्र जे सादर केले आहे त्याच्यामध्ये लाल मातीचे रु. ६४५/- ब्रास आणि शेणखत रु. ३००/- ब्रास.

**गोविंद परब :-**

साहेब, रु. ३००/- नाही रु. ६५०/- बरोबर आहे.

**चंद्रकांत वैती :-**

अवलोकन दहा लाखाच्या आतले करतात. तर हे अवलोकन कितीचे केले आहे?

**गोविंद परब :-**

चार ऑर्डर वेगवेगळ्या आहेत.

**हॅरल बोर्जीस :-**

एकच ठेकेदार वेगवेगळ्या ठिकाणी माती पुरवठा करतो. एका ठिकाणी तो रु. ६४५/- ने करत असेल तर तोच ठेकेदार दुसऱ्या ठिकाणी हजार रुपये ब्रासने माती पुरवतो, ते कसे?

**नितीन ठाकुर :-**

दोन रेट कसे काय?

**हॅरल बोर्जीस :-**

एकाच ठेकेदाराचे नांव आहे.

**चंद्रकांत वैती :-**

एकूण रक्कम प्रत्येकामध्ये किती होते असे विस्तृतपणे आले तर अधिक सभागृहाला योग्य राहिल. म्हणजे निदान आमच्यानंतर येणाऱ्या सभागृहाला नेमके कळेल काय आहे.

**गोविंद परब :-**

ठिक आहे साहेब, तसे ठरावात लिहितो.

**मिलन म्हात्रे :-**

ते हजार ब्रास नाही तर ती क्वॉंटीटी आहे.

**गोविंद परब :-**

३०० ब्रास आणि १००० ब्रास अशी क्वॉंटीटी आहे, ऑर्डर दिलेली.

**हॅरल बोर्जीस :-**

रु. ६४५/- हे लाल मातीचे रेट आहे.

**मिलन म्हात्रे :-**

ते फिक्स रेट आहे?

**गोविंद परब :-**

होय.

**धनराज अग्रवाल :-**

ह्याच्यात तुम्ही अंदाजित किती माती घेणार आहे ते ह्याच्यात लिहिलेले नाही.

**गोविंद परब :-**

३०० ब्रास शेणखत आणि १००० ब्रासची लाल माती त्याची ऑर्डर दिलेली आहे.

**अशोक पाटील :-**

ट्री कटर आहे ते कोणत्या कंपनीचे आहे?

**धनराज अग्रवाल :-**

शिवार गार्डनमध्ये मी रोज जातो. तिथे कुठलेही नवीन झाड लागलेले नाही, ह्या पाच वर्षात. हे किती झाडे आणतात आणि ते मोठे गार्डन आहे तिथे एकही झाड लागलेले नाही. ह्याच्यात कड्या, कुंड्या व एवढे सामान आलेले आहे. पण शौचालयामध्ये कड्या नाहीत. तिथे सात माणसे ठेवलेली आहेत. तर ती माणसे ह्यांना का रिपोर्ट करीत नाही?

**गोविंद परब :-**

साहेब, ते करुन घेतो.

**धनराज अग्रवाल :-**

त्या माणसांवर देखरेख करणारे अधिकारी कोण?

**गोविंद परब :-**

मुकादम आणि श्री. इरकर म्हणून आहेत.

**धनराज अग्रवाल :-**

कोण मुकादम आहे त्यांना तुम्ही विचारा.

**गोविंद परब :-**

आज त्यांना मी विचारतो.

**प्रकरण क्र. ७१ :-**

मा. आयुक्त सो. यांनी मंजुर केलेल्या प्रस्तावाचे अवलोकन करणे (वन विभाग)

**ठराव क्र. ८० :-**

सन २००४-२००५ या आर्थिक वर्षात महानगरपालिका क्षेत्रात उद्याने, मैदाने, स्मशानभुमी तसेच शहरात खाजगी संस्था, रस्ते इत्यादी ठिकाणी वृक्षारोपण व मैदाने, उद्याने, स्मशानभुमी यांतील लहान मोठी झाडांची व्यवस्थित निगा राखणे, हिरवे गार (लॉन) व्यवस्थित ठेवणे यासाठी माती, शेणखत, वृक्षारोपण बि-बियाणे, औषधे साहित्य, शोभिवंत झाडे खरेदीसाठी अर्थसंकल्पात आवश्यक ती तरतुद उपलब्ध आहे. त्यानुसार उद्याने, मैदाने, स्मशानभुमी या ठिकाणी लहान मुले, जेष्ठ नागरीक यांना बसण्यासाठी आर.सी. बेंच बसविणे, याचप्रमाणे शहरातील उद्याने, मैदाने, स्मशानभुमीमधील झाडे

सुस्थितीत ठेवणेसाठी झाडांना माती व शेणखत पुरवठा करण्यासाठी मे. मितेश नर्सरी व भुषण ट्रान्सपोर्ट या ठेकेदाराने जुन्याच दराने काम करण्याची तयारी दर्शविल्याने व तशा प्रकारची पत्रे महानगरपालिकेस सादर केल्याने मा. आयुक्त सोा. यांनी सदर प्रस्तावास मान्यता दिलेली आहे.

१) वन विभागाकरिता वृक्षरोपे व औषधे खरेदी करणे.

| अ.क्र. | कामाचा तपशिल | परिमाण |
|---|---|---|
| १) | कडुलिंब | २०० रोपे |
| २) | महागणी | ३०० रोपे |
| ३) | पुत्रजिवा | ५०० रोपे |
| ४) | अशोक | २०० रोपे |
| ५) | सप्तपुर्णी | २१०० रोपे |
| ६) | बदाम | १०० रोपे |
| ७) | गुलमोहर | १०० रोपे |
| ८) | रेन्ट्री | १०० रोपे |
| ९) | पेल्ट्रोफार्म | १०० रोपे |
| १०) | बहावा | २०० रोपे |
| ११) | जॅकरंडा | १०० रोपे |
| १२) | करंज | १०० रोपे |
| १३) | बकुळ | ४०० रोपे |
| १४) | कदंबा | २०० रोपे |
| १५) | कैलासपती | १०० रोपे |
| १६) | सिता अशोक | १०० रोपे |
| १७) | निलगीरी | १०० रोपे |
| १८) | सरु | १०० रोपे |
| १९) | कॉपर सल्फेट | २ टन |
| २०) | रोगर | १५० लिटर |
| २१) | बाविस्टीन पावडर | १७३ किलो |
| २२) | बिल स्फॉट | १५० लिटर |
| २३) | झिंग फॉस्फेट | १५० किलो |

उपरोक्त कामी मे. मितेश नर्सरी यांना जा.क्र. मनपा/वन/७/९३७/२००४-०५ दि. ०३/०६/२००४ ने कार्यादेश दिलेला आहे.

२) मैदाने, उद्याने, बि-बियाणे व साहित्य पुरवठा

| अ.क्र. | कामाचा तपशिल | परिमाण |
|---|---|---|
| १) | लोखंडी पंजे | २० नग |
| २) | झाडु खराटे | ५०० नग |
| ३) | प्लास्टिक पाईप १'' (धागेवाला) | ५००० फुट |
| ४) | फलकॉन कैची ६'' | २० नग |
| ५) | फलकॉन कैची १२'' | २५ नग |
| ६) | नायलॉन रश्शी १'' | ५०० मिटर |
| ७) | रातराणी | ३०० रोपे |
| ८) | रसोलिया | २००० रोपे |
| ९) | वर्भिना | ५००० रोपे |
| १०) | वेली मिक्स | ३०० रोपे |
| ११) | कॉपर सल्फेट | २ टन |
| १२) | लेंटेना मिक्स | २००० रोपे |
| १३) | पारिजातक | २०० रोपे |
| १४) | आरेका पाम | २५० रोपे |
| १५) | जास्वंदी मिक्स | ५०० रोपे |

उपरोक्त कामी मे. मितेश नर्सरी यांना जा.क्र. मनपा/ववि/१०/५४६/२००४-०५ दि. १०-५-२००४ने कार्यादेश दिलेला आहे.

३) स्मशानभुमीकरिता साहित्य, बि-बियाणे, रोपे खरेदीबाबत.

| अ.क्र. | कामाचा तपशिल | परिमाण |
|---|---|---|
| १) | कु-हाड पोलादी | २५ नग |
| २) | कोयते दांड्याहित | २५ नग |
| ३) | ट्री कटर | १ नग |
| ४) | खराटे झाडु | ४०० नग |
| ५) | स्प्रे पंप १० लि. क्षमतेचा | ५ नग |
| ६) | प्लास्टीक पाईप १'' (धागेवाला) | ३००० नग |
| ७) | रातराणी | ३०० रोपे |
| ८) | रसोलिया | ३००० रोपे |
| ९) | वर्भिना | ४००० रोपे |
| १०) | कॉपर सल्फेट | २ टन |
| ११) | वेली मिक्स | ३०० रोपे |
| १२) | जास्वंदी मिक्स | ३०० रोपे |
| १३) | लेटेना मिक्स | ५००० रोपे |

उपरोक्त कामी मे. मितेश नर्सरी यांना जा.क्र. मनपा/ववि/८/५४४/२००४-०५ दि. १०-५-२००४ ने कार्यादेश दिलेला आहे.

४) मैदाने, उद्याने स्मशानभुमीसाठी बेंचेस खरेदीबाबत.

| अ.क्र. | कामाचा तपशिल | परिमाण |
|---|---|---|
| १) | आर. सी. सी. बेंच पुरवठा करुन बसविणे | २७४ नग |

उपरोक्त कामी मे. मितेश नर्सरी यांना जा.क्र. मनपा/ववि/९/२००४-०५ दि. १०-५-२००४ने कार्यादेश दिलेला आहे.

५) मैदाने, स्मशानभुमी, उद्यानेसाठी शेणखत व लालमाती पुरवठा.

| अ.क्र. | कामाचा तपशिल | परिमाण |
|---|---|---|
| १) | शेणखत | ३०० ब्रास |
| २) | लालमाती | १००० ब्रास |

उपरोक्त कामी मे. भुषण ट्रान्सपोर्ट यांना जा.क्र. मनपा/ववि/३८/९३६/२००४-०५ दि. ३-६-२००४ ने कार्यादेश दिलेला आहे.

उपरोक्त प्रस्तावाचे मुंबई प्रांतिक महानगरपालिका अधिनियम १९४९ चे कलम ७३ (ड) नुसार मा. आयुक्त सो. यांनी सदर प्रस्तावाचे अवलोकन केलेले आहे.

## विवरणपत्र

वन विभागासाठी लागणारे सन २००४-२००५ या आर्थिक वर्षात महानगरपालिका क्षेत्रात उद्याने, मैदाने, स्मशानभुमी तसेच शहरात खाजगी संस्था, रस्ते इत्यादी ठिकाणी वृक्षारोपण व मैदाने, उद्याने, स्मशानभुमीसाठी लागणारे लालमाती, शेणखत, वृक्षारोपण बि-बियाणे, औषधे साहित्य शोभिवंत रोपे खरेदी सन २००३-२००४ चे मंजुर दराचे विवरणपत्र.

| अ.क्र. | तपशिल | २००३-०४ मंजुर दर | ठेकेदाराचे नांव |
|---|---|---|---|
| १. | कडुलिंब | १५/- प्र. रोपे | मे. मितेश नर्सरी |
| २. | महाराणी | ४७/- प्र. रोपे | '' |
| ३. | पुत्रजिवा | ५२/- प्र. रोपे | '' |
| ४. | अशोक | २५/- प्र. रोपे | '' |
| ५. | सप्तपुर्णी | ७५/- प्र. रोपे | '' |
| ६. | बदाम | ३०/- प्र. रोपे | '' |
| ७. | गुलमोहर | ३०/- प्र. रोपे | '' |
| ८. | रेन्ड्री | ३०/- प्र. रोपे | '' |
| ९. | पेल्ट्रोफार्म | ३०/- प्र. रोपे | '' |
| १०. | बहावा | ४०/- प्र. रोपे | '' |
| ११. | जॅकरंडा | ५५/- प्र. रोपे | '' |

| अ.क्र. | तपशिल | २००३-०४ मंजुर दर | ठेकेदाराचे नांव |
|---|---|---|---|
| १२. | करंज | २५/- प्र. रोपे | '' |
| १३. | बकुळ | ५७/- प्र. रोपे | '' |
| १४. | कदंबा | ३९/- प्र. रोपे | '' |
| १५. | कैलासपती | ४५/- प्र. रोपे | '' |
| १६. | सिता अशोक | ४५/- प्र. रोपे | '' |
| १७. | निलगीरी | २५/- प्र. रोपे | '' |
| १८. | सरु | २५/- प्र. रोपे | '' |
| १९. | रोगर | ४३१/- प्र. लिटर | '' |
| २०. | बाविस्टीन पावडर | ७५०/- प्र. किलो | '' |
| २१. | बिल स्फॉट | ५५०/- प्र. लिटर | '' |
| २२. | झिंग फॉस्फेट | ११५०/- प्र. किलो | '' |
| २३. | कॉपर सल्फेट | २७/- प्र. किलो | '' |
| २४. | लोखंडी पंजे | १०५/- प्र. नग | '' |
| २५. | झाडु खराटे | १२/- प्र. नग | '' |
| २६. | प्लास्टिक पाईप १'' (धागेवाला) | ३४/- प्र. फुट | '' |
| २७. | फलकॉन कैची ६'' | ५१७/- प्र. नग | '' |
| २८. | फलकॉन कैची १२'' | ५४५/- प्र. नग | '' |
| २९. | नायलॉन रश्शी १'' | ५४/- प्र. मिटर | '' |
| ३०. | रातराणी | १५/- प्र. रोपे | '' |
| ३१. | रसोलिया | २७/- प्र. रोपे | '' |
| ३२. | वर्भिना | ४२/- प्र. रोपे | '' |
| ३३. | वेली मिक्स | ५०/- प्र. रोपे | '' |
| ३४. | लेंटेना मिक्स | ४५/- प्र. रोपे | '' |
| ३५. | पारिजातक | १०५/- प्र. रोपे | '' |
| ३६. | आरेका पाम | २३५/- प्र. रोपे | '' |
| ३७. | जास्वंदी मिक्स | ७५/- प्र. रोपे | '' |
| ३८. | कु-हाड पोलादी | २०५/- प्र. नग | '' |
| ३९. | कोयते दांड्याहित | १०५/- प्र. नग | '' |
| ४०. | ट्री कटर | ५०१०५/- प्र. नग | '' |
| ४१. | स्प्रे पंप १० लि. क्षमतेचा | २०७५/- प्र. नग | '' |
| ४२. | आर. सी. सी. बेंच पुरवठा करुन बसविणे | १९७५/- प्र. नग | '' |
| ४३. | शेणखत | ६४५/- प्र. ब्रास | मे. भुषण ट्रान्सपोर्ट |
| ४४. | लालमाती | ६५०/- प्र. ब्रास | मे. भुषण ट्रान्सपोर्ट |

महानगरपालिकेच्या विविध विकसित केलेल्या उद्याने, मैदाने यातील लहान मोठी सुशोभित झाडे व अन्य प्रकारची झाडे हिरवे गवत (लॉन) यांची उत्तमपणे निगा राखण्यासाठी बि-बियाणे, रोपे, खते, औषधे साहित्य खरेदी कामी मा. आयुक्त सो. यांनी मुंबई प्रांतिक महानगरपालिका अधिनियम १९४९ चे कलम ७३(ड) नुसार सदर प्रस्तावाला मंजूरी दिलेली आहे.

मैदाने, उद्याने साहित्य, बि-बियाणे खरेदी करणेकामी दि. १७-६-२००३ रोजी प्रसिद्ध केलेल्या जाहिर निविदा नुसार खालील प्रमाणे निविदा प्राप्त झालेल्या आहेत.

| अ.क्र. | कामाचा तपशिल | मे. हर्षद इंटरप्रायजेस | मे. महेश महादु धनगर | मे. मितेश नर्सरी |
|---|---|---|---|---|
| १) | लोखंडी पंजे | रु. ११०/- प्र. नग | रु. ११५/- प्र. नग | रु. १०५/- प्र. नग |
| २) | झाडु खराटे | रु. १५/- प्र. नग | रु. २०/- प्र. नग | रु. १२/- प्र. नग |
| ३) | प्लास्टीक पाईप १'' (धागेवाला) | रु. ४०/- प्र. फुट | रु. ४५/- प्र. फुट | रु. ३४/- प्र. फुट |
| ४) | फलकॉन कैची ६'' | रु. ५२०/- प्र. नग | रु. ५२५/- प्र. नग | रु. ५१७/- प्र. नग |
| ५) | फलकॉन कैची १२'' | रु. ५५०/- प्र. नग | रु. ५५५/- प्र. नग | रु. ५४५/- प्र. नग |
| ६) | टायगर लॉन मोअर व्हिल टा. १८'' | रु. ५०२५/- प्र. नग | रु. ५०३०/- प्र. नग | रु. ४०९५/- प्र. नग |

| अ.क्र. | कामाचा तपशिल | मे. हर्षद इंटरप्रायजेस | मे. महेश महादु धनगर | मे. मितेश नर्सरी |
|---|---|---|---|---|
| ७) | नायलॉन रस्सी १'' | रु. ५५/- प्र. मि. | रु. ६०/- प्र. मि. | रु. ५४/- प्र. मि. |
| ८) | रोगर | रु. ४५०/- प्र. लि. | रु. ४५५/- प्र. लि. | रु. ४३१/- प्र. लि. |
| ९) | बाविस्टोन पावडर | रु. ७७५/- प्र. कि. | रु. ७८५/- प्र. कि. | रु. ७५०/- प्र. कि. |
| १०) | बिल स्फॉट | रु. ५७५/- प्र. लि. | रु. ५८०/- प्र. लि. | रु. ५५०/- प्र. लि. |
| ११) | गोल्डन धुरांडा | रु. ४०/- प्र. रोप | रु. ४५/- प्र. रोप | रु. ३९/- प्र. रोप |
| १२) | रातराणी | रु. १७/- प्र. रोप | रु. २५/- प्र. रोप | रु. १५/- प्र. रोप |
| १३) | रसोलिया | रु. ३०/- प्र. रोप | रु. ३५/- प्र. रोप | रु. २७/- प्र. रोप |
| १४) | वर्मिना | रु. ४५/- प्र. रोप | रु. ५०/- प्र. रोप | रु. ४२/- प्र. रोप |
| १५) | वेली मिक्स | रु. ५५/- प्र. रोप | रु. ६०/- प्र. रोप | रु. ५०/- प्र. रोप |
| १६) | कॉपर सल्फेट | रु. ३०/- प्र. कि. | रु. ३५/- प्र. कि. | रु. २७/- प्र. कि. |
| १७) | लेंटेना मिक्स | रु. ५०/- प्र. रोप | रु. ५५/- प्र. रोप | रु. ४५/- प्र. रोप |
| १८) | पारिजातक | रु. ११५/- प्र. रोप | रु. १२०/- प्र. रोप | रु. १०५/- प्र. रोप |
| १९) | आरेका पाम | रु. २४०/- प्र. रोप | रु. २४५/- प्र. रोप | रु. २३५/- प्र. रोप |
| २०) | झिंक फॉस्फेट | रु. ११७५/- प्र. कि. | रु. ११८५/- प्र. कि. | रु. ११५०/- प्र. कि. |
| २१) | प्लास्टीक झाऱ्या | रु. ३२०/- प्र. नग | रु. ३८५/- प्र. नग | रु. ३१५/- प्र. नग |

वरील तुलनात्मक तक्ता पाहता मे. मितेश नर्सरी यांचे दर सर्वात कमी व वाजवी असल्याने महापालिकेने मनपा/ववि/१०६/२६२१/२००३-०४ दि. ३०-६-२००३ ने कार्यादेश देण्यांत आलेला आहे. तरी मा. आयुक्त सो. यांनी सादर केलेल्या प्रस्तावाचे अवलोकन करावे

---

बि-बियाणे खरेदी कामी मा. आयुक्त सो., यांनी मुंबई प्रांतिक महानगरपालिका अधिनियम १९४९ चे कलम ७३(ड) नुसार सदर प्रस्तावाला मंजूरी दिलेली आहे.

स्मशाने, मैदाने, उद्याने साहित्य, बि-बियाणे खरेदी करणेकामी दि. १८-६-२००३ रोजी प्रसिद्ध केलेल्या जाहिर निविदा नुसार खालील प्रमाणे निविदा प्राप्त झालेल्या आहेत.

| अ.क्र. | कामाचा तपशिल | मे. महेश महादु धनगर | मे. हर्षद इंटरप्रायजेस | मे. मितेश नर्सरी |
|---|---|---|---|---|
| १) | कुऱ्हाड पोलादी | रु. २१०/- प्र. नग | रु. २१५/- प्र. नग | रु. २०५/- प्र. नग |
| २) | गोदरेज कुलूप मोठी साईज | रु. १६०/- प्र. नग | रु. १६५/- प्र. नग | रु. १५०/- प्र. नग |
| ३) | कोयते दांड्यासहित | रु. ११०/- प्र. नग | रु. ११५/- प्र. नग | रु. १०५/- प्र. नग |
| ४) | ट्री कटर | रु. ५०५००/- प्र. नग | रु. ५१०००/- प्र. नग | रु. ५०१०५/- प्र. नग |
| ५) | खराटे / झाडु | रु. १५/- प्र. नग | रु. १७/- प्र. नग | रु. १२/- प्र. नग |
| ६) | स्प्रे पंप १० लि. क्षमतेचा (नॅपकिन) | रु. २१००/- प्र. नग | रु. २१५०/- प्र. नग | रु. २०७५/- प्र. नग |
| ७) | प्लास्टीक पाईप १'' (धागेवाला) | रु. ३५/- प्र. फुट | रु. ४०/- प्र. फुट | रु. ३४/- प्र. फुट |
| ८) | फलकॉन कैची ६'' | रु. ५२५/- प्र. नग | रु. ५३०/- प्र. प्र. नग | रु. ५१७/- प्र. प्र. नग |
| ९) | फलकॉन कैची १२'' | रु. ५७५/- प्र. नग | रु. ५८०/- प्र. नग | रु. ५४५/- प्र. नग |
| १०) | झिंग फॉस्फेट | रु. ११७५/- प्र. कि. | रु. ११९०/- प्र. कि. | रु. ११५०/- प्र. कि. |
| ११) | गोल्डन धुरांडा | रु. ४२/- प्र. रोप | रु. ४५/- प्र. रोप | रु. ३९/- प्र. रोप |
| १२) | रातराणी | रु. १७/- प्र. रोप | रु. २०/- प्र. रोप | रु. १५/- प्र. रोप |
| १३) | रसोलिया | रु. ३०/- प्र. रोप | रु. ३५/- प्र. रोप | रु. २७/- प्र. रोप |
| १४) | वर्मिना | रु. ४५/- प्र. रोप | रु. ५०/- प्र. रोप | रु. ४२/- प्र. रोप |
| १५) | आर.सी.सी. बँच | रु. १९९०/- प्र. नग | रु. १९९५/- प्र. नग | रु. १९७५/- प्र. नग |
| १६) | कॉपर सल्फेट | रु. ३०/- प्र. कि. | रु. ३५/- प्र. कि. | रु. २७/- प्र. कि. |
| १७) | वेली मिक्स | रु. ५५/- प्र. रोप | रु. ६०/- प्र. रोप | रु. ५०/- प्र. रोप |
| १८) | जास्वंदी मिक्स | रु. ८०/- प्र. रोप | रु. ८५/- प्र. रोप | रु. ७५/- प्र. रोप |
| १९) | लेटेना मिक्स | रु. ५०/- प्र. रोप | रु. ५५/- प्र. रोप | रु. ४५/- प्र. रोप |
| २०) | आरेका पाम | रु. २४०/- प्र. रोप | रु. २४५/- प्र. रोप | रु. २३५/- प्र. रोप |
| २१) | रोगर | रु. ४५०/- प्र. कि. | रु. ४५५/- प्र. कि. | रु. ४३८/- प्र. कि. |
| २२) | बाविस्टीन पावडर | रु. ७७५/- प्र. कि. | रु. ७८०/- प्र. कि. | रु. ७५०/- प्र. कि. |

| अ.क्र. | कामाचा तपशिल | मे. महेश महादु धनगर | मे. हर्षद इंटरप्रायजेस | मे. मितेश नर्सरी |
|---|---|---|---|---|
| २३) | बिल स्फॉट | रु. ५७५/- प्र. लि. | रु. ५८०/- प्र. लि. | रु. ५५०/- प्र. लि. |
| २४) | टायगर लॅब (मोअर) | रु. ४१००/- प्र. नग | रु. ४२००/- प्र. नग | रु. ४०९५/- प्र .नग |
| २५) | प्लास्टीक झाऱ्या | रु. ३२५/- रु. नग | रु. ३३०/- प्र. नग | रु. ३१५/- प्र. नग |

वरील तुलनात्मक तक्ता पाहता मे. मितेश नर्सरी यांचे दर सर्वात कमी व वाजवी असल्याने महापालिकेने मनपा/ववि/१०७/२६२२/२००३-०४ दि. ३०-६-२००३ ने कार्यादेश देण्यांत आलेला आहे. तरी मा. आयुक्त सो., यांनी सादर केलेल्या प्रस्तावाचे अवलोकन करावे.

महानगरपालिकेने दिनांक १६-४-२००४ रोजी दै. सुरज प्रकाश या वृत्तपत्रात प्रसिद्ध केलेल्या जाहिर निविदा सुचनेनुसार वन विभागाकरिता मिरा भाईंदर महानगरपालिका हद्दीत ठेका पद्धतीने मजुर पुरवठा करणेकामी मा. आयुक्त सो., यांनी मुंबई प्रांतिक महानगरपालिका अधिनियम १९४९ चे कलम ७३(ड) नुसार सदर प्रस्तावाला मंजुरी दिलेली आहे. तरी ठेकेदारांनी खालीलप्रमाणे आपल्या निविदा मुदतीत सादर केल्या आहेत.

| अ.क्र. | कामांचा तपशिल | मे. सागर इंटरप्रायजेस | मे. एस. एस. इंटरप्रायजेस | मे. हर्षद इंटरप्रायजेस |
|---|---|---|---|---|
| १) | ठेका पद्धतीने स्त्री / पुरुष मजुर पुरवठा करणे. | रु. १२५/- प्र. मजुर प्र. दिन | रु. १२७/- प्र. मजुर प्र. दिन | रु. १२२/- प्र. मजुर प्र. दिन |

उपरोक्त कामी मे. हर्षद इंटरप्रायजेस जा.क्र. मनपा/ववि/२१/५३९/दि. ७-५-२००४ ने कार्यादेश दिलेला आहे.

उपरोक्त प्रस्तावाचे मुंबई प्रांतिक महानगरपालिका अधिनियम १९४९ चे कलम ७३(ड) नुसार मा. आयुक्त सो. यांनी सदर प्रस्तावाचे अवलोकन करुन ही सभा आर्थिक व प्रशासकीय मंजुरी देत आहे.

**सुचक :- श्री. चंद्रकांत वैती.** **अनुमोदन :- श्री. मोहन म. पाटील.**

**ठराव सर्वानुमते मंजुर**

**सही/-**
**सभापती**
**स्थायी समिती सभा**
**मिरा भाईंदर महानगपालिका**

(प्र. सचिवांनी प्रकरण क्र. ७२ चे वाचन केले.)

**मोहन पाटील :-**

सभापती महोदय, बाजार लिलावात आपल्या महानगरपालिकेचा रेव्हेन्यु वाढतोय, तो वाढला पाहिजे. ह्या संपूर्ण मिरा भाईंदर आपण जे रस्ते दिलेले आहेत, ज्या रस्त्यावर बसावे, ज्या रस्त्यावर बसु नये त्याची अंमलबजावणी बरोबर होत नाही. त्याची अंमलबजावणी बरोबर झाली पाहिजे. त्या अंमलबजावणीमध्ये काही गाड्या पकडतात आणि त्या मध्यंतरी जाऊन सोडतात आणि त्याच्यामध्ये हाफ रेट, पाव रेट ते सगळे चालते. त्याच्यावर पारदर्शकता आली पाहिजे त्याकरिता आपण काहीतरी करा.

**हॅरल बोर्जीस :-**

उड्डाणपुल क्रॉस केले तर हाफ रेट, उड्डाणपुलाच्या आधी केले तर क्वॉर्टर रेट आणि उड्डाणपुल पार झाल्यानंतर फुल रेट.

**मोहन पाटील :-**

ह्याच्यावर पारदर्शकता आणा.

**शरद पाटील :-**

भाईंदर पश्चिमेला गेल्या वेळी किती वसुली होती?

**विजय पाटील :-**

भाईंदर पश्चिमेला गेल्या वेळी अडतीस लाख रुपये होते.

**शरद पाटील :-**

भाईंदर पुर्वेला किती?

**विजय पाटील :-**

भाईंदर पुर्वेला अकरा महिन्यांसाठी ४३ लाख रुपये.

**शरद पाटील :-**

मिरा रोडला किती?

**विजय पाटील :-**

२१ लाख ६० हजार.

**शरद पाटील :-**

गेल्या वेळीही सेम होता का?

**विजय पाटील :-**

त्यावेळी २१ लाख ६० हजार होता, आता २१ लाख ८५ हजार एवढा झाला आहे.

**याकुब कुरेशी :-**

एक महिना कमी.

**शरद पाटील :-**

भाईंदर पुर्वेला फक्त एकच लाख रुपये वाढला.

**मा. सभापती :-**

एक महिना कमी दिला आहे.

**शरद पाटील :-**

ठिक आहे, दहा महिन्याचे अकरा महिन्याचे दिले त्याला हरकत नाही. पण भाईंदर पुर्वेला एका वर्षात एवढे फेरीवाले वाढले आहेत की, त्याचा विचारच करता येत नाही.

**अशोक पाटील :-**

सभापती महोदय, हे जे लिलाव विक्री आपण दरवर्षी ठेका पद्धतीने वाढवतो त्याला आपल्याला अपेक्षित वाढ किती आहे?

**विजय पाटील :-**

अपेक्षित वाढ दहा टक्के आहे.

**मोहन पाटील :-**

आपण जी पत्र पाठविली आहेत त्याचे ॲग्रीमेंटचे तपासले आहे का?

**मा. सभापती :-**

त्यांनी केलेले आहे. तो ठराव आपल्याकडे नाही. महानगरपालिकेकडे त्याचा कुठलाही ठराव नाही.

**मोहन पाटील :-**

मग हे आपल्याकडे कसे पाठवले?

**मा. सभापती :-**

त्याने दहा वर्षाची शंभर रुपये प्रमाणे फी भरलेली आहे.

**मोहन पाटील :-**

फी भरलेली आहे?

**मा. सभापती :-**

होय.

**मोहन पाटील :-**

ठराव नव्हता मग फी स्विकारली कोणी? आणि फी भरली कोणी? कोणत्या आयुक्तांनी कोणत्या अधिकाराखाली त्याची ती फी घेतली? ह्याची माहिती आपण सभागृहासमोर द्या. जर मा. महासभेत ठराव झाला नसेल तर फी स्विकारली कशी काय? असे मला बोलायचे आहे.

**मा. सभापती :-**

म्हणून तर, आपण नामंजुर करु या. फी भरायला आले तर महापालिकेत पैसे ताबडतोब घेतात आणि पावती त्यांना फाडून द्यायची.

**मोहन पाटील :-**

साहेब, असे नाही. कोणत्या अधिका-याने फी भरुन घेतली ते आपण आम्हांला सांगा.

**याकुब कुरेशी :-**

ही गंभीर बाब आहे. एवढी सोपी नाही.

**मोहन पाटील :-**

विजय पाटील, आमचे कर घेत नाही. आपण बोलता हा कर आहे तर एवढा नाही. ते कर घेत नाही.

**मा. सभापती :-**

दहा वर्षाची फी आपल्याकडे कोणी घेतली?

**मोहन पाटील :-**

कोणत्या अधिकाऱ्याने कोणत्या आदेशाने फी स्विकारली? ते कोण आहेत?

**मा. सभापती :-**

कोणत्या अधिकाऱ्याने दहा वर्षाची फी अगोदरच घेतली?

**विजय पाटील :-**

साहेब, आमच्या विभागातून घेण्यांत आली नाही. अकाऊंट्सला.

**मा. सभापती :-**

२००४ साली आताच्या लेटेस्टमध्ये फी भरलेली आहे.

**शरद बेलवटे :-**

अकाऊंटस्मध्ये श्रीम. सविता पाटील ह्यांनी फी स्विकारलेली आहे.

**आसिफ शेख :-**

सन्मा. सदस्य मोहनजी पाटील ह्यांनी सभागृहाच्या निदर्शनास एक बाब आणून दिलेली आहे की, ठराव झालेला नसताना देखील फी कशी काय घेतली?

**मा. सभापती :-**

ज्या अर्थी फी घेतलेली आहे, तिच्याकडे काही सुचना नसतांना तिने फी कशी आकारली? तिच्यावर नोटीस बजावण्यांत यावी. मनाळे साहेब, मी आपणांस तिला नोटीस द्यायला सांगतो.

**हॅरल बोर्जीस :-**

सन्मा. सभापती साहेब, त्या बाईने फी आकारणी केली असेल तरी एखाद्या अधिकाऱ्याने तिला ॲड्रेस केलेले असेल. नुसता त्या बाईला दोषी ठरविण्यांत अर्थ नाही.

**जोजफ घोन्सालवीस :-**

त्या अधिकाऱ्यावर कार्यवाही करा.

**हॅरल बोर्जीस :-**

त्या बाईला फी घेण्यासाठी ॲड्रेस कोणी केले असेल त्यांच्यावर कार्यवाही करा. त्या बाईने फी स्विकारली ती काय करेल. तिला जर इम्प्लीमेंट करायला सांगितले तर ती करेल.

**याकुब कुरेशी :-**

आता जी ॲग्रीमेंटची कॉपी दिलेली आहे, लिझ ॲग्रीमेंट म्हणुन या ॲग्रीमेंटचे मा. नाईक साहेबांची सही दाखविलेली आहे. नाईक साहेबांना फोनवर संपर्क साधल्यानंतर नाईक साहेबांनी सांगितले की, सही माझी नाही आणि ही खोटी सही आहे असे त्यांनी सांगितले आहे.

**मा. सभापती :-**

आयुक्तांनी सगळे दाखवले नाही की, ठराव नाही. आता फक्त पेपर दाखवतात.

**हॅरल बोर्जीस :-**

सभापती महोदय, प्रकरण क्र. ७२ चा जो गोषवारा दिलेला आहे. त्याच्यात स्पष्ट नमुद केले आहे की, करारनाम्यात नमुद केल्याप्रमाणे दि. २७/१२/२००१ रोजीच्या तत्कालीन नगरपरिषदेच्या मा. स्थायी समितीमध्ये सदर करारनाम्यास मंजुरी घेतल्याचे करारनाम्यात नमुद केलेले आहे. परंतु, अशा प्रकारच्या मंजुरीचा ठराव कार्यालयीन कागदपत्रांची तपासणी करण्याकरिता कुठेही दिसून येत नाही.

**मा. सभापती :-**

ठरावच नाही. हे मग बोगस आहे.

**याकुब कुरेशी :-**

ह्याच्यावर कायदेशीर कार्यवाही झाली पाहिजे.

**धनराज अग्रवाल :-**

त्याच्यातले एक सदस्य आता आपल्यात बसले आहेत.

**मिलन म्हात्रे :-**

अशोक पाटील ह्यांचे याबाबत काय म्हणणे आहे?

**अशोक पाटील :-**

हे जे १९९६ चे ॲग्रीमेंट आहे त्याच्यावर ही माझी सही नाहीच आहे.

**याकुब कुरेशी :-**

सन्मा. सदस्य बोलतात की, ही माझी सही नाहीच आहे.

**मोहन पाटील :-**

तत्कालीन मिरा भाईंदर नगरपालिकेचे माजी उपाध्यक्ष ह्यांनी सांगितले की, ही माझी स्वाक्षरी नाही आहे. तर हे प्रकरण तरी काय आहे? आणि ते स्वतः येथे हजर आहेत.

**अशोक पाटील :-**

मी स्वतः मागणी करतो की, ह्यावर कार्यवाही करा.

**हॅरल बोर्जीस :-**

सभापती महोदय, हा विषय अतिशय गंभीर आहे.

**आसिफ शेख :-**

विषय अतिशय गंभीर आहे आणि ह्या लोकांना स्थायी समिती म्हणजे काय वाटले? काही प्रस्ताव आणणार आणि काही मंजुर करुन घेणार.

**नितीन ठाकुर :-**

आपण विषयाचे गांभीर्य लक्षात घ्या.

**अशोक पाटील :-**

माझ्या डोळ्यासमोर कधी ही कागदपत्रच आलेली नाहीत.

**याकुब कुरेशी :-**

सभापती साहेब, हे जे ॲग्रीमेंट केलेले आहे. ह्याच्यामध्ये स्थायी समितीच्या हिशोबाने ह्या ॲग्रीमेंटची संपूर्ण शहानिशा करण्यासाठी कारवाई करु शकतो का नाही? कुठल्या पद्धतीने स्थायी समिती म्हणून कार्यवाही करु शकतो? ह्या ॲग्रीमेंटच्या हिशोबाने. ह्याच्यामध्ये दुसरी सही स्थायी समिती सदस्य मा. अशोक पाटीलजी ह्यांची आहे. ते आता स्वतःच म्हणाले की, ही सही माझी नाही. ज्याप्रमाणे नाईक साहेबांना संपर्क केल्यावर नाईक साहेबांनी सांगितले की, हे ॲग्रीमेंट अशा प्रकारचे मी केलेले नाही आणि जर त्यावर माझी सही असेल तर ती खोटी सही आहे. तसेच सन्मा. सदस्य अशोक पाटील सुद्धा बोलत आहे की, ही सही माझी नाही. म्हणजेच हे फ्रॉड आणि बोगस डॉक्युमेंट आहेत. ह्याच्यावर अशा प्रकारचे बोगस डॉक्युमेंट करणाऱ्यांवर कार्यवाही करावी असा मी ठराव मांडतो.

**नितीन ठाकुर :-**

दोघेही व्यक्ती आहेत, उपायुक्त शिवमुर्ती नाईक साहेब व आमचे सदस्य श्री. अशोक पाटीलजी हे दोघेही जिम्मेदार व्यक्ती आहेत आणि त्यांनी स्पष्ट करुन सांगितले आहे की, ही आमची सही नाहीच आहे. तर कारवाई करणे जरुरी आहे.

**आसिफ शेख :-**

सन्मा. सहाय्यक आयुक्त त्यांच्याकडे उपायुक्त (मुख्यालय) चार्ज आहे. तर तुम्ही हे असे प्रकरण आणलेच नाही पाहिजे होते. स्थायी समितीपुढे हे असे कसे प्रकरण आणता तुम्ही? कळते का, ही गंभीर बाब हे की नाही? स्थायी समितीसमोर वाटेल तसे प्रकरण आणता.

**याकुब कुरेशी :-**

आणले म्हणून चौकशी करायला सांगतो. स्थायी समितीची मागणी आहे ह्यावर कायदेशीर कार्यवाही करण्यांत यावी.

**रमेश मनाळे (मा. प्र. उपायुक्त (मुख्यालय) सो.) :-**

ही बाब स्थायी समितीच्या निदर्शनास आणलेली आहे, हा जो गोषवारा दिलेला आहे.

**अशोक पाटील :-**

२७ डिसेंबर २००१ ची स्थायी समितीची प्रोसिडींग काढून बघा.

**मा. सभापती :-**

प्रोसिडींगमध्ये ठरावच मंजुर नाही आहे.

**अशोक पाटील :-**

मग विषयच संपला.

**शरद पाटील :-**

सभापती महोदय, हा गोषवारा तुमच्याकडे कधी आला?

**रमेश मनाळे (मा. प्र. उपायुक्त (मुख्यालय) सो.) :-**

दोन्ही ठराव झालेले असल्याचे निदर्शनास आलेले आहे. नंतर ही बाब स्थायी समितीच्या निदर्शनास आणलेली आहे की, अशा प्रकारचा ठराव नाही.

**याकुब कुरेशी :-**

दुसरी एक गोष्ट, एवढ्या वर्षापासून ते बाजार वसुली करतात. ती देखील रक्कम त्यांच्याकडून वसुल केली पाहिजे, ही नगरपालिकेची जबाबदारी आहे. ही नगरपालिकेची मालमत्ता आहे. असे खोटे डॉक्युमेंट तयार करुन जर ते लोक वसुली करत असतील तर त्यांच्यावर कायदेशीर कार्यवाही झालीच पाहिजे.

**मा. सभापती :-**

आजपर्यंत जे वसुली केलेले आहे, ते ह्या ठेकेदाराला कमी करुन देणे.

**शरद पाटील :-**

ते वसुलच करु द्यायचे. ती नगरपालिकेची वसुली आहे.

**मा. सभापती :-**

त्याने केलेले आहे. प्रफुल्लने केलेले आहे.

**याकुब कुरेशी :-**

त्यांच्याकडून वसुल करण्यांत यावी.

**मा. सभापती :-**

आपल्यामुळे त्यांना लॉस झालेला आहे. त्यांचे तसे पत्र आलेले आहे. त्यांना लॉस होतो.

**शरद पाटील :-**

त्याने आता घेतले ओ ते सोडूनच घेतले आहे ना?

**मा. सभापती :-**

नाही ते मंजुर आहे. ते ॲग्रीमेंटमध्ये मंजुर आहे.

**शरद पाटील :-**

कधी?

**मा. सभापती :-**

आता दिलेल्या बाजार लिलावामध्ये.

**अशोक पाटील :-**

ही छायांकित प्रत जेव्हा तुमच्याकडे सादर केली तेव्हा तुम्ही ओरिजनल प्रत बघितली का?

**अनंत पाटील :-**

लिलाव करण्याच्या अगोदर ओरिजनल प्रत बघितली का?

**अशोक पाटील :-**

ह्या सभागृहासमोर तुम्ही हे जे झेरॉक्स दिलेले आहे त्याची ओरिजनल प्रत तुम्ही बघितली आहे का?

**विजय पाटील :-**

ओरिजनल प्रत कार्यालयात नाही आहे.

**अशोक पाटील :-**

कार्यालयात नाही. मग ह्या प्रत तुम्हांला कोणी दिल्या?

**विजय पाटील :-**

विठोबा देवालय ट्रस्ट ह्यांचे प्रतिनिधी आले होते, त्यांनी दिलेले आहे.

**अशोक पाटील :-**

त्यांच्याकडून ओरिजनल तुम्ही तपासून बघितले का?

**विजय पाटील :-**

तपासून बघण्यांत आलेली नाही.

**अशोक पाटील :-**

मग ही गंभीर बाब आहे. फक्त तुम्ही झेरॉक्स बघता.

**मोहन पाटील :-**

ह्याच्यामध्ये आपण ज्यांनी ज्यांनी ॲग्रीमेंट केले आहे, ठराव नव्हता, पैसे तुम्ही गोळा करता आणि ठराव न होता पैसे तुम्ही गोळा करुन घेता आणि समोरच्या पार्टीला तुम्ही स्टॅम्प म्हणजे अधिकारी वर्गाने मनमानी करायची का? जर तुम्ही त्याची सत्यप्रत बघत नाही आणि दोन्ही मुख्याधिकारी सांगातात की, ही सही आमची नाही. मग संपूर्णपणे हा विषय सभापती महोदय आपण आणलात म्हणून धन्यवाद. त्यात प्रश्न नाही. परंतु, ह्या संपुर्ण प्रकरणाची चौकशी झाली पाहिजे आणि हे होत असतांना अधिका-यांनी आपला अधिकाराच्या दाय-यामध्ये राहून त्याची संपूर्णपणे पाहणी केली पाहिजे.

त्याची चौकशी केली पाहिजे. आपला अधिकारी वर्ग काही करत नाही. एकदम अंगाशी आले की, झटकता आणि एवढा गंभीर विषय चालू असतांना आमचे मित्र मिलन म्हात्रेजी या विषयावर गप्प आहेत म्हणून मला संशय निर्माण झाला की, काय प्रकार आहे? कारण प्रत्येक विषयामध्ये ते बोलत असतात. आपल्याला जर ह्याच्याबद्दल माहिती असेल तर ती माहिती आपण द्यावी.

**मिलन म्हात्रे :-**

मी गप्प का, तर माझा ह्याच्यामध्ये काही एक संबंध नाही आणि हे कागद मलासुद्धा मिळालेले आहेत. खरं तर मला बोलते केले म्हणून मी बोलतो. माझी जर सही नसेल तर सगळ्यांत पहिले मी उठून बोललो पाहिजे की, ही माझी सही नाही. आपण ह्याच्यावर कार्यवाही करा.

**आसिफ शेख :-**

सन्मा. सदस्य अशोक पाटीलजी बोलले व त्यांनी चौकशीची मागणी केली.

**अशोक पाटील :-**

मी बोललो आहे.

**मिलन म्हात्रे :-**

सगळ्यांत पहिले सन्मा. सदस्य अशोक पाटील आपले वक्तव्य झाले. मी हे बघतोय. कारण सिग्नेचरी ऑथोरिटी येथे बसलेली आहे. ते बोलत नाही की, ती माझी सही नाही. हे पहिले त्यांनी डिनाईल केले पाहिजे होते. तुमच्या अगोदर हे उसळून उठून बोलायला पाहिजे होते. माझ्या नावावर जर कोणी काय खोटे केले असेल तर सगळ्यात कायदेशीर हिशोबाने मी बोलले पाहिजे की, हे चुकीचे आहे. ही सही माझी नाही आहे. हे तुमच्या कॉमेंन्टस् नंतर ते बोललेले आहेत. ह्याच्यानंतर तुमच्या खुलाशामध्ये मला ऐकायला आले की, तो ठराव झालेला नाही व ह्याच्यातही तुम्ही दिलेले आहे. पण तुमचा ठराव झालेला नाही आहे आणि सन्मा. सदस्य याकुब कुरेशी म्हणाले फोनवर. तर कशासाठी? एक आठवडा अगोदर तुम्हांला पत्रव्यवहार झालेला आहे. हा विषय तुम्ही आम्हांला एक आठवड्या अगोदर दिलेला आहे. शिवमुर्ती नाईक ह्यांच्याकडे स्पेशल मॅसेंजर पाठवून त्यांचे रायटींगमध्ये घ्यायला पाहिजे होते.

**शरद पाटील :-**

ही टिपणी आता दिली आहे.

**मा. सभापती :-**

बाजार वसुलीची तक्रार आल्यानंतरच होते.

**मिलन म्हात्रे :-**

मी काय बोलतो हे तुम्ही नीट अगोदर ऐकून घ्या. विषयपत्रिका आम्हांला एक आठवड्या अगोदर मिळाली. म्हणजे या विषयाचे सगळे कागदपत्र तुमच्याकडे आहे. आता तुम्ही म्हणता ओरिजनल आमच्याकडे नाही. मग ती गेली कुठे? विठोबा ट्रस्ट आणि महानगरपालिका ह्याच्यामध्ये ते ॲग्रीमेंट झालेले आहे. तुमची ओरिजनल कॉपी गेली कुठे? ह्याच्याबद्दल कोण बोलते का?

**याकुब कुरेशी :-**

हे बोगस आहे.

**मिलन म्हात्रे :-**

बोगस असो किंवा नसो, तुम्ही तक्रार केली का? ह्याच्यामध्ये मुख्याधिकारी ह्यांची सिग्नेचर आहे. त्याच्यावर गोल सिल आहे. खाली त्यांचे स्वतःचे सिल आहे. हे सगळे जे आहे ह्याच्यामध्ये ही जी पावती आहे त्या पावतीबद्दल सुद्धा बोललो. ही पावती त्यांना मी स्वतः जाऊन डिपार्टमेंटला भेटलो. त्यांना मी ते विचारले की, ही पावती खरोखर तुमच्याकडे आहे का? ह्या पावतीबद्दल सुद्धा काय ते आपण बघा. मी त्यांना अगोदर जाऊन भेटून आलेलो आहे. तुमच्याकडे चर्चा सुरु त्याच्यामुळे मी गप्प आहे. तुमची चर्चा आहे ती होऊन जाऊ द्या. हा विषय अतिशय गंभीर आहे. तुम्ही मागणी करत आहात. आम्ही कुठे बोललो की, तुम्ही ह्याच्यामध्ये त्यांना वाचवा किंवा ह्याच्यामध्ये माझी काही इन्व्हॉल्वमेंट नाही. हे ट्रस्ट माझे नाही आहे. पण त्याच्या अगोदर सभापतींना देखील मी जाऊन भेटलो आहे, ह्या विषयावरती. तुम्ही जे म्हणता त्याला आम्ही विरोध केला आहे का? तर नाही. आता अशोक पाटील येथे बोलले की, माझी सही नाही तिथेच सगळा विषय संपला. तुम्हांला जी कारवाई करायची आहे, ती कारवाई तुम्ही करु शकता.

**मोहन पाटील :-**

अधिका-यांनी जर असे पैसे वसुल केले, अधिका-यांजवळ सत्यप्रत नाही आहे. माझा तो विषय आहे. देवस्थान ट्रस्ट हे बाजुला राहीले. परंतु, जर अधिका-याला चाकोरी दिली, त्याची सही तर आहे.

**मिलन म्हात्रे :-**

मोहन पाटील साहेब, आपण पुर्वीचे सभापती असतांना असाच विषय तुमच्याकडे आला होता. त्या इमारतीमध्ये चुकीच्या माणसाला तुम्ही पावत्या फाडल्या आणि त्याच्यामध्ये बाईला आणि त्यांच्यावर अजून कारवाई करायचे राहिले आहे. आपण त्यावेळेला केली? नाही केली. कोर्टाचे मॅटर असतांना सुद्धा आपण कार्यवाही केली नाही. त्याच्यामध्ये आपण आदेश दिला होता, हे चुकीचे कोर्ट मॅटर झाले असताना फारुख कुरेशी ह्याच्या नांवाने पावती खतवली गेली. ती मी पावती देखील दाखविली. ह्याच्यावर तुम्ही आदेश दिले की, ह्यांना तुम्ही निलंबित करावे. पण अजून कुठलीही कार्यवाही झालेली नाही. आपण नुसते बोलता. आपण त्या खुर्चीवर स्वतः बसलेले होता. मी तुम्हांला सांगितले, कोर्टाचे मॅटर होते. त्यात मी कोर्ट मॅटर, केस नंबर सगळे मेन्शन केलेले आहे आणि त्या माणसाने घुसखोरी केली. त्याच्यावर आपण ट्रेस पासींगची केस दाखल करण्याऐवजी आपण त्याची पावती फाडून दिली. त्या चौकशा झाल्या. कोणीतरी बिचारी क्लार्क बाई तिला कोणीतरी केबीनमध्ये बोलावले, अँटीचेंबरला दम दिला, तिने पावती फाडली. आपण त्याची चौकशी केली का? तर नाही. हे तुमच्या वेळचे प्रकरण आहे आणि आता हे ह्यांच्या वेळचे प्रकरण आहे.

**मोहन पाटील :-**

म्हणून सांगतो, अधिका-यांना जर एवढी संहिता असतांनासुद्धा अधिकारी वर्ग मनमानी पैसे गोळा करतात. तुम्ही जो प्रकार आता सांगितला.

**मिलन म्हात्रे :-**

त्यावेळेला आपण केले. त्यावेळेला कारवाई केली नाही म्हणून आता डेरिंग झाली.

**मोहन पाटील :-**

आता दुस-यांदा आलेले आहे, तर आपण काय करायचे?

**मिलन म्हात्रे :-**

आपण जर कारवाई केली असती तर आपल्यावर कारवाई झाली असती म्हणून आपण कारवाई केली नाही.

**मोहन पाटील :-**

आमच्यावर कार्यवाई करायला आम्ही वसुली केली आहे का? आम्ही पैसे खाल्ले आहेत का?

**मिलन म्हात्रे :-**

पैसे खाण्याचा प्रश्न नाही.

**आसिफ शेख :-**

पदाधिका-यांचा संबंध आलाच नाही. कार्यवाहीचा संबंध नाही. ज्याने पावती फाडलेली आहे त्याच्यावर कार्यवाही झाली पाहिजे आणि ज्यांनी आदेश दिलेले आहेत त्याच्यावर कार्यवाही झाली पाहिजे.

**मिलन म्हात्रे :-**

मागच्या वेळेला हे सभापती होते. ते प्रकरण असेच चर्चेला आले.

**आसिफ शेख :-**

आताचे बोला. झाले गेले गंगेला मिळाले.

**मिलन म्हात्रे :-**

त्यावेळेला तुम्ही सभागृहामध्ये नव्हता. अशीच पावती खतवली गेली, त्याची चौकशीसुद्धा झाली. त्याच्यानंतर कारवाई काहीच नाही.

**आसिफ शेख :-**

सन्मा. सदस्य अशोकजी पाटील ह्यांनी स्वतः सांगितले आहे की, ही माझी सही नाही. त्याची चौकशी करा.

**रमेश मनाळे (मा. प्र. उपायुक्त (मुख्यालय) सो.) :-**

या संदर्भात पुर्वी जे काय झाले त्याच्याविषयी चौकशीची कार्यवाही चालू आहे. संबंधित दोन व्यक्तींवर चौकशीची कार्यवाही चालू आहे. जे आता सन्मा. सदस्य म्हात्रे साहेबांनी विचारणा केली की, त्याची चौकशी झाली का? तर संबंधित दोन कर्मचा-यांवर चौकशीची कार्यवाही चालू आहे.

**मिलन म्हात्रे :-**

वर्ष झाले त्याच्यावर कोर्टाची ऑर्डर आहे आणि त्या माणसाने तुमच्यावर केस केली आहे, नगरपालिकेवर आणि त्यांनी ट्रेस पासिंग तोडून, लॉक तोडून त्याच्यामध्ये एंन्ट्री केली. त्याला आपण पावती फाडून दिली. ह्याला आता दिड वर्ष होईल.

**हॅरल बोर्जीस :-**

मनाळे साहेब, कदाचित केस संपूर्णपणे तुमच्यासमोर आलेली नाही. त्यावेळेला तुम्ही नव्हता.

**मिलन म्हात्रे :-**

महानगरपालिकेची प्रॉपर्टी असतांना ही केस महानगरपालिका हरलेली आहे. ह्याच्यापेक्षा आणखीन दुर्दैव काय असणार?

**रमेश मनाळे (मा. प्र. उपायुक्त (मुख्यालय) सो.) :-**

त्या अनुषंगाने चौकशीची कार्यवाही चालू आहे.

**मिलन म्हात्रे :-**

मनाळे साहेब, असे करतो उद्या तुमच्या केबिनचा ताबा मी घेतो आणि माझी प्रायव्हेट कन्सल्ट येथून येऊन खोलतो आणि कोर्टातून स्टे घेऊन येतो आणि जिंकतो.

**मा. सभापती :-**

आता आजच्या विषयावर बोला.

**मिलन म्हात्रे :-**

हे सिमीलर आहे.

**मोहन पाटील :-**

सिमिलर झाले ते बरोबर आहे. ह्याच्यावर कार्यवाही चालू आहे, त्याचे तुम्हांला उत्तर दिले आहे. पण आता या बाबतचे काय?

**मिलन म्हात्रे :-**

मग नगरपालिका हरली कशी काय?

**नितीन ठाकुर :-**

महानगरपालिकेने आता तिथली बाजार वसुली चालू करावी.

**मोहन पाटील :-**

म्हात्रे साहेबांचे असे म्हणणे आहे की, गढे मुडदे उखाडो और जो मुडदा पडा है, उसे बाहर फेक दो।

**मिलन म्हात्रे :-**

एकाचा नाही, आपण सगळ्यांचा विचार केला पाहिजे. मी कोणालाही काहीही बोललेलो नाही.

**मोहन पाटील :-**

म्हणजे एक मुडदे को अलग न्याय देने और एक मुडदे को अलग न्याय देने का, असे करायचे का?

**मिलन म्हात्रे :-**

हे तुम्ही करता. त्यावेळेला तुम्ही जर डिसीजन घेतला असता तर आज दुसऱ्यांदा डेअरिंग झाली नसती.

**मोहन पाटील :-**

बरोबर आहे, मग आता आम्ही करायचे काय?

**मिलन म्हात्रे :-**

करा ना तुम्ही. मी कुठे नाही बोलतोय.

**मोहन पाटील :-**

तेच बोलतो, आम्हांला तेच बोलायचे आहे की, तुम्ही हे सांगा. हम देखते, कपडे संभालते।

**नितीन ठाकुर :-**

आमची अपेक्षा अशी होती की, सन्मा. सदस्य मिलन म्हात्रे साहेब स्वतः बोलतील की, ह्या ह्या कायद्याप्रमाणे ही कार्यवाही करा.

**मा. सभापती :-**

आजच्या आज दोघांना नोटीस बजावण्यांत यावी.

**आसिफ शेख :-**

त्यांच्यावर दोषारोप ठेवा आणि पंधरा दिवसांत चौकशी करा. एक तर महानगरपालिकेचे आर्थिक नुकसान केलेले आहे. दिशाभूल केलेली आहे. खोटे डॉक्युमेंट तयार केलेले आहे.

**मा. सभापती :-**

बोगस असल्या कारणाने पोलीस केस करा.

**मिलन म्हात्रे :-**

मनाळे साहेब, त्याच्यामध्ये एक चीफ ऑफीसर, त्याच्यानंतरचे दुसरे चीफ ऑफीसर ह्यांच्या स्वाक्ष-या आहेत. हा विषय गांभिर्याने घ्या. उगाच कोणीतरी ओढून ताणून करु नका. तुम्ही पहिले अधिका-यांचे रायटिंगमध्ये घ्या की, आमची सही आहे किंवा नाही हे त्यांचे लेखी घ्या.

**मा. सभापती :-**

पण आता सन्मा. सदस्य याकुब कुरेशी म्हणाले.

**मिलन म्हात्रे :-**

दुरध्वनीवरुन तसे होत नाही.

**मा. सभापती :-**

हे समक्ष बोगस दिसत आहे. येथे त्यातले श्री. अशोक पाटीलजी हे सभासद बसलेले आहेत.

**मिलन म्हात्रे :-**

तुम्ही त्यांना पत्र द्या. हे तर एक आठवड्यामध्ये लेखी घ्यायला पाहिजे होते. मी तर असे म्हणतो, एक आठवडा आमच्याकडे पेपर आहेत. तुमच्याकडे विषय आलेला असतांना तुम्ही लेखी घ्यायला पाहिजे होते की, शिवमुर्ती नाईक ह्यांनी लेखी दिले आहे की, ही माझी सही नाही आहे असे तुम्ही घ्या.

**रमेश मनाळे (मा. प्र. उपायुक्त (मुख्यालय) सो.) :-**

या प्रकरणी पुढील कार्यवाही करण्यासाठी विधी सल्लागारांचा अभिप्राय घेण्यांत येईल आणि त्या अनुषंगाने कार्यवाही करण्यांत येईल.

**आसिफ शेख :-**

विधी सल्लागारांचा अभिप्राय नंतर घ्या. पण येथे डायसवर सध्या सभापती साहेब बसले आहेत.

**मोहन पाटील :-**

जर आपल्याला एक सदस्य सांगत आहेत की, ही सही माझी नाही.

**रमेश मनाळे (मा. प्र. उपायुक्त (मुख्यालय) सो.) :-**

मान्य आहे, सही नाही आहे. पण या प्रकरणी पुढील कार्यवाही करण्याकरिता विधी सल्लागारांचा सल्ला घेण्यांत येईल.

**आसिफ शेख :-**

मनाळे साहेब, आपण विषयांतर करु नका. सन्मा. सभापती साहेबांनी रुलिंग काय दिली आहे?

**मा. सभापती :-**

मनाळे साहेब, आपणांस आदेश देतो की, ह्याच्यावर पोलीस कारवाई करण्यांत यावी आणि विधी सल्लागारांकडून विचार घेऊन पोलीस कारवाई ताबडतोब करण्यांत यावी आणि जे दोन कर्मचारी आहेत त्यांना नोटीस बजावण्यांत यावी.

**अशोक पाटील :-**

आर्थिक नुकसानाबाबत काय?

**हॅरल बोर्जीस :-**

सभापती महोदय, येथे प्रशासनाचा आर्थिक नुकसान झालेले आहे. या आर्थिक नुकसानीला कुठेही हे सभागृह जबादार राहणार नाही.

**प्रकरण क्र. ७२ :-**

सन २००४-२००५ चे बाजार लिलाव व मुदतवाढीस मंजुरी देणेबाबत.

**ठराव क्र. ८१ :-**

मिरा भाईदर महानगरपालिका प्रतिवषी भाईदर (पुर्व), भाईदर (पश्चिम), मुर्धे ते उत्तन, मिरारोड ते घोडबंदर या विभागाचा बाजार वसुली करता बोली पद्धतीने लिलाव करीत असते. महानगरपालिकेने सन २००४-२००५ या आर्थिक वर्षाकरिता बाजार वसुलीचा ठेका देणे बाबत कार्यवाही केलेली होती. या करिता मिरा भाईदर महानगरपालिकेने 'दैनिक सागर' व 'दैनिक सूरज प्रकाश' या दैनिक वृत्तपत्रांत

जाहीरात देउन दिनांक ०८/०३/२००४ रोजी बोली पद्धतीने बाजार लिलाव ठेवण्यांत आले असता त्याच काळामध्ये लोकसभा जाहीर झाल्याने आचार संहिता लागू झाली. आचार संहितेमुळे स्थगित करुन बाजार लिलाव पुढे ढकलण्यात आलेले होते. यामुळे चारही बाजार ठेकेदार यांना दोन महिन्याची (एप्रिल-२००४ ते मे-२००४) मुदत वाढ देण्यांत आलेली होती. यानंतर प्रशासनाने बाजार वसुलीकरिता 'मुंबई सकाळ' व 'दैनिक सूरज प्रकाश' या वृत्तपत्रांत जाहीरात देउन दिनांक २७/०५/२००४ रोजी बाजार लिलांव घेतले. या बाजार लिलावांची रक्कम मिरा भाईदर महानगरपालिकेने ठरविलेली होती, तसेच बाजार लिलावांत मंजुर झालेल्या रक्कमा व बाजार घेतलेल्या ठेकेदारांची नांवे खालील तक्यात दिलेली आहेत.

| अ. क्र. | विभाग | ठेकेदारांचे नांव | सन २००४-२००५ करिता महानगरपालिकेने ठरवलेली किंमत | ठेकेदारांने लिलावांत मान्य देकार केलेली रक्कम | मुदत (०१/०६/२००४ ते ३१/०३/२००५) |
|---|---|---|---|---|---|
| १ | भाईदर (पश्चिम) | श्री. जयदेव रामचंद्र किणी | ४२,००,०००/- | ४२,४५,०००/- | १० महिने |
| २ | भाईदर (पुर्व) | श्री. पॅट्रीक रॉड्रीक्स | ४२,००,०००/- | ४२,४५,०००/- | १० महिने |
| ३ | मिरारोड ते घोडबंदर | श्री. देविदास जयदेव किणी | २१,६०,०००/- | २१,८५,०००/- | १० महिने |
| ४ | मुर्धे ते उत्तन | श्री. पर्सी फन्सेका | ४,००,०००/- | ४,०५,०००/- | १० महिने |

वरीलप्रमाणे बोली पद्धतीने बाजार लिलाव घेण्यांत आलेले आहेत व चार विभागांतील बाजार लिलावांना दिनांक ०१/०४/२००४ ते ३१/०५/२००४ पर्यत मुदत वाढ दिलेली आहे, ती खालीलप्रमाणे आहे.

| अ.क्र | विभाग | मुदत वाढ |
|---|---|---|
| १ | भाईदर (पश्चिम) | ०१/०४/२००४ ते ३१/०५/२००४ |
| २ | भाईदर (पुर्व) | ०१/०४/२००४ ते ३१/०५/२००४ |
| ३ | मिरारोड ते घोडबंदर | ०१/०४/२००४ ते ३१/०५/२००४ |
| ४ | मुर्धे ते उत्तन | ०१/०४/२००४ ते ३१/०५/२००४ |

वरीलप्रमाणे सन २००४-२००५ या वर्षाकरिता (०१/०६/२००४ ते ३१/०३/२००५) केलेल्या बाजार लिलावांस व दोन महिन्यांच्या मुदतीस ही सभा मंजुरी देत आहे.

**सुचक :- श्री. मोहन पाटील.** **अनुमोदन :- श्री. आसिफ शेख.**

**ठराव सर्वानुमते मंजुर**

**सही/-**
**सभापती**
**स्थायी समिती सभा**
**मिरा भाईंदर महानगपालिका**

**मा. सभापती :-**

सर्व उपस्थित सन्मा. सदस्य, अधिकारी वर्ग, कर्मचारी वर्ग आपणा सर्वांचे आभार मानून आजची सभा संपल्याचे जाहिर करत आहे.

**सभा संपल्याची वेळ :- दुपारी ०२.१५ वा.**

**सभापती**
**स्थायी समिती**
**मिरा भाईंदर महानगरपालिका**

**नगरसचिव**
**मिरा भाईंदर महानगरपालिका**